म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.



REFBK-0000332
REFBK-0000332

# भजनी संतमेळा

अथवा

# प्रेमळ भजनसंग्रह.

हें पुस्तक

## गोविंद मोरोबा काळेकर.

यांनीं तयार केलें.

तें,

## बाळकृष्ण लक्ष्मण पाठक यांनीं

सर्व हक्कांसह विकत घेऊन

मुंबईत "गणपत कृष्णाजी"च्या छापखान्यांत

छापून प्रसिद्ध केलें.

शके १८२७, सन १९०६.

सर्व प्रकारचे हक्क प्रसिद्धकर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रस्तावना.

प्राचीन साधुसंतानीं सर्व लोकांस भक्ति ज्ञान् वैराग्यचा बोध व्हावा ह्मणून अभंगपदादि अनेक प्रकारची काव्यरचना करून ठेविली हे, त्यांचे सर्व लोकांवर महत् उपकार आहेत. त्या काव्यांपैकीं सतांनीं केलेले अभंग व पदें विश्रांतीच्या वेळीं कांहीं मंडळी एकत्र जमून गायनवादनयुक्त गावयाची जी चाल आहे त्यास भजन व तें करणाऱ्या लोकांस 'भजनी मंडळी' असें ह्मणतात. अशा भजनीमंडळीच्या उपयोगासाठीं एखादें स्वतंत्र पुस्तक करावें या हेतूनें हा 'संतमेळा' तयार केला आहे. यांत अनेक संतमंडळीनीं केलेले भक्ति, नीति, आत्मज्ञान व वैराग्यपर असे निवडक अभंग व पदें याचा संग्रह केला असल्यामुळें हें पुस्तक भजनप्रिय लोकांस चांगलें उपयोगीं पडेल अशी आशा आहे.

पुस्तक कर्ता.

# भजनी संतमेळा

अथवा

# प्रेमळ भजनसंग्रह.

332
मा।वा.
REFBK-0000332

## ॥ अभंगसंग्रहप्रारंभः ॥

### भजन.

॥ विठ्ठल रखुमाई, विठोबा रखुमाई, विठ्ठल रखुमाई,
विठोबा रखुमाई. ॥

## अभंग १ ला.

नमिला गणपति माउली सारजा ॥ आतां गुरुराजा दंडवत ॥ १ ॥ गुरुराया चरणीं मस्तक ठेविलें ॥ आपुल्या दासाला द्यावी मती ॥२॥ गुरुराया तुज ऐसा नाहीं सखा ॥ कृपा करुनी रंका धरीं हातीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे गुरु मातापिता बंधु ॥ द्यावी कृपासिंधु मायबापा ॥ ४ ॥

## अभंग २ रा.

आरंभीं आवडे आदरें आलें नाम ॥ तेणें सकळ सिद्धी जगीं झालें पूर्ण काम ॥ १ ॥ रामकृष्ण गोविंदा गोपाळा॥

तूं माझी माउली जिवींचा जिव्हाळा ॥ २ ॥ तुझीया नामें सकळ संदेह फिटला ॥ बाप रखुमादेवीवरु श्रीविठ्ठला ॥३ ॥

## अभंग ३ वा.

नमो आदि रूपा ओंकार स्वरूपा ॥ विश्वाचिया रूपा पांडुरंगा ॥ १ ॥ तुझीया सत्तेनें तुझे गुण गावूं ॥ तेणें सुखी राहूं सर्व काळ ॥ २ ॥ तूंची श्रोता वक्ता ज्ञानासी अंजन सर्व काहीं जाण तुझे हातीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे जेथें नाहीं मीतूपण ॥ स्तवावें हें कोण कोणालागीं ॥ ४ ॥

## अभंग ४ था.

रूप पहातां लोचनीं ॥ सुख झालें हो साजणी ॥ १ ॥ तो हा विठ्ठल बरवा ॥ तो हा माधव बरवा ॥ २ ॥ बहुता सुकृतांची जोडी ॥ ह्मणुनी विठ्ठल आवडी ॥ ३ ॥ सर्व सुखाचें आगर ॥ बाप रखुमादेवीवर ॥ ४ ॥

## अभंग ५ वा.

वचन ऐका कमळापती ॥ मज रंकाची विनंती ॥ १ ॥ कर जोडितों कथेकाळीं ॥ आपण असावें जवळी ॥ २ ॥ घेईं घेईं माझी भाक ॥ जरि कां मागेन आणिक ॥ ३ ॥ तुकया बंधु ह्मणे देवा ॥ शब्द इतुकाची राखावा ॥ ४ ॥

## अभंग ६ वा.

सुंदर तें ध्यान उभा विटेवरी॥कर कटावरी ठेवूनियां॥१॥ मकर कुंडलें तळपती श्रवणीं ॥ कंठीं कौस्तुभमणी विराजित ॥ २ ॥ गळां तुळशीहार कांसे पीतांबर ॥ आवडे निरंतर हेंची ध्यान ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझें हेंची सर्व सुख ॥ पाहीन श्रीमुख आवडीनें ॥ ४ ॥

## अभंग ७ वा.

आणिक दुसरें मज नाहीं आतां ॥ नेमिलिया चित्ता पासोनियां ॥ १ ॥ पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं ॥ जागृतीं स्वप्नीं पांडुरंग ॥ २ ॥ पडिलें वळण इंद्रियां सकळां ॥ भाव तो निराळा नाहीं दुजा ॥ ३ ॥ तुका ह्मणे नेत्रीं केली ओळखण ॥ तटस्थ हें ध्यान विटेवरी ॥ ४ ॥

## अभंग ८ वा.

बाप माझा दीनानाथ ॥ वाट भक्तांची पाहत ॥ १ ॥ कर ठेवूनी कटेवरी ॥ उभा भिवरेच्या तीरीं ॥ २ ॥ कानीं कुंडल वनमाळा ॥ रूप सुंदर सांवळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे भेटावया ॥ सदा उभारिल्या बाह्या ॥ ४ ॥

## ॥ भजन. ॥

॥ रुक्मिणी हरी राम ॥ जयजय राम राम हरी राम॥

## अभंग ९ वा.

रूपीं गुंतले लोचन ॥ चरणीं स्थिरावलें मन ॥ १ ॥ देह भाव हरपला ॥ तुज पाहतां विठ्ठला ॥ २ ॥ कळूं नेदी सुख दुःख ॥ तहान हरपली भूक ॥ ३ ॥ तुका ह्मणे नोहे परतो ॥ तुझें दर्शन मागुती ॥ ४ ॥

## अभंग १० वा

झालें रामराज्य काय उणे आह्मांसी ॥ धरणी धरी पीक गायी वोळल्या ह्मैसी ॥ १ ॥ राम वेळोवेळां आह्मी गाऊं ओंवीये ॥ दळीतां कांडितां जेवितां गे बाईये ॥ २ ॥ स्व-मीचेंही दुःख कोणी न देखे डोळां ॥ नामाच्या गजरे भय सुटलें काळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे रामें सुख दिधलें आपुलें ॥ तया गर्भवासीं येणें जाणें सुटलें ॥ ४ ॥

## अभंग ११ वा.

कथा त्रिवेणीसंगम । देवभक्त आणि नाम ॥ तेथींचें उ-त्तम । चरणरज वंदितां ॥ १ ॥ जळती दोषांचे डोंगर । शुद्ध होती नारीनर ॥ गाती ऐकती सादर । जे पवित्र हरिकथा ॥ २ ॥ तीर्थें तया ठाया येती । पुनीत व्हावया ॥ पर्वकाळ पायां । तळीं वसे वैष्णवां ॥ ३ ॥ अनुपम्य महिमा । नाहीं द्यावया उपमा ॥ तुका ह्मणे ब्रह्मा ॥ नेणे वर्णूं या सुखा ॥ ४ ॥

## अभंग १२ वा.

नाचूं गाऊं विठ्ठ, तुझा करूं अनुवाद ॥ जेथें पाहूं तेथें चतुर्भुज गोविंद ॥१॥ आनंद विठोबा झाला माझ्या मनीं ॥ देखिलीं पाऊलें विटेसहित लोचनीं ॥ २ ॥ लयी साधन नलगे मुक्तीचें सायास ॥ हाची जन्मोजन्मीं गोड भक्तीचा वास ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मां प्रेम लीन ते कांहीं॥पंढरीचा राणा सांठविला हृदयीं ॥ ४ ॥

## अभंग १३ वा.

माझ्या बोबडीया बोला ॥ चित्त द्यावें गा विठ्ठला ॥ १॥ तुझ्या नामाची न लाज ॥ जनासंगें काय काज ॥ २ ॥ जन हांसतील लोक ॥ पण मी गाईन निःशंक ॥ ३ ॥ वेडें वांकुडें गाईन ॥ परी तुझाची ह्मणवीन ॥ ४ ॥ नामा ह्मणे कमळापती ॥ माझी परिसावी विनंती ॥ ५ ॥

## अभंग १४ वा.

चला बाई पांडुरंग पाहूं वाळवंटीं॥मांडियेला काला भोंवतीं गोपाळाची दाटी ॥ १ ॥ आनंदें कवळ देती एकामुखीं एक ॥ न ह्मणती सान थोर अवघीं सकळीक ॥ २ ॥ हमामा हुंबरी पावा वाजविती मोहरी ॥ घेतलासे फेर माजी घालूनि-

यां हरी ॥ ३ ॥ लुब्धल्या नारी नर अवघ्या पशुयाती ॥ विसरलीं देहभाव शंका नाहीं चित्तीं ॥ ४ ॥ पुष्पांचा वरुषाव झाली आरतियांची दाटी ॥ तुळशी गुंफोनियां माळा घालिताती कंठीं ॥ ५ ॥ यादवांचा राणा गोपीमनोहर कान्हा ॥ तुका ह्मणे सुख वाटे देखोनीयां मना ॥ ६ ॥

## अभंग १५ वा.

मन हें धालें मन हें धालें पूर्ण विठ्ठलची झालें ॥ अंतर बाहेर रंगुन गेलें विठ्ठलची ॥ १ ॥ विठ्ठल ह्मणतां सरलें पाप, पदरीं आलें पुण्यमाप ॥ झाला दीनाचा माय बाप विठ्ठलची ॥ २ ॥ विठ्ठल जळीं स्थळीं भरला, ठाव कोठें नाहीं उरला॥ आज म्यां दृष्टीनें पाहिला विठ्ठलची ॥ ३ ॥ ऐसा भाव धरूनि मनीं, विठ्ठल आणिला निजध्यानीं ॥ अखंड वदो माझी वाणी विठ्ठलची ॥ ४ ॥ तो हा चंद्रभागे तीरा, पुंडलीकें दिधला थारा ॥ बाप रखुमादेवीवरा, जडले पायीं विठ्ठलची ॥ ५ ॥

## अभंग १६ वा.

नाम गाऊं नाम घेऊं ॥ नाम विठोबाला वाहूं ॥ १ ॥ आह्मी दैवाचे दैवाचे ॥ दास पंढरीरायाचे ॥ २ ॥ टाळ विणा

घेऊं हातीं ॥ विठ्ठल नाम गाऊं गीतीं ॥३॥ नामा ह्मणे वाहू लाखोली सदा ॥ सहस्त्र नामाची गोविंदा ॥ ४ ॥

## अभंग १७ वा.

ज्ञानीयाचा राजा गुरुमहाराव ॥ ह्मणती ज्ञानदेव ऐसें तुह्मां ॥ १ ॥ मज पामरासी हें काय थोरपण ॥ पायींची वहाण पायीं बरी ॥ २ ॥ ब्रह्मादिक जेथें तुह्मा वोळगणें ॥ इतर तुळणें काय पुरे ॥ ३ ॥ तुका ह्मणे नेणें युक्तीची ते खोली ॥ ह्मणोनी ठेविली पायीं डोई ॥ ४ ॥

## ॥ भजन. ॥

॥ राधारमण गोविंद जय हरी राधारमण गोविंद ॥

## अभंग १८ वा.

कान्हयारे जगजेठी ॥ देई भेटी एकवेळे ॥ १ ॥काय मोकलीलें वनीं ॥ सावजानीं वेढिलें ॥२॥येथवरी होता संग ॥ अंग अंग लपविलें ॥ ३ तुका ह्मणे पाहिलें मार्ग ॥ एवढ्या वेगें अंतरलें ॥ ४ ॥

## अभंग १९ वा.

तुज ह्मणतील कृपेचा सागर ॥ तरि कां केला धीर पांडूरंगा ॥ १ ॥ अझुनी कां नये तुज माझी दया ॥ काय दे-

वराया पाहतोसी ॥ २ ॥ आळवितों जैसें पाडस कुरंगिणी पीडिलिया वनीं तानभूक ॥ ३ ॥ प्रेमरस पान्हा पाजीं माझे आई ॥ धांवें हो विठाई वोरसोनी ॥ ४ ॥ तुका ह्मणे माझें कोण हरी दुःख ॥ तुजवीण एक पांडुरंगा ॥ ५ ॥

## अभंग २० वा.

कृपाळु सज्जन तुह्मी संत जन ॥ हेंचि कृपादान तुमचें मज ॥ १ ॥ आठवण तुह्मी द्यावी पांडुरंगा ॥ किंव माझी सांगा काकूलती ॥ २ ॥ अनाथ अपराधी पतिता आगळा ॥ परिपायांवेगळा नका करूं ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुह्मी निरवल्यावरी ॥ मग मज हरी उपेक्षीना ॥ ४ ॥

## अभंग २१ वा.

येईं वो येईं वो येईं धांवोनियां ॥ विलंब कां वायां लाविला कृपाळे ॥ १ ॥ विठाबाई विश्वंभरे भवच्छेदके ॥ कोठें गुंतलीस अगे विश्वव्यापके ॥ २ ॥ न करी न करी न करी आतां आळस अव्हेरु ॥ व्हावया प्रगट कैंचें दूरी अंतरु ॥ ३ ॥ नेघे नेघें नेघें माझी वाचा विसांवा ॥ तुका ह्मणे हांवा हांवा हांवा साधावा ॥ ४ ॥

## अभंग २२ वा.

रघुनंदन पायीं गेला ॥ रथ कां रे तूं आणिला ॥ १ ॥ सूर्यवंशी नारायणा ॥ माझा राघव जातो वना ॥ २ ॥ धरणी माय बहिणी ॥ नको रुतूं राघवचरणीं ॥ ३ ॥ सूर्यवंशींच्या दिनकरा ॥ नको तापूं रे भास्करा ॥ ४ ॥ एका जनार्दनीं भाव ॥ परोपरीं हा राघव ॥ ५ ॥

## अभंग २३ वा.

रूप कां न दावी आतां ॥ सहस्र भुजांच्या मंडिता॥१॥ सकळींकांचें समाधान ॥ नोहे देखिल्यावांचून ॥ २ ॥ शंख चक्र पद्म गदा ॥ गरुडासहित ये गोविंदा ॥ ३ ॥ तुका ह्मणे कान्हा ॥ भूक लागली नयनां ॥ ४ ॥

## अभंग २४ वा.

गायनाचे रंगीं ॥ शक्ति अद्भुत ये अंगीं ॥ १ ॥ हें तो देणें तुमचें देवा ॥ घ्यावी अखंडीत सेवा ॥ २ ॥ अंगीं प्रेमाचें भरतें ॥ नाहीं उतार चढतें ॥३॥ तुका ह्मणे वाणी ॥ नाम अमृताची खाणी ॥ ४ ॥

## अभंग २५ वा.

सेवीतों हा रस वांटितों आणिका॥ घ्यारे होऊं नका राण-

भरी ॥ १ ॥ विटेवरी ज्याचीं पाऊलें समान ॥ तोची एक दानशूर दाता ॥ २ ॥ मनाचे संकल्प पाववील सिद्धी ॥ जरी राहे बुद्धी याचे पायीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे मज धाडिलें निरोपा ॥ मारग हा सोपा सुखरूप ॥ ४ ॥

## अभंग २६ वा.

गरुडाचे पायीं ॥ ठेवीं वेळोवेळां डोई ॥ १ ॥ वेगीं आणावा तो हरी ॥ मज दीनातें उद्धरी ॥ २ ॥ पाय लक्ष्मीच्या हातीं ॥ तिशीं यावें काकूळती ॥ ३ तुका ह्मणे शेषा ॥ जागें करा हृषीकेशा ॥ ॥ ४ ॥

## अभंग २७ वा.

आणिकांची स्तुति आह्मां ब्रह्महत्या ॥ एका वांचूनि त्या पांडुरंगा ॥ १ ॥ आह्मा विष्णुदासां एकविध भाव ॥ न ह्मणो या देव आणिकांसि ॥ २ ॥ शतखंड माझी होईल रसना ॥ जरी या वचना पालटेन ॥ ३ ॥ तुका ह्मणे मज आणिका संकल्पें ॥ अवघींच पापें घडतील ॥ ४ ॥

## अभंग २८ वा.

गोविंद गोविंद ॥ मना लागलिया छंद ॥ १ ॥ मग गोविंद ते काया ॥ भेद नाहीं देवा तया ॥ २॥ आनंदलें मन ॥

प्रेमें पाझरती लोचन ॥ ३ ॥ तुका ह्मणे आळी ॥ जेवीं नुरेचि वेगळी ॥ ४ ॥

## ॥ भजन. ॥

॥ संत तुह्मी हळु हळु चाला ॥ मनीं विठ्ठल विठ्ठल बोला ॥

## अभंग २९ वा.

सद्गुरुरायें कृपा मज केली ॥ परी नाहीं घडली सेवा कांहीं ॥ १ ॥ सांपडविलं वाटे जातां गंगास्नान ॥ मस्तकीं तो जाणा ठेविला कर ॥ २ ॥ भोजना मागती तुप पावशेर ॥ पडीला विसर स्वप्नामाजी ॥ ३ ॥ कांहीं कळें उपजला अंतराय ॥ ह्मणोनियां काय त्वरा झाली ॥ ४ ॥ राघव चैतन्य केशव चैतन्य ॥ सांगितली खूण माळिकेची ॥ ५ ॥ बाबाजी आपूलें सांगितलें नाम ॥ मंत्र दिला रामकृष्णहरी ॥ ६ ॥ माघ शुद्ध दशमी पाहोनी गुरुवार ॥ केला अंगीकार तुका ह्मणे ॥ ७ ॥

## अभंग ३० वा.

आतां कोठें धांवें मन ॥ तुमचे चरण देखिलिया ॥ १ ॥ भाग गेला शीण गेला ॥ अवघा झाला आनंदु ॥ २ ॥ प्रे-

मरसें पडली मिठी ॥ आवडी लाठी मुखासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्माजोगें ॥ विठ्ठल घोगें खरें माप ॥ ४ ॥

## अभंग ३१ वा.

आवडे हें रूप गोजिरें सगुण ॥ पाहतां लोचन सुखावले ॥ १ ॥ आतां दृष्टीपुढें ऐसाचि तूं राहें ॥ जों मी तुज पाहें पांडुरंग ॥२॥ लांचावलें मन लागलीसे गोडी ॥ तें जीवें न सोडी ऐसें झालें ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मी मागावी लडिवाळी ॥ पुरवावी आळी मायबापें ॥ ४ ॥

## अभंग ३२ वा.

वेढा वेढा रे पंढरी ॥ मोर्चे लावा भीमातीरीं ॥ १ ॥ चला चला संतजन ॥ करूं देवासीं भांडण ॥ २ ॥ लुटा लुटा पंढरपूर ॥ धरा रखुमायीचा वर ॥ ३ ॥ तुका ह्मणे चला ॥ घाव निशाणीं घातला ॥ ४ ॥

## अभंग ३३ वा.

कोण पुण्यें यांचा होईन सेवक ॥ जींहीं द्वंद्वादिक दुराविले ॥ १ ॥ ऐसें वर्म मज दावीं नारायणा ॥ अंतरींच्या खूणा प्रगटोनी ॥ २ ॥ बहु अवघड असे संतभेटी ॥ तरी ज-

गजेठी करुणा केली ॥ ३ ॥ तुका ह्मणे मन नये वृत्तीवरी॥ सुखाचे शेजारीं पहुडवीन ॥ ४ ॥

## अभंग ३४ वा.

कोण पुण्य फळा आलें ॥ आजि देखिलीं पाउलें ॥ ॥ १ ॥ ऐसें नेणें नारायणा ॥ संतीं संभाळावें दीना ॥२॥ कोण पुण्य लाभकाळ॥दिन आजिचा मंगळ ॥३॥तुका ह्मणे जाला ॥ लाभ सहज विठ्ठला ॥ ४ ॥

## अभंग ३५ वा.

गोड नांवें क्षीर ॥ परि साखरेचा धीर ॥ १ ॥ तैसें जाणा ब्रह्मज्ञान ॥ बापुडें तें भक्तीविण ॥ २ ॥ रुची नेदी अन्न ॥ ज्यांत नसतां लवण ॥ ३ ॥ आंधळ्याचे श्रम॥ शिकविल्याचेंचि नाम ॥ ४ ॥ तुका ह्मणे तारा ॥ नांव तंबूऱ्याला सारा ॥ ५ ॥

## अभंग ३६ वा.

अचळ न चळे ऐसें झालें मन ॥ धरूनि निज खूण राहिलोंसे ॥ १ ॥ आवडी बैसली गुणांची अंतरीं ॥ करूं धणी वरी सेवन तें ॥ २ ॥ एकविध भाव नव्हे अभावना ॥ आणीक या गुणा न मिळवे ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझें पडिलें आहारीं ॥ ध्यान विटेवरी ठाकलें तें ॥ ४ ॥

## अभंग ३७ वा.

अर्थाविण पाठांतर कासया करावें ॥ व्यर्थची भरावें घोकूनियां ॥१॥ घोकूनियां काय वेगीं अर्थ पाहे ॥ अर्थरूप राहे होऊनियां ॥ २ ॥ तुका ह्मणे ज्याला अर्थीं आहे भेटी नाहीं तरी गोष्टी बोलों नका ॥३ ॥

## अभंग ३८ वा.

रंग मांडिला रंगणीं ॥ उभा ठाकलों कीर्तनीं ॥ १ ॥
हातीं घेऊनीयां वीणा ॥ कंठीं राहें नारायणा ॥ २ ॥ ॥
सांवळी देखिली ती मूर्त ॥ माझ्या जीवींची विश्रांत ॥ ३ ॥
तुका ह्मणे देगा देवा ॥ माझ्या कीर्तनाचा ठेवा ॥ ४ ॥

## अभंग ३९ वा.

सुंदर तें ध्यान शोभे सिंहासनीं ॥ वामांगीं नंदिनी जनकाची ॥ १ ॥ दक्षिणेसी उभा बंधु लक्षुमण ॥ भरतशत्रुघ्न कैकयीसुत ॥ २ ॥ सन्मुख उभा मारुती बलभीम ॥ जपे राम नाम सर्वकाळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझ्या श्रीरामाचें ध्यान ॥ करीन पूजन विठ्ठलाचें ॥ ४ ॥

## ॥ भजन ॥

कृष्ण झेली बा झेली ॥ गोकुळांत मात केली ॥

## अभंग ४० वा.

बारे पांडुरंगा येशी केंव्हां भेटी ॥ जाहलों हिंपुटी तुजवीण ॥ १ ॥ तुजवीण सखा मज नाहीं कोणी ॥ वाटतें चरणीं घालूं मिठी ॥ २ ॥ ओंवाळावी काया चरणांवरूनी ॥ केंव्हां चक्रपाणी भेटशील ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझी पुरवावी आवडी ॥ वेगें घालीं उडी नारायणा ॥ ४ ॥

## अभंग ४१ वा.

मी तों समर्थांची दासी ॥ मिठी घालीन पायांसी ॥ १ ॥ हाचि माझा दृढ भाव ॥ करीन नामाचा उत्साव ॥ २ ॥ आह्मां दासांस हें काम ॥ मुखीं विठ्ठल हरिनाम ॥ ३ ॥ सर्व सुख पायीं लोळे ॥ विठ्ठल जनीसंगें खेळे ॥ ४ ॥

## अभंग ४२ वा.

हिरा शोभला कोंदणीं ॥ जडित माणिकांची खाणी ॥ १ ॥ तैसा दिसे नारायण ॥ मुख सुखाचें मंडण ॥ २ ॥ कोटि चंद्रांच्या त्या लीळा ॥ पौर्णिमेच्या पूर्ण कळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे दृष्टि धाये ॥ परतोनि माघारी नये ॥ ४ ॥

## अभंग ४३ वा.

आतां गाऊं तुज ओविया मंगळी ॥ करूं गदारोळी

हरिकथा ॥ १ ॥ होसि निवारिता आवुर्चे सकळ ॥ भय तळमळ पापपुण्य ॥ २ ॥ भोगिले ते भोग लावूं तुझे अं- गीं ॥ अलिप्त या जगीं होउनि राहों॥३॥ तुका ह्मणे आह्मीं लाडकीं लेंकुरें ॥ न राहों अंतरें पायांविण ॥ ४ ॥

## अभंग ४४ वा.

आतां घेईं माझे ॥ भार सकळही ओझें ॥ १ ॥ काय क- रिसी होई वाड ॥ आलों पोटासीं दगड ॥ २ ॥ तूंचि डोळे वाती ॥ देईं दीपक सांगाती ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं ॥ विचाराया चाड नाहीं ॥ ४ ॥

## अभंग ४५ वा.

आतां तरी पुढें हाचि उपदेश ॥ नका करूं नाश आयु- ष्याचा ॥ १ ॥ सकाळांच्या पायां माझें दंडवत ॥ आपु लालें चित्त शुद्ध करा ॥ २ ॥ हित तें करावें देवाचें चिंतन॥ करूनियां मन एकविध ॥ ३ ॥ तुका ह्मणे लाभ होय तो व्यापार ॥ करा काय फार शिकवावें ॥ ४ ॥

## अभंग ४६ वा.

आतां देवा मोकळीलें ॥ तुह्मां भलें दिसेना ॥ १ ॥ आतां नाहीं जीवभाव ॥ उरला ठाव वेगळा ॥ २ ॥ सांभाळुन

द्यावें देवा ॥ आपणासवें यावरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे नग्न भाज ॥ तरि ते लाजे स्वामीसी ॥ ४ ॥

## अभंग ४७ वा.

आतां माझे सखे येतो वारकरी ॥ जीवा आस थोरी लागलीसे ॥ १ ॥ सांगतील माझ्या निरोपाची मात ॥ सकळ वृत्तांत माहेरीचा ॥ २ ॥ काय लाभ झाला काय होतें केणें ॥ काय काय केणें सांठविलें ॥ ३ ॥ मागणें तें काय धाडिलें भातुकें ॥ पुसेन तें सुखें आहे तसी ॥ ४ ॥ तुका ह्मणे काय सांगती ते कानीं ॥ ऐकोनियां मनीं धरुनी राहे ॥ ५ ॥

## अभंग ४८ वा.

आमुची मिरास पंढरी ॥ आमुचें घर भीमातीरीं ॥ १ ॥ पांडुरंग आमुचा पिता ॥ रखुमाई आमुची माता ॥ २ ॥ भाऊ पुंडलीक मुनी ॥ चंद्रभागा आमुची बहिणी ॥ ३ ॥ तुका जुनाट मिराशी ॥ ठाव दिला पायांपाशीं ॥ ४ ॥

## अभंग ४९ वा.

न जायेची ताठा नित्य खटाटोप ॥ मंडुकी वटवट तैसें तें गा ॥ १ ॥ प्रेमाविण भजन नाकाविण मोतीं ॥ अर्थां

विण पोथी वाचुन काय ॥ २ कुंकुं नाहीं ठावें ह्मणे मी आहेव ॥ भावाविण देव कैसा पावे ॥ ३ ॥ अनुतापा पाहें शोधूनियां भाव ॥ अनुभव पाहें शोधूनियां ॥ ४ ॥ पाहतां पहाणें गेलें तें शोधूनी ॥ एका जनार्दनीं सारविलें ॥ ५ ॥

## अभंग ५० वा.

आह्मी आळीकरें ॥ प्रेम सुखाचीं लेंकुरें ॥ १ ॥ पायीं गोविली वासना ॥ तुच्छ केलें ब्रह्मज्ञाना ॥ २ ॥ येतां पाहे मुळा ॥ वाट पंढरीच्या डोळां ॥ ३ ॥ तुका ह्मणे स्थळें ॥ मग मी पाहेन सकळें ॥ ४ ॥

## ॥ भजन ॥

भीमातिरीं नांदे विठ्ठल हरी ॥ देव भक्तांचा प्राणसखा कैवारी

## अभंग ५१ वा.

कन्या सासुऱ्यास जाये ॥ मागें परतोनी पाहे ॥ १ ॥ ऐसें झालें माझ्या जीवा ॥ केव्हां भेटसी केशवा ॥ २ ॥ चुकलीया माये ॥ बाळ हुरू हुरू पाहे ॥ ३ ॥ हरणी चुकली पाडसा ॥ धुंडाळी तो दाही दिशा ॥ ४ ॥ रानीं हिंडों गेली गाय ॥ घरीं वत्स वाट पाहे ॥ ५ ॥ घार फिरत आकाशीं ॥ तिचें चित्त पिल्यांपाशीं ॥ ६ ॥ जीवनावेगळी मासोळी ॥ तैसा तुका तळमळी ॥ ७ ॥

## अभंग ५२ वा.

कव मरूं पाऊं चरण तुह्मारे ॥ ठाकुर मेरे जीवन प्यारे ॥ १ ॥ जग रोवे ज्याकुं सो मोहि मीठा ॥ मीठा दर आनंदमाही पैठा ॥ २ ॥ भला पाऊं जनम इन्हे बेर ॥ सब मायाके असंग फेर ॥ ३ ॥ कहे तुका धन मानहि दारा ॥ वोहि लिये गुंडलिया पसारा ॥ ४ ॥

## अभंग ५३ वा.

येग येग विठाबाई ॥ आह्मां अनाथांचे आई ॥ १ ॥ भीमा आणि चंद्रभागा ॥ तुझ्या चरणींच्या गंगा ॥ २ ॥ इतुक्यांसहित त्वां बा यावें ॥ माझ्या रंगणीं नाचावें ॥ ३ ॥ माझा रंग तुझ्या गुणीं ॥ ह्मणे नामयाची जनी ॥ ४ ॥

## अभंग ५४ वा.

तुझें रूप वेळोवेळां ॥ पडो माझ्य दोहीं डोळां ॥ १ ॥ रामनाम वदो वाणी ॥ हरिकथा पडो कानीं ॥ २ ॥ पायीं तीर्थयात्रा घडो ॥ देह संताघरीं पडो ॥ ३ ॥ सर्वकाळ देवपूजा ॥ नमन माझें गरुडध्वजा ॥ ४ ॥ अहो तुका ह्मणे देवा ॥ घडो वैष्णवांची सेवा ॥ ५ ॥

## अभंग ५५ वा.

आतां राहो हेंचि ध्यान ॥ डोळां ह्मणे लंपट १ ॥ कोंडु-

न कोंडुन धरिला जीव ॥ जीवें भावें पूजीन ॥ २ वहिलें ये-
णें कळसा आलें ॥ स्थिरावलें अंतर ॥ ३ ॥ तुका ह्मणे गो-
जरिया ॥ विठोबा पायां पडूं या ॥ ४ ॥

## अभंग ५६ वा.

सकळ देवाचें दैवत ॥ उभा असे रमाकांत ॥ १ ॥ रंग
लुटा माझ्या बापा ॥ शुद्ध भाव खरे मापा ॥ २ ॥ रंग
लुटिला बहुतीं ॥ ध्रुवनारदादि संतीं ॥ ३ ॥ तुका लुटिता
हे रंग ॥ साह्य झाला पांडुरंग ॥ ४ ॥

## अभंग ५७ वा.

देह जावो अथवा राहो ॥ पांडुरंगीं दृढ भावो ॥ १ ॥
चरण न सोडीं सर्वथा ॥ आण तुझी पंढरीनाथा ॥ २ ॥
वदनीं तुझें मंगळ नाम ॥ सदा अखंडीत प्रेम ॥ ३ ॥ नामा
ह्मणें केशवराजा ॥ केला नेम चालवीं माझा ॥ ४ ॥

## अभंग ५८ वा.

कोण पुण्य कोणा गाठीं ॥ होय ऐसीयांची भेटी ॥ १ ॥
जीहीं हरी धरिला मनीं ॥ दिलें संसारासी पाणी ॥ २ ॥
कोण हा भाग्याचा भाग्याचा ॥ ऐसो यांसीं बोले वाचा ॥ ३ ॥
तुका ह्मणे त्याचे भेटी ॥ होय संसारासी तुटी ॥ ४ ॥

## अभंग ५९ वा.

आह्मी भाग्याचे भाग्याचे ॥ आह्मां तांबे भोपळ्याचे ॥ ॥१॥ लोकां घरीं गाई ह्मैशी ॥ आह्मां घरीं उंदिर घुशी ॥ ॥ २ ॥ लोकां घरीं तांबे थाळे ॥ आह्मां घरीं परळ काळे ॥ ॥ ३ ॥ लोकां घरीं हत्ती घोडे ॥ आह्मां आधोडीचे जोडे॥ ॥ ४ ॥ तुका ह्मणे आह्मी सुडके ॥ आह्मां देखोनि काळ धाके ॥ ५ ॥

## ॥ भजन ॥

॥ विठाबाई, गे विठाबाई ॥ छंद लागला तुझे पायीं ॥

## अभंग ६० वा.

आजि आनंदु एकी परमानंदुरे जया श्रुति नेति नेति ह्मणती गोविंदुरे ॥ १ ॥ विठोबाची वेडीं आह्मां आनंदु सदां गावूं नाचूं टाळी वाजवूं रंजवूं गोविंदा ॥ २ ॥ सदा सण सात आह्मां नित्य दिवाळी ॥ आनंदें निर्भर आमुचा कैवारी बळी ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाहीं जन्ममरणाचा धाक ॥ संतसनकादिक तें आमचे कौतुक ॥ ४ ॥

## अभंग ६१ वा.

एक वेळ करीं या दुःखा वेगळें ॥ दुरिताचें जाळें उगवुनी

॥ १ ॥ आठवीन पाय हा माझा नवस ॥ रात्र ही दिवस पांडुरंगा॥ २ ॥ वहु दूरवरी भोगविलें भोगा ॥ आतां पांडुरंगा सोडवावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे काया करीन कुरवंडी ॥ ओंवाळुन सांडी मस्तक हें ॥ ४ ॥

## अभंग ६२ वा.

तुज पाहतां सामोरी ॥ दृष्टी न फिरे माघारी॥ १ ॥माझें चित्त तुझ्या पायां ॥ मिठी पडली पंढरीराया ॥ २ ॥ नोहे सारितां निराळें ॥ लवण मिळवितां जळें ॥ ३ ॥ तुका ह्मणे बळी ॥ जीव दिला पायांतळीं ॥ ४ ॥

## अभंग ६३ वा.

देवा त्वां कोणाचें बरवें केलें ॥ तें मज पूर्ण कळों आलें ॥ १ ॥ हरिश्चंद्र तारा राणी ॥ वाहे डोंबा घरीं पाणी ॥ २ ॥ रुक्मांगद राजा भला ॥ त्याचा गांव वोस केला ॥ ३ ॥ पांच वर्षांचें ध्रुव बाळ ॥ नेऊन अढळपदीं बसविलें ॥ ४ ॥ गोणाई ह्मणे बा विठ्ठला ॥ माझा नामा वेडा केला ॥ ५ ॥

## अभंग ६४ वा.

पंढरिशीं जारे आलीया संसारा ॥ दीनाचा सोयरा पांडुरंग ॥ १ ॥ वाट पाहे उभा भेटीची आवडी ॥ कृपाळु तांतडी

उतावीळ ॥ २ ॥ मागील परीहार पुढें नाहीं शिण ॥ झालीया दर्शन एक वेळ ॥ ३ ॥ तुका ह्मणें नेदी आणिकांच्या हातीं ॥ बैसला तो चित्तीं निवडेना ॥ ४ ॥

## अभंग ६५ वा.

हीच माझी आस ॥ जन्मोजन्मीं तुझा दास ॥ १ ॥ पंढरीचा वारकरी ॥ वारी चुकवूं न दे हरी ॥ २ ॥ संतसंगें सर्वकाळ ॥ अखंड प्रेमाचा कल्होळ ॥ ३ ॥ चंद्रभागे स्नान ॥ तुका मागे हेंचि दान ॥ ४ ॥

## अभंग ६६ वा.

देखिले तुमचे चरण ॥ निवांत राहिलें मन ॥ कासया टाकिल प्राण ॥ आपुलागे माय ॥ १ ॥ असेल धरणीवरी॥ आपुल्या माहेरी ॥ मग तो श्रीहरी ॥ गीतीं गाईन गे माय ॥ २ ॥ सकळही गोत माझें ॥ पंढरीसी जाणा ॥ बाप रखमादेवीवरु ॥ विठलाशी आणा ॥ ३ ॥

## अभंग ६७ वा.

याती कुळ माझें गेलें हरपून ॥ श्रीरंगावांचून आणिक नेणूं ॥ १ ॥ किती शिकवाल मज वेळोवेळां ॥ परी तो गोवळा राखलिया ॥ २ ॥ अभोग भोगणें मज नाहीं चाड ॥

भक्तिप्रेम गोड लागली माये ॥ ३ ॥ बाप रखुमादेवीवरु जिवींचा जिव्हाळा ॥ कळिकाळा वेगळा नोहे गे माय ॥ ४ ॥

## अभंग ६८ वा.

पतिव्रता नेणे आणिकांची स्तुती ॥ सर्वभावें पति ध्यानीं मनीं ॥ १ ॥ तैसें माझें मन एकविध झालें ॥ नावडे विठलेंविण दुजें ॥ २ ॥ सूर्य विकासिनी न घे चंद्रकळा ॥ गाय ते कोकिळा वसंतेसि ॥ ३ ॥ तुका ह्मणे बाळ मातेपुढें नाचे ॥ बोल आणिकांचे नावडती ॥ ४ ॥

## ॥ भजन ॥

॥ विठल विठल विठल विठल ॥

## अभंग ६९ वा.

हाचि नेम आतां न फिरे माघारी॥बैसलें शेजारीं गोविंदाचे ॥ १ ॥ घररिघी झालें पट्टराणी बळें ॥ वरिलें सांवळें परब्रह्म ॥ २ ॥ बळीयाचा अंग संग झाला आतां ॥ नाहीं भय चिंता तुका ह्मणे ॥ ३ ॥

## अभंग ७० वा.

माझी भक्ति भोळी ॥ एकविध भाव बळी ॥ १ ॥ मी कां पडेन निराळा ॥ ऐसा सांडून सोवळा ॥ २ ॥

आतां अनारिसा ॥ येथें न व्हावें सहसा ॥ ३ ॥ तुका ह्मणे जोडुनी पाय ॥ पुढें उगा उभा राहे ॥ ४ ॥

## अभंग ७१ वा.

सकळही पापें गेलीं दिगंतरा ॥ वैकुंठ पंढरी देखिलीया॥ ॥ १ ॥ सकळही तीर्थं घडलीं एक वेळां ॥ चंद्रभागा डोळां देखिलीया ॥ २ ॥ सकळही संतां एकवेळ भेटी ॥ पुंडलीक दृष्टी देखिलीया ॥ ३ ॥ तुका ह्मणे जन्मा आल्याचें सार्थक ॥ विठ्ठलची एक देखिलीया ॥ ४ ॥

## अभंग ७२ वा.

मूर्ख बैसला कीर्तनीं ॥ नकळे अर्थाची करणी ॥ १ ॥ घुबड फिरे चहूंकडे ॥ नकळे नामाचे पवाडे ॥ २ ॥ पहा हीच परनारी ॥ चित्त परपुरुषावरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे न ऐकती ॥ सांगितलें वायां जाती ॥ ४ ॥

## अभंग ७३ वा.

पति जन्मले माझे उदरीं ॥ मी झालें तयाची नवरी॥१ ॥ पतिव्रता धर्म पहा माझा ॥ मी झालें तयाची भाजा ॥ २ ॥ निर्गुण पति मज आवडे ॥ माया पोटीं निघालीं भावंडें॥३॥ पतिव्रता शिरोमणी ॥ क्रीडा करी दासी जनी ॥ ४ ॥

## अभंग ७४ वा.

काय करावें साधन ॥ जेणें जोडे नारायण ॥ १ ॥ त्यासी उपाय तो थोडा ॥ गर्जे विठूचा पवाडा ॥ २ ॥ भाक्तनाची दोरी ॥ तसे गुण देतो हरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐका ॥ भजा पंढरीनायका ॥ ४ ॥

## अभंग ७५ वा.

तुह्मीं संत मायबाप कृपावंत ॥ काय मी पतित किती वर्णू ॥ १ ॥ अवतार तुह्मां धराया कारण ॥ उद्धराया जन जड जीवां ॥ २ ॥ वाढव.या सुख भक्ति भाव धर्म ॥ कुळाचारी नाम विठोबाचें ॥ ३ ॥ तुका ह्मणे गुण चंदनाचे अंगीं ॥ तैसे तुह्मीं जगीं संतजन ॥ ४ ॥

## अभंग ७६ वा.

जागृतीं पुसे साजणी ॥कोण बोललें अंगणीं ॥ निराश्रीत नयनीं कीं वृंदावनीं देखियेला ॥ १ ॥ मनीं वेध तयाचा पंढरीरायाचा ॥ धृ० ॥ स्वप्न पुसे सुषुप्ती धरी ममता हे चित्तीं ॥ विठ्ठल होय भासी मग जागृती तुरिया ॥ २ ॥ मनीं वेधतयाचा० ॥ माझे मनीं ऐसें झालें मन उन्मनीं मोहिलें ॥ बापरखुमादेवीवरू विठ्ठल सांवळा ॥ मनीं वेध तयाचा०॥३॥

## अभंग ७७ वा.

पांडरंगा आतां ऐका ही विनंती ॥ बहु माझे चित्तीं भय वाटे ॥१॥ नाहीं ऐकीलें संतांचीया मुखें ॥ तें या मज लोकें भेडसाविलें ॥ २ ॥ विष्णुदासां गती नाहीं तरावया ॥ ह्मणती गेले वायां कष्ट तेही ॥ ३ ॥ धिक्कारिती मज करीतां कीर्तन ॥ काय सांगूं शीण तेकाळींचा ॥ ४ ॥ तुका ह्मणे मज वाटतें उदास ॥ काय करूं यास पांडुरंग ॥ ५ ॥

## ॥ भजन· ॥

॥ कृष्णानें मुरली वाजविली ॥ राधा गौळन घावरली ॥

## अभंग ७८ वा-

विठ्ठल टाळ विठ्ठल दिंडी ॥ विठ्ठल तोंडीं उच्चारा ॥ १ ॥ विठ्ठल अवघा भांडवल ॥ विठ्ठल बोला विठ्ठल ॥ २ विठ्ठल नाद विठ्ठल भेद ॥ विठ्ठल छंद विठ्ठल ॥ ३ ॥ विठ्ठल सुखा विठ्ठल दुःखा ॥ तुकया मुखा विठ्ठल ॥ ४ ॥

## अभंग ७९ वा·

ठाकलोंसें द्वारीं ॥ उभा याचक भिकारी ॥ १ ॥ मज भीक कांहीं देवा ॥ प्रेमें भातुकें पाठवा ॥ २ ॥ याचकांचा

भार ॥ नये घेऊं येरझार ॥ ३ ॥ तुका ह्मणे दान ॥ सेवा घेतल्यावांचून ॥ ४ ॥

## अभंग ८० वा.

देव माझा मी देवाचा ॥ सत्य हीच माझी वाचा ॥ १ ॥ देव पहावयासीं गेलों ॥ तेथें देवच होऊनी ठेलों ॥ २ ॥ देह देवाचें देऊळ ॥ आंत बाहेर निर्मळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे धन्य झालों ॥ आज विठ्ठला भेटलों ॥ ४ ॥

## अभंग ८१ वा.

मागणें तें मागूं देवा ॥ करूं भक्ति त्याची सेवा ॥ १ ॥ काय उणें तयापाशीं ॥ रिद्धि सिद्धि ज्याच्या दासी ॥ २ ॥ काया वाचा मन ॥ करूं देवा हें अर्पण ॥ ३ ॥ तुका ह्मणे विश्वंभर ॥ त्याचेंच हें चराचर ॥ ४ ॥

## अभंग ८२ वा.

यातीहीन मतिहीन, कर्महीन माझें ॥ सांडुनियां सर्व लज्जा, शरण आलों तुज ॥ १ ॥ येईंगा तूं मायबापा पंढरीच्या राया ॥ तुजविण शीण झालों हीन झाली काया ॥ २ ॥ दीनानाथ दीनबंधु, नाम तुज साजे ॥ पतितपावन नाम, ऐसी ब्रीदावळी गाजे ॥ ३ ॥ विटेवरी नीट उभा, कटावरी कर॥ ॥ तुका ह्मणे हेंची आह्मां, ध्यान निरंतर ॥ ४ ॥

## अभंग ८३ वा.

कोणे गांवीं आहे सांगा हा विठ्ठल ॥ जरी ठावा असेल तुह्मां कोणा ॥ १ ॥ लागतसें पायां येतों लोटांगणी ॥ मात तरी कोणी सांगा याची ॥ २ ॥ गुण रूप याचे वाणिती या संतां ॥ मज क्षेम देतां सुख वाटे ॥ ३ ॥ सर्वस्वें हा जीव ठेवीन चरणीं ॥ पांडुरंग कोणी दावी तया ॥ ४ ॥ तुका ह्मणे गायीवत्सा ताडातोडी ॥ तैसी जाते घडी एकी मज ॥ ५ ॥

## अभंग ८४ वा.

विठ्ठल विठ्ठल येणें छंदें ॥ ब्रह्मानंदें गर्जावें ॥ १ ॥ वाहे टाळ टाळ्या टाळी ॥ होईल होळी विघ्नांची ॥ २ ॥ विठ्ठल आदि अवसानीं विठ्ठल मनीं स्मरावा ॥ ३ ॥ तुका ह्मणे विठ्ठलवाणी ॥ वदा कांनीं आयीका ॥ ४ ॥

## ॥ भजन. ॥

॥ विठाबाई माउली ॥ दया कर विठाई माउली ॥

## अभंग ८५ वा.

जाय जाय तूं पंढरीं ॥ होय होय वारकरी ॥ १ ॥ सांडोनियां वाळवंट ॥ काय इच्छिसी वैकुंठ ॥ २ ॥ खांद्या पताकांचे भार ॥ तुळसीमाळा आणि अबीर ॥ ३ ॥ साधुसंतांच्या दाटणी ॥ तुका जाय लोटांगणीं ॥ ४ ॥

## अभंग ८६ वा.

वाराणसी गया पाहिली द्वारका ॥ परी नये सरी पंढरीची ॥ १ ॥ पंढरीसी नाहीं कोणा अभिमान ॥ पायां पडे जन एकमेकां ॥ २ ॥ तुका ह्मणे जाय एक वेळ पंढरी ॥ तयाचिये घरीं यम न ये ॥ ३ ॥

## अभंग ८७ वा.

बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल ॥ करावा विठ्ठल जीवभाव ॥ १ ॥ येणें सोसें मन झालें हांवभरी ॥ परी ती माघारी घेत नाहीं ॥ २ ॥ बंधनापासूनी उकलली गांठी ॥ देतां आली मिठी सावकाशें ॥ ३ ॥ तुका ह्मणे देह भारिला विठ्ठलें ॥ कामक्रोधें केलें घर रितें ॥ ४ ॥

## अभंग ८८ वा.

पंढरी पंढरी ॥ विठुरायाची नगरी ॥ १ ॥ भवता भिंवरेचा वेढा ॥ मध्यें पंढरीचा हुडा ॥ २ ॥ गस्त फिरे चहूंकोनीं ॥ टाळमृदंगांची ध्वनी ॥ ३ ॥ ऐसें स्थळ नाहीं कोठें ॥ तुकयाला विठ्ठल भेटे ॥ ४ ॥

## अभंग ८९ वा.

चाकण चौऱ्यांशीं धन्य देहू गांव ॥ तेथील पवित्र जन्म

आह्मां ॥ १ ॥ तेरावे दिवशीं आले पाहावयासीं ॥ पुसे वायकांसीं काय झालें ॥ २ ॥ कन्या किंवा पुत्र सांगावें आह्मासीं ॥ सत्य नांव राशी शोधूं आलों ॥ ३ ॥ शब्द ऐकोनी हांसे बाजेवरी ॥ घरांतील नारी नवल करती ॥ ४ ॥ ठेवूनीयां हस्त चिरंजीव होसी ॥ कुडीसहित जासी वैकुंठासी ॥ ५ ॥ तुका ह्मणे आह्मा बाळपणीं भेटी ॥ आतां जगजेठी दुरावले ॥ ६ ॥

## अभंग ९० वा.

हेंचि दान देगा देवा ॥ तुझा विसर न व्हावा ॥ १ ॥ गुण गाईन आवडी ॥ हेंचि माझी सर्व जोडी ॥ २ ॥ न लगे मुक्ति धन संपदा ॥ संत संग देईं सदा ॥ ३ ॥ तुका ह्मणे गर्भवासीं ॥ सुखें घालावें आह्मासीं ॥ ४ ॥

## अभंग ९१ वा.

शेवटीची विनंती ॥ ऐका ऐका कमळापती ॥ १ ॥ कायावाचा मन ॥ चरणीं असे समर्पण ॥ २ ॥ जीवपरात्मा ऐक्यासी ॥ सदा वसो हृदयेंसीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा ॥ कंठीं असावें केशवा ॥ ४ ॥

## अभंग ९२ वा.

शेवटची विनवणी ॥ संतजनीं परिसावी ॥ १ ॥ विसर तो न पडावा ॥ माझा देवा तुह्मांसी ॥ २ ॥ पुढें फार बोलों काय ॥ अवघें पायीं विदित ॥ ३ ॥ तुका ह्मणे पडिलों पायां ॥ करा छाया कृपेची ॥ ४ ॥

## अभंग ९३ वा.

अहो कांदा मुळा भाजी ॥ अवघी विठाबाई माझी ॥ ॥ १ लसूण मिरच्या कोथिंबिरी ॥ अवघा झाला माझा हरी ॥ २ ॥ ऊंस गाजर रताळू ॥ अवधा भरिला गोपाळू ॥ ३ ॥अहो नाडा आणि दोरी ॥ अवघी व्यापिली पंढरी ॥ ४ ॥ सांवता ह्मणे केला मळा॥विठ्ठला पायीं गोंविला॥५॥

## अभंग ९४ वा

एक प्रहर रात्र झाली ॥ फेरी विठ्ठलाची आली ॥ १ ॥ नामा ह्मणे जनी पाहे ॥ द्वारीं उभा कोण आहे ॥ २ ॥ प्रभा घरांत दाटली ॥ एक सराई लूटली ॥ ३ ॥ एकमेकां आ-लिंगन ॥ नामा ह्मणे जनी धन्य ॥ ४ ॥

## अभंभ ९५ वा.

भाग्यवंता ऐसी जोडी ॥ परवडी संतांची ॥ १ ॥ धन

घरीं पांडुरंग ॥ अभंग जें सरेना ॥ २ ॥ जनाविरहित हा लाभ ॥ टांचें नभ सांठवणें ॥ ३ ॥ तुका ह्मणे विष्णुदासां॥ नाहीं आशा दूसरी ॥ ४ ॥

## अभंग ९६ वा.

पिकली पंढरी पिटिला दांडोरा ॥ केणें आलें घरा सदैवाच्या ॥ १ ॥ चंद्रभागे तीरीं उतरलें बंदर ॥ आले सौदागर साधुसंत ॥ २ ॥ वैष्णव मिळोनी केला असे सांठा ॥ अभागी करंटा जो नेघे तो ॥ ३ ॥ एका जनार्दनी आलें गिऱ्हाइक ॥ वस्तु अमोलिक सांठविली ॥४ ॥

## अभंग ९७ वा.

मना सांडीं विषयखोडी ॥ लाविं विठ्ठलेंसीं गोडी ॥१ ॥ आणिक नलगे साधन ॥ एकलें करीं मन उन्मन ॥ २ ॥ विठ्ठल विठ्ठल सांवळा ॥ पाहें पाहें उघडा डोळा ॥ ३ ॥ एका जनार्दनी शरण ॥ मनचि होय विठ्ठल पूर्ण ॥ ४ ॥

## अभंग ९८ रा.

पहालेंरे मना पाहलेंरे ॥ बुद्धिबळें इंद्रिय सम जाहलेंरे ॥ १ ॥ नयनीं पाहतां न दिसे बिंब ॥ अवघा प्रकाश दिसे

स्वयंभ ॥ २ ॥ एका जनार्दनीं पहाट ॥ जनी वनीं अवनीं लखलखाट ॥ ३ ॥

## अभंग ९९ वा.

टाळ मृदंग मोहरी ॥ नौबद वाजे नानापरी ॥ १ ॥ घणघणाणा घंटा वाजे ॥ ध्रु० ॥ उपासना याचे पायीं ॥ अवघी माझी विठाबाई ॥ २ ॥ एका जनार्दनी भाव ॥ अवघा माझा सद्गुरुराव ॥ ३ ॥

## अभंग १०० वा.

पाहूं गेली हरिजागरा ॥ नयन लांचावले नंदकुमारा ॥ १ ॥ कान्हयारे मनमोहना ॥ देहगेहाची तुटली वासना ॥ २ ॥ एका जनार्दनी हरीकीर्तन ॥ समाधीस तेथें समाधान ॥ ३ ॥

## अभंग १०१ वा.

उफराटी माळ उफराटें ध्यान ॥ मनाचें उन्मन मूर्ति माजीं ॥ १ ॥ तें रूप आवडे भोगितां सावडें ॥ यशोदेसी कोडें बुझावीतू ॥ २ ॥ न होऊनि परिमाण हरपलें ध्यान ॥ आपणचि कृष्ण राम जाहला ॥ ३ ॥ निवृत्तिची जपमाळ हे गोमटी ॥ मन तें वैकुंठीं ठेवियेलें ॥ ४ ॥

## अभंग १०२ वा.

हरिविण दैवत नाहीं पैं आनचित्तीं ॥ अखंड श्रीपती

नाम वाचे ॥ १ ॥ रामकृष्ण मूर्ति या जप आवृति ॥ नित्य-नामें तृप्ति जाहली आह्मां ॥ २ ॥ नामाचेनि स्मरण नित्य पैं सुस्नात ॥ दुजियाची मात नेणों आह्मी ॥ ३ ॥ निवृत्ति जपतु अखंड नामावळी ॥ हृदय कमळीं केशीराज ॥ ४ ॥

## अभंग १०३ वा.

ज्ञानाचीया गोष्टी सांगतां चावटी ॥ भाव नाहीं पोटीं काय करूं ॥ १ ॥ भावबळें देव भावबळें देव ॥ भक्तीचा सद्भाव पहातसे ॥ २ ॥ जना उपदेशी विश्वीं हृषीकेशी ॥ आपण भक्तीसी दुऱ्हावीत ॥ ३ ॥ निवृत्ति ह्मणें ज्ञान हें सकळ ॥ तेथें अद्वैत कृपाळ बिंबतसे ॥ ४ ॥

## अभंग १०४ वा.

नाहीं छाया माया प्रकृतीच्या आया ॥ मनाच्या उपाया नचले कांहीं ॥ १ ॥ तें रूप स्वरूप अपार अमुप ॥ यशोदेसमीप खेळतसे ॥ २ ॥ विश्वाचा विश्वास विश्वरूपा-धीश ॥ सर्वत्र महेश एकरूपें ॥ ३ ॥ निवृत्ति सर्वज्ञ नाम मंत्र यज्ञ ॥ सर्व हाचि पूर्ण आत्माराम ॥ ४ ॥

## अभंग १०५ वा.

सत्यज्ञानानंद गगनाचें प्रावर्ण ॥ नाहीं रूप गुण वर्ण

जेथें ॥ १ ॥ तो म्यां डोळेभरी पाहिला श्रीहरि ॥ पहाता पहाणें दुरी टाकुनिया ॥ २ ॥ ज्ञानदेव ह्मणे ज्योतीची नीज ज्योती ॥ तीहे उभी मूर्ति विटेवरी ॥ ३ ॥

## अभंग १०६ वा.

निर्गुणाची पेटी सगुणासी आली ॥ अर्धमात्रा जाहली इच्छावशें ॥१॥भक्तिप्रेम भावें प्रगटली दैवें ॥ वोळखून घ्यावें गुरूकृपें ॥ २ ॥निवृत्तिप्रसादें स्वयं आत्मखूण ॥ मुक्ताई सोपान ज्ञानदेवीं ॥ ३ ॥

## अभंग १०७ वा.

वेद तो वाचक पुराणें कल्पक ॥ शास्त्रेंही सकळीक बाष्कळचि ॥ १ ॥ बाहुली तो जीव सूत्रधारी शिव ॥ मिथ्या तेचि माव जग जाहलें ॥ २ ॥ ज्ञानदेव ह्मणे दिव्य मी देईन ॥ सद्गुरुची आण स्वयंब्रह्म ॥ ३ ॥

## अभंग १०८ वा.

हारपली सत्ता मुराली वासना ॥ सांवळाचि नयना दिसतसे ॥ १ ॥ कायकरूं माये सांवळा श्रीकृष्ण ॥ सांगितला प्रश्न निवृत्तीनें ॥ २ ॥ बापरखुमादेवीवरू सांवळीये तेज ॥ शेज बाज निज कृष्णसुखें ॥ ३ ॥

## अभंग १०९ वा.

विश्व भुलवी योग माया तो ॥ गोकुळीं रहिवासु तोगे बाई ॥ ॥ १ ॥ वसुदेव कुमरु तो ॥ देवकीनंदनु तोगे बाई ॥ २ ॥ रखुमादेवीवरु तो ॥ शुकादिकां चिंतन तोगे बाई ॥ ३ ॥

## अभंग ११० वा.

समाधीसाधन संजीवन नाम ॥ शांति दया सम सर्वांभूतीं ॥ १ ॥ शांतीची पैं शांति निवृत्ति दातारु ॥ हरिनाम उच्चारु दिधला तेणें ॥ २ ॥ शम दम कळा विज्ञान सज्ञान ॥ परतोनि अज्ञान नये घरा ॥ ३ ॥ ज्ञानदेवा सिद्धी साधन अविट ॥ भक्तिमानि नीट हरिपंथीं ॥ ४ ॥

## अभंग १११ वा.

हरि असे देहीं सर्व काळ संपन्न॥ह्मणोनी चिंतन निरंतर॥ ॥ १ ॥ हरिविण नाहीं हरिविण नाहीं ॥ दिशा द्रुम पाहि विंवलासे ॥ २ ॥ हरीविण देवो नाहीं अन्य भावो ॥ हरि असे सर्व देहभावीं ॥ ३ ॥ सोपान सांगतु हरि सर्वत्रीं वसे ॥ भाग्यवंता दिसे सर्वकाळ ॥ ४ ॥

## अभंग ११२ वा.

हरिविण दुजें नावडे पैं दैवत ॥ हरि हा समर्थ बोले सू-

टि ॥ १ ॥ हरि नाम गोविंद नित्य हाचि छंद ॥ हृदयीं आनंद प्रेम बोधु ॥ २ ॥ हरि हेंचि दैवत समर्थ पैं आमुचें ॥ बोलणें वेदाचें बोलती मुनी ॥ ३ ॥ सोपान अलगटु नाम पाठ वाचे ॥ नित्य विठ्ठलाचे चरण हृदयीं ॥ ४ ॥

## अभंग ११३ वा.

हरि असे देहीं हाचि भाव खरा ॥ वांया तूं सैरा धांवूं नको ॥ १ ॥ धांवतां अवचटें पडसील व्यसनीं ॥ संसार घसणी योनीमाळे ॥ २ ॥ हरि हेंचि ध्यान निरंतर करो ॥ सबाह्य अभ्यंतरीं एकराम ॥ ३ ॥ सोपान ह्मणे राम नांदे सर्वांघटीं ॥ विश्वी जगजेठी भरलासे ॥ ४ ॥

## अभंग ११४ वा.

ज्याचे मुखीं हरि तोची धन्य जगीं ॥ तरलापैं वेगीं वेदु बोले ॥ १ ॥ हरि हाचि आह्मा तत्त्व पैं सोपें ॥हरतीळ पापें हरिनामें ॥ २ ॥ वैकुंठीचें सुख नलगे पैं चित्तीं ॥ हरि हेचि मूर्ति विठ्ठल ध्यावो ॥ ३ ॥ याचेनि स्मरावे कैवल्य साचार ॥ सोपान विचार हरि जपे ॥ ४ ॥

## अभंग ११५ वा.

पैल पैल तें कांहीं नाहीं॥ तेंचि गा तूं पाहो आपणीया॥

॥ १ ॥ आह्मा नाम नाहीं आह्मा रूप नाहीं ॥ नाम रूप नाहीं तेंचि आह्मी ॥ २ ॥ मुक्ताबाई ह्मणे चांगया तूं बूझ ॥ अंतरीचें गूज सांगितलें ॥ ३ ॥

## अभंग ११६ वा.

भजन भावो देही नित्य नामीं पैठा ॥ नामेंचि वैकुंठा गणिका गेली ॥ १ ॥ नाममंत्र आह्मा हरि रामकृष्ण ॥ दिननिशीं प्रश्न मुक्तिमार्गु ॥ २ ॥ नामचि तारक तरले भवसिंधु ॥ हरि नाम छंदु मंत्रसार ॥ ३ ॥ मुक्ताई चिंतन हरिप्रेम पोटीं ॥ नित्यनात घोटी अमृत सदा ॥ ४ ॥

## अभंग ११७ वा.

अवीट न विटे हरिचे गुण ॥ सर्व सनातन ध्यातां रूपें ॥ १ ॥ साध्य हें साधन हरि रूप ध्यानें ॥ रामकृष्णकीर्तनें मुक्त आह्मी ॥ २ ॥ असंगेचि नटु नटलों पैं साचें ॥ नाहीं त्या यमाचे भय आह्मां ॥ ३ ॥ मुक्तता पूर्णता मुक्ताइं लाधला ॥ साधनें दिधली चांगयासी ॥ ४ ॥

## अभंग ११८ वा.

पूर्णपणें सार अविट आचार ॥ सारासार विचार निज तेजें ॥ १ ॥ निर्गुणीं आकार सर्वत्र साकार ॥ एकरूपें वि-

चार निज तेजें ॥ २ ॥ मुक्ताई चैतन्य अवघेंचि घन ॥ आदी अंतु खुण निवृत्तिची ॥ ३ ॥

## अभंग ११९ वा.

अंतर बाहेर निकें सर्व इंद्रियांचें चोज ॥ निजी निज बीज एक तत्त्व ॥ १ ॥आदि नाहीं अनादि नाहीं ॥ तें रूप पाही अवीट बाई ॥ २ ॥ मुक्ताई संजीवन तत्त्वतां निर्गुण ॥ आकार सगुण प्रपंचाचा ॥ ३ ॥

## अभंग १२० वा.

महाक्षेत्र सप्त पुरी ॥ माजीं शिरोमणी पंढरी ॥ १ ॥ कां रे हिंडसी जेथें तेथें ॥ पांडुरंगीं ठेवी चित्त ॥ २ ॥ चंद्र-भागे करितां स्नान ॥ कोटी कुळ्या उद्धरण ॥ ३ ॥ मज आहे हा विश्वास ॥ चांगा विठोबाचा दास ॥ ४ ॥

## अभंग १२१ वा.

पतिव्रता नारी व्यंभिचार केला ॥ परपुरुष पूजिला बा-ईये वो ॥ १ ॥ पतिव्रता नारी ऐसें ह्मणावें ॥ नामपैं ठे-वावें अव्यक्तासी ॥ २ ॥ चांगा द्वैत होता तो अद्वैत जाह-ला ॥ सोहंशब्दें राहिला वटेश्वरीं ॥ ३ ॥

## अभंग १२२ वा.

कुडी हे नोवरी आत्मा हा नोवरा ॥ दोघे पर्णूं जाती

निरंतरा ॥ १ ॥ पंचहीप्राण छत्तीस वऱ्हाडी ॥ आशा तृ-
ष्णा दोन्ही देशधडी ॥ २ ॥ शांति निवृत्ति दोघी सुवासिनी
भक्ति करवली सखी बहिणी ॥३॥ वटेश्वर चांगा वर धवा॥
तुह्मी नेऊनी मध्ये बैसवा ॥ ४ ॥

## अभंग १२३ वा.

सहज समाधि बैसला योगी ॥सुषुम्ना मार्गी निरोधोनी॥
॥ १ ॥ गोल्हाट मंडळ भेदोनियां जाये ॥ नादी ते पाहे
डोळेभरी ॥ २ ॥ चांगावटेश्वर सोहं जाहला ॥ अवघाचि
गिळिला बाई येवो ॥ ३ ॥

## अभंग १२४ वा.

वंदावें कवणासी निंदावें कवणासी ॥ लिंपण गगनासी
कैसें लिंपे ॥ १ ॥ नाहीं जया रूप नाहीं जया नाम ॥ तें-
चि व्यापि वर्म सांगतसे ॥ २ ॥ जीवनीं चंद्र बिंब बिंबलें
पैंसाचा ॥ परी नाहीं तयाचा लेप तेथें ॥ ३ ॥ ह्मणे गोरा-
कुंभार नामया जीवलगा ॥आलिंगन देगा मजलागीं ॥ ४ ॥

## अभंग १२५ वा.

काय तें बोलणें काय तें चालणें ॥ परब्रह्मीं राहणें अरे
नाम्या ॥ १ ॥ जेवित्याची खूण वाढी तोचि जाणें ॥ येरा

लाजिरवाणें अरे नाम्या ॥ २ ॥ ह्मणे गोराकुंभार अनुभवी तो जाणें ॥ आज्ञा तेरेसी राहणे अरे नाम्या ॥ ३ ॥

## अभंग १२६ वा.

देवा तुझा कुंभार ॥ नाशी पापाचे डोंगर ॥ १ ॥ ऐशा संतापें हे जाती ॥ घडे साधूची संगती ॥ २ ॥ पूर्ण कृपा भगवंताची ॥ कुंभारगोरा मागें हेचि ॥ ३ ॥

## अभंग १२७ वा.

केशवाचें ध्यान धरुनी अंतरीं॥ मुक्तिके माझारी नाचतसें॥१॥
विठ्ठलाचें नाम स्मरे वेळोवेळा॥नेत्रीं वाहे जळ सद्गदीत ॥२॥
कुल्लाळाचे वंशीं जन्मलें शरीर॥तो गोरा कुंभार हरीभक्त ॥३॥

## अभंग १२८ वा.

पूर्व पुण्य माझें फळासीं हें आलें ॥ विठ्ठलें पाहिलें कृपादृष्टि ॥ १ ॥ विषयाचा संग सहज तुटला ॥ प्रपंच पैं जाहला परमार्थ ॥ २ ॥ गोरीयानें मनीं आठविले पाय ॥ विठोबानें सोय दाखविली ॥ ३

## अभंग १२९ वा.

ऐकावी विठ्ठल धुरें ॥ विनंती माझी वोस त्वरें ॥ १ ॥ करी संसाराची वोहरी ॥ इतुकें मागतों श्रीहरि ॥ २ ॥

कष्ट करतां जन्म गेला ॥ तुझा विसर पडिला ॥ ३ ॥ माळी सांवता मागे संतान ॥ देवा करींगा निसंतान ॥ ४ ॥

## अभंग १३० वा.

मागणें तें आह्मा नाहीं वो कोणासी ॥ आठवावें संतासी हेंचि खरें॥ १ ॥ पूर्णब्रह्म आह्मां ते भक्त दाविती ॥ घडावी संगती तयांसीच ॥२॥ सांवता ह्मणे कृपाकरी नारायण ॥ देव तोचि जाण असे मग ॥ ३ ॥

## अभंग १३१ वा.

नेणो योग याग तपें ॥ वाचें जपे विठ्ठल ॥ १ ॥ हेंचि आमुचें निजधन ॥ सुखसंपन्न विठ्ठल ॥ २ ॥ नलगे संपत्ति मानधन ॥ आह्मां परिपूर्ण विठ्ठल ॥ ३ ॥ सांवतामाळी ह्मणे देवा ॥ मज निरवा संतापायीं ॥ ४ ॥

## अभंग १३२ वा.

मागें बहुतांचा लाग ॥ तोडिला पांग तुह्मी देवा ॥ १ ॥ ह्मणोनियां येतों काकुळती ॥ पुढतो पुढती कींव भाकी ॥ २॥ सांवता ह्मणे विश्वंभरा ॥ तुह्मी उदार त्रिभुवनीं ॥ ३ ॥

## अभंग १३३ वा.

पुंडलीका भुलोनि आला ॥ उभाचि ठेला अद्यापि॥ १ ॥

येती जेजे दुराचारी ॥ दरुशनें उद्धरी नरनारी ॥ २ ॥
सांवता ह्मणे वेद श्रुती ॥ अखंड जयासी ते गाती ॥ ३ ॥

## अभंग १३४ वा.

संदेह गमला ॥ कैसा रेडा बोलविला ॥ १ ॥ सांगा देव कां न होती ॥ निर्जीव चालविली भिंती ॥ २ ॥ कोरडे कागद ॥ उदकीं न लागती बुंद ॥ ३ ॥ निळा ह्मणे खरा ॥ द्यावा संतापायीं थारा ॥ ४ ॥

## अभंग १३५ वा.

एकनाथाची सेवा करी ॥ वाहे घरीं जीवन ॥ १ ॥
गंधअक्षता तुळशी माळा ॥ पुरवी सोहळा करी ऐसा॥ २ ॥
करुनी सडा संमार्जन ॥ पाळीत वचन आज्ञेचें ॥ ३ ॥
निळा ह्मणे यापरी हरी ॥ विराजे घरीं दासाच्या ॥ ४ ॥

## अभंग १३६ वा.

देखतांचि विटेवरी ॥ समान पाउलें साजिरीं ॥ १ ॥ माझें लाचावलें मन ॥ नुठे बैसलें वरून ॥ २ ॥ न सुटे मुंगी येसी गुळ ॥ जेवीं भ्रमरा आमोद कमळ ॥ ३ ॥ निळा ह्मणे तैसें जाहलें ॥ माक्षिकें मोहळा गोवियेलें ॥ ४ ॥

## अभंग १३७ वा.

सुखें जन्मातरें घेऊं ॥ नामें आळवूं श्रीहरीचीं ॥ १ ॥

नाही आह्मा त्याचें कोडें ॥ संसार बापुडें तें काय ॥ २ ॥
कळिकाळाचें भय तें किती ॥ पाया पडती यमधर्म ॥ ३ ॥
निळा ह्मणे सर्वही सिद्धि ॥ रुळती पदीं हरिनामें ॥ ४ ॥

## अभंग १३८ वा.

आतां माझा अंगीकार ॥ करा भार पायां पैं ॥ १ ॥
लावुनियां आपुलिया गुणीं ॥ माझी वाणी रंजवा ॥ २ ॥
भाळी भोळी करीन सेवा ॥ तुमची देवा ती घ्यावी ॥ ३ ॥
निळा ह्मणे विनवूं नेणें ॥ परि पोसणें मी तुमचें ॥ ४ ॥

## अभंग १३९ वा.

धन्य धन्य आज दिन ॥ तुमचें जाहलो या दरुशन॥१॥
आज भाग्यें उदया आलें ॥ देखिलीं संतपाउलें ॥ २ ॥
पूर्वपुण्य फळा आलें ॥ माझें माहेर भेटलें ॥ ३ ॥ सेना ह्म-
णे जाहला ॥ धन्य दिवस आजीं भला ॥ ४ ॥

## अभंग १४० वा.

चिंतन चित्ताला ॥ लावी मनाचे मनाला ॥ १॥ उन्मनीं-
च्या सुखाआंत ॥ पांडुरंग भेटी देत ॥ २ ॥ ऐसा आहे
श्रेष्ठाचार ॥ वेदशास्त्रींचा निर्धार ॥३ ॥ कौटाळुनी पोटीं ॥
सेना ह्मणे सांगूं गोठी ॥ ४ ॥

## अभंग १४१ वा.

तुह्मी संत कृपानिधी ॥ सांभाळावा हा दुर्बुद्धी ॥ १ ॥ तुह्मा आहे शरणांगत ॥ तरी तारावा पतित ॥ २ ॥ अधिकार कांही नाहीं ॥ नकळे भक्तिभाव तोही ॥ ३ ॥ वागवा अभिमान ॥ सेना नाहवी यातिहीन ॥ ४ ॥

## अभंग १४२ वा.

जन्मासि येवोनी पहारे पंढरी ॥ नाचा महाद्वारीं देवापुढें ॥ १ ॥ चंद्रभागे तीरीं करारे स्नान ॥ घ्यारे दरुशन पुंडलीकाचे ॥ २ ॥ सेना ह्मणे माझा पुरलासे हेत ॥ दृष्टिभरुनी पाहत विठोबासी ॥ ३ ॥

## अभंग १४३ वा.

पुण्यभूमी जेथें उभा पांडुरंग ॥ दोषाचा विभाग नाहीं कोणा ॥ १ ॥ ऐशियाचे पाय जाउनीयां धरा ॥ चुकतसे फेरा चौऱ्याशींचा ॥ २ ॥ सेना ह्मणे धन्य विठोबाचे दरुशनें॥ तुटलीं बंधनें बहुतांचीं ॥ ३ ॥

## अभंग १४४ वा.

आतां पाडुरंग स्मरा ॥ जन्ममृत्यु चुकवा फेरा ॥ १ ॥ ऐसा कांहीं करा नेम ॥ मुखीं स्मरा रामनाम ॥ २ ॥

चित्ता सर्वें ध्यान ॥ तेणें आतां समाधान ॥ ३ ॥ नामा ह्मणें हरीदास ॥ यासी असावा अभ्यास ॥ ४ ॥

## अभंग १४५ वा.

विठ्ठल कानडा बोलूं जाणें ॥ त्याची भाषा पुंडलीक नेणे ॥ १ ॥ युगें अठ्ठाविस जाहलीं ॥ दोघां नाहीं बोला बोली ॥ २ ॥ कर ठेवूनी कटावरी ॥ उभा भिवरेचे तीरीं ॥ ॥ ३ ॥ नामा ह्मणे स्वामी माझा ॥ उभा भक्ताचीया काजा ॥ ४ ॥

## अभंग १४६ वा.

आतां माझी चिंता तुज नारायणा ॥ रुक्मिणीरमणा वासुदेवा ॥ १ ॥ द्रौपदी संकटीं वस्त्रें पुरविलीं ॥ धांव त्वां घेतली गजेंद्रासी ॥ २ ॥ उपमन्यु आळी देवा पुरविली ॥ अढळपदीं दिली वस्ती ध्रुवा ॥ ३ ॥ नामा करितसे विनंति केशवा ॥ तूं माझा विसावा पांडुरंगा ॥ ४ ॥

## अभंग १४७ वा.

भक्ताची अपेक्षा धरुनी अंतरीं ॥ राहे भीमातीरीं पंढरीये ॥ १ ॥ अठ्ठाविस युगें गेलीं विचारितां ॥ निर्गमु सर्वथा नव्हे देवा ॥ २ ॥ कटींकर उभा शीणलें शरीर ॥ धरूनि

निर्धार भक्ति भाव ॥ ३॥ नामा ह्मणे आतां नको खटपट॥ आमुचे बोभाट नको पाहूं ॥ ४ ॥

## अभंग १४८ वा.

कपट नाटका कल्लोळ करुणा ॥ मजलागीं नारायणा धांवसी आतां ॥ १ ॥ रात्रंदिवस मज ठेवूनि जवळ ॥ घालिसी कवळ मुखामाजी ॥ २ ॥ पेंद्यासुदाम्याचे करिसी कैंवार॥ मजसीं अंतर केलें आतां ॥ ३ ॥ नामा ह्मणे आह्मी करितों बोभाट ॥ भिऊं नको भेट केशीराजा ॥ ४ ॥

## अभंग १४९ वा.

पतित तारिले ॥ ऐसें गाजलें ब्रीद तें ॥ १ ॥ ऐसा आहे भरंवसा ॥ दीना दासा तुमचा तो॥२॥जनी ह्मणे उपासना ॥ नारायणा पुरवावी ॥ ३ ॥

## अभंग १५० वा.

जन्मजन्मांतरीं ॥ दासी मी खरी नामयाची ॥ १ ॥ देवा पुरवी माझा हात ॥ नको चित्त वेगळें ॥ २ ॥ जनी ह्मणे अगा देवा ॥ हेत पुरवावा माझा ॥ ३ ॥

## अभंग १५१ वा.

धन्य धन्य जगीं ठाव ॥ धन्य भक्त नामदेव ॥ १ ॥ देव

केला जेणे ऋणी ॥ भक्तांमाजी शीरोमणी ॥ २ ॥ नामदेवाचे चरणी ॥ लोळतसे दासी जनी ॥ ३ ॥

## अभंग १५२ वा.

नामा जातां राऊळासी ॥ देव हांसुन बोले त्यासी ॥ १ ॥ येई येई बारे नाम्या ॥ माझ्या प्रेमा असों दे ॥ २ ॥ धांवोनीयां गळां मिठी ॥ घाली जनी ह्मणे जगजेठी ॥ ३ ॥

## अभंग १५३ वा-

मनामार्गे मन लावूं ॥ तेथें सर्व सुख पाहूं ॥ १ ॥ आतां आह्मा काय उणें॥२॥कृपा केली नारायणे जनी ह्मणे मन ॥ करूं देवाचे आधीन ॥ ३ ॥

## आरती विठलाची-

युगें अठ्ठावीस विटेवरीउभा ॥ वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा ॥ पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आलें गा ॥ चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय पांडुरंगा ॥ रखुमाई वल्लभा पावें क्षिवलगा ॥ धृ० ॥ तुळसोमाळा गळां करठेवुनि कटीं ॥ कांसे पीतांबर कस्तुरी लल्लाटीं ॥ देव सुखकर नित्य येती भेटी ॥ गरुड हनुंमत पुढें उभे राहती ॥ ज० ॥ २ ॥ धन्य वेणुनाद अनुक्षेत्रपाळा ॥

सुवर्णाच्चीं कमळें पद्माळा गळां ॥ राई रखुमाबाई राणीया सकळां ॥ ओंवाळिती राजा विठोबा सांवळा ॥ ३ ॥ ओवाळूं आरत्या कुरवंड्या येती ॥ चंद्रभागेमध्यें सोडुनियां देती॥ दिंडी पताका वैष्णव नाचती ॥ पंढरीचा महिमा वर्णावा किती ॥ ४ ॥ आषाढीं कार्तिकीं भक्तजन येती ॥ चंद्रभागेमाजी स्नानें जे करिती ॥ दर्शनहेळा मात्रें तयां होय मुक्ती॥ केशवासी नामदेव भावें ओंवाळीती ॥ जय देव० ॥ ५ ॥

## आरती विठलाची.

येईं येईं हो विठले माझे माउलीये ॥ निढळावरी कर ठेउनी वाट मी पाहें ॥ धृ ॥ आलिया गेलिया हातीं धाडीं निरोप ॥ पंढरपुरीं आहे माझा मायबाप ॥ १ ॥ पिंवळा पीतांबर कैसा गगनीं झळकला ॥ गरुडावरी बैसोनी माझा कैवारी आला ॥ २ ॥ विठोबाचें राज्य आह्मां नित्य दिवाळी ॥विष्णुदास नामा जिवें भावें ओंवाळी ॥३॥ येईं येईं हो०॥

## अभंग समाप्त.

# भजनी बोधपर पदसंग्रह.

## ॥ भजन. ॥

॥ स्वामी महाराज संत दलमें ॥ बिजली चमके बादलमें ॥

## पद १ लें.

दत्तात्रेय अवधूता, जनार्दन स्वामी एकनाथा ॥ गुरुदत्तात्रेय० ॥ दत्तात्रेय अ० ॥ धृ० ॥ दत्त अवधूत, अवधूत निराकार, स्मरणीं पावे सत्वर ॥ शुद्ध अविनाश, अविनाश सुंदर, स्वरूप हें दिसे मनोहर ॥ पतित मी पापी, पापी दुर्धर, नेइं तूं भवसिंधुपार ॥ मागणें हेंचि, हेंचि सत्वर, मस्तकीं ठेविं अभय कर ॥ सगुण हें रूप, रूप दाविं आतां, जनार्दन स्वामी एकनाथा ॥ गुरुदत्ता० ॥ दत्ता० ॥ १ ॥ मुख्य निवास, निवास मेरुशिखरीं, समाधि निद्रा माहूरीं ॥ स्नान सारिलें, सारिलें गंगातीरीं, तिलक रेखिला पंढरीं ॥ मध्यान्ह भिक्षा, भिक्षा करवीरीं, भोजन केलें कावेरी ॥ सायंसंध्या, संध्या सागरीं, मुख्य आसन केदारीं ॥ जाऊनि चरणीं, चरणीं ठेवूं माथा ॥ जनार्दन स्वामी एकनाथा ॥ गुरुद० ॥ द० ॥ २ ॥ भस्मभूषित, भूषितदिव्य कांती, माळा त्रिशूळ डमरु हातीं ॥ गळां वनमाळ, वनमाळ वैज-

यंती, कर्णीं कुंडलें सूर्यदीप्ती ॥ माथां मुकुट, मुकुट चंद्र-
ज्योती, पाहतां वेधली मनोवृत्ती ॥ आकर्ण नयन, नयन म-
दनमूर्ती, वर्णितां मौनावल्या श्रुति ॥ तेथें मी पामर, काय
वर्णु आतां, जनार्दन स्वामी एकनाथा ॥ गुरुद० ॥ ३ ॥
अत्रि अनुसूया, अनुसूयात्मज दत्त, त्रिगुण अवतार मूर्तिमंत
॥ कटिं मेखळा, मेखळा रत्नजडित, चरणीं नेपुरें रुणझुणत
॥ प्रसन्न हें वदन, वदन हर्षयुक्त, तारिले पतित असंख्यात॥
अखंड हें नाम, नाम वदनांत, मूर्ति मम बिंबली हृदयांत ॥
अभय वर देई, देई गुरुनाथा, जनार्दन स्वामी एकनाथा ॥
गुरुद०॥दत्ता०॥४॥ लक्ष चौऱ्यांशीं, चौऱ्यांशीं जन्म वायां,
म्यां भोगिले गुरुराया॥भक्तवत्सला, वत्सला दत्तराया, करावी
कृपेची छाया ॥ मागणें हेंचि, हेंचि दत्तराया, न्यावें मातें
निज ठाया ॥ कृष्णात्मजातें, तारिं आतां, जनार्दन स्वामी
एकनाथा ॥ गुरुदत्तात्रेय, दत्तात्रेय अवधूता, जनार्दन स्वामी
एकनाथा ॥ गुरुद० ॥ ५ ॥

## पद २ रें

दत्तात्रय अवधूता जनार्दन स्वामी एकनाथा ॥ गुरुदत्ता-
त्रय ० ॥ धृ ॥ जन्म दिला, दिला राव देवानें, वागविलें
माता पित्यानें ॥ कडि खांद्यावर, खांद्यावर घेऊन, रजाचा

गज करून ॥ नवखंड दाखविलें, दाखविलें त्यानें, कृपेचा सागर होऊन ॥ ह्मणून मी सेवा, करीन एकचित्ता, मग आठवीन रघुनाथा ॥ गुरु दत्ता० ॥ १ ॥ मायबापाचे, बापाचे उपकार, शिरावर जाहले बहु फार ॥ पाजली अठरा, अठरावी धार, अवघें त्याचें शरीर ॥ ह्मणून मी सेवा करिन एक चित्ता, मग आठवीन रघुनाथा ॥ गुरु दत्तात्र० ॥ २ ॥ मायबापाचे, बापाचे कृपेनें, विठुराव आले चालून ॥ कर कटीवर, कटीवर ठेवून, उभे विटेवर राहून ॥ असा एक पुत्र, पुत्र श्रावण, कावड केली हौसेन ॥ काशिला जातो, जातो श्रावण, लागली निर्वाणी तान ॥ झारी घेऊन, जात श्रावण, बाण मारिला दशरथान ॥ श्रावण ह्मणेरे, ह्मणेरे दशरथा, पाणी घेऊन पाजीं मातापिता ॥ अखंड सेवा, घडो तुज एक चित्ता, गम आठवीन रघुनाथा ॥ गुरु दत्तात्र० ॥ ३ ॥ मायबापाचे, बापाचे कृपेन, गुरु म्यां केला सज्जन ॥ कान फुंकिले, फुंकिले गुरूनें, विद्या दिली भगवंतानें ॥ रामचंद्रनाथ, नाथ गावण, पितृभजनीं त्याचें ध्यान ॥ ह्मणून मी सेवा, करीन एक चित्ता, गम आठवीन रघुनाथा ॥ गुरु यत्तात्रय अवधूता, जनार्दन स्वामी एकनाथा ॥ गुरु दत्तात्रय० ॥ ४ ॥

## पद ३ रें

दत्तात्रय चतुराक्षस मंत्र संत सख्यांपाशीं ॥ शरण रिघोनी जरी घे तरी तुज नित्य घडे काशी ॥ धृ० ॥ दर्पण दाविती संत समर्थ किं तें त्वंपद ॥ दगड पुजावे नलगे कांहीं सहज सुखानंद ॥ दरवाजे नव बंद करावे हा मिथ्या वाद ॥ दम शम केल्या दर्शन देतो स्वामी अभेद ॥ दत्तात्रय० ॥ १ ॥ तारक विश्व कदंबा पाहतां मग कैंची अहंत ॥ ताठा सरला जाणिव झाली सहज आली लीनता ॥ तामस हा गुण सहज निवाला मनीं आली समता ॥ तांडव करणें नलगे कांहीं अवघी गुरुसत्ता ॥ दत्ता० ॥ २ ॥ तृण पाणी सर्वांभूतीं भरला एकचि पवित्र ॥ त्रैलोकीचें मंडण स्वामी केवळ सत्पात्र॥ त्रिगुणरहित निरंतर ध्यान परम पवित्र ॥ त्रिपदा जप गायत्री करणें वेदांचें अंत्र ॥ दत्ता० ॥ ३ ॥ यत्र भूमंडळ उभारिलें हें जोडाक्षर मायें ॥ एकची असतां द्विविधा झाली साम्यातें काये ॥ येणें जाणें नलगे कांहीं अपाय उपाय ॥ एकचि मध्वनाथ वंदी सद्गुरुचे पाय ॥ दत्तात्रय० ॥ ४ ॥

## पद ४ थें.

सच्चा गोदड गावोजी निजपद पावोजी ॥ सच्चा गोद०॥

॥ धृ० ॥ गंगातीरमों स्नान करके पंढरपूर शिरखंडा ॥ कोल्हापूरमों भिक्षा मांगे लेकर हातमों दंडा ॥ सच्चागो० ॥ १ ॥ पांचाळेश्वर रोटी खावे, तुळजापुर करधोता ॥ शेषाचलपर आसन कियो, माहुर गढपर सोता ॥ सच्चा गो० ॥ २ ॥ दत्त दिगंबर गुरु साहेबजी आखया मौज बैठे ॥ पीतांबरकी कास कसी है ब्रह्म भुवनमें लेटे ॥ सच्चा गो० ॥ ३ ॥ निराकारमों बस्ती जाको, निरंजनसो बाता ॥ सबदुनयाके आगे साहेब फरे अलखमों रेहेता ॥ सच्चा गोदडगावोजी निज० ॥ ४ ॥

## पद ५ वें.

अरे हरी प्यालों मी प्याला॥प्याला नामाचा, छंद लागला विठोबाचा ॥ करून चौरंग चौरंग देहाचा, आंत खुब जडाव रत्नांचा ॥ च्यारी माचवे, माचवे शौकोनी, केव्हांची विठ्ठलरुक्मीणी ॥ १ ॥ झालें मी मगन, मगन हरिभजनीं, केव्हांची विठ्ठलरुक्मीणी ॥ झालें मी मगन ॥ धृ० ॥ तीनशें साठ, साठ तुकड्यांचा, चौरंग अमोल मोलाचा ॥ दोरा गुंफिला, गुंफिला सत्वाचा, आकार तिन्ही लोकांचा ॥ चारी कमळें, कमळें विश्वमोहनी ॥ केव्हांची विठ्ठल रुक्मीणी ॥ झालें मी मगन०॥२॥लाऊन दरवाजा, दरवाजा कारागीर; बत्तीस

शिपाई चौकीदार॥आणिक नव खिडक्या, खिडक्या चौफेर, मेरु शिखर दशमद्वार ॥ तेंहि गुप्त, गुप्त दावोनी ॥ केव्हांची वि० ॥ ३ ॥ गिलावा रोगण, रोगण हो करूनी, आंत तें सत्राविचें पाणी॥ रूप सुंदर, सुंदर नानायोनी, तेज फांकलें त्रिभुवनीं ॥ वर शिवशक्ति, शक्ति स्थापोनी, ॥ केव्हांची वि० ॥ ४ ॥ ऐसा चौरंग, चौरंग वनवीला, कोंदणीं हिरा वैसवीला ॥ शिवलिंग ळोळे, ळोळे गुरुचरणीं ॥ केव्हांची विठ्ठल रुक्मीणी, झालें मी मगन॥मगन हरिभजनीं॥के०॥५॥

## पद ६ वें.

माझी विनवणी, विनवणी हरिला सांगा ॥ कधीं भेटशील पांडुरंगा॥धृ०॥अहो हरी, संत तुझी दयाळ॥ दयाळ करूनि कृपा ॥ भेटवा केशव मायबापा ॥ भवनदीं बुडतों, बुडतों भवतापा॥कोण सोडविल देवा आतां॥चाल॥काय मी करूं ॥ अरे हरि काय मी करूं ॥ कोणता मार्ग मी धरूं ॥ तोड॥धरूं संतसंगा ॥ कधीं भेटशील पां० ॥ १ ॥ अरे हरी गोपीवल्लभा ॥ वल्लभा गोपवेषा ॥ मज दाविसी हृषीकेशा ॥ हरी तुजवीण, तुजवीण दाही दिशा ॥ विघ्न निवारीं हृषीकेशा ॥ चाल ॥ आहो हरि जीव बावरा ॥ भवनदी खोल भोंवरा॥ धांवूनि मज आवरा ॥ तोड ॥ आवरा अंतरंगा ॥ कधीं

भेटशील पां० ॥ २ ॥ अहो हरि वहिण द्रौपदी ॥ द्रौपदीच्या काजा, कैसा पावलास यदुराजा ॥ वस्त्रें पुरविलीं, पुरविलीं महाराजा ॥ लज्जा राखिली अधोक्षजा ॥ चाल ॥ अहो हरि ऐका करुणा ॥ सांवळीया नारायणा ॥ तोड ॥ सकळ दुर्जना दुरितभंगा ॥ कधीं भेटशील पांडुरंगा ॥ ३ ॥ अहो हरि करुणा भाकीत, भाकीत दिनरजनीं ॥ दीन माधवा मोक्षदानी ॥ माझे अपराध, अपराध करा श्रवणीं ॥ किती आळवी चक्रपाणी ॥ चाल ॥ अहो हरि झालें बा वेडी ॥ जिव जातां बहुतांतडी ॥ तुजविण जिवलग गडी ॥ तोड ॥ गुंडकेशवी परमानंदा ॥ कधीं भेटशी० ॥ ४ ॥

## पद ७ वें.

पाहिलें स्वप्न स्वप्नींचे अवसरीं ॥ जणूं मी कां होतें पंढरपुरीं ॥ धृ० ॥ करूनि एकचित्त ॥ एकचित्त सत्वर ॥ हरुषलें मन माझें फार ॥ सोडुन प्रपंच, प्रपंच घरदार, मिळाले संतांचे भार ॥ हरुषलें मन माझें फार ॥ चाल ॥ जावें संगातीं येकमेकां धरुनी हातीं, टाळ मृदंग वाजती ॥ जणूं कां द्वारीं ॥ जणूं० ॥ १ ॥ चंद्रभागेसी आला पूर ॥ संत मिळाले अपार ॥ दिंडी पताका एकसर ॥ होतो हरिनामाचा गजर॥ उतरलों पार, पाहिलें पंढरपूर ॥ जणूं भक्तीचें माहेर ॥ उभा

पुंडलीकाचे द्वारीं ॥ जणूं पाहिलें० ॥ २ ॥ सहज मी गेलों, गेलों राउळांत॥पाहिली गरुडपारीं मात ॥ सभा मंडप, मंडप न्याहाळीत ॥ ठेविले कटावरी हात ॥ चाल ॥ पाहिली दृष्टी, सत्यभामेच्या घेतल्या भेटी॥ उभे पांडुरंग जगजेठी, जगजेठी कैवारी ॥जणूं०॥३॥ अहो हरि वाहिला बुका, बुका तुळसी-माळा, गंध अक्षता प्रेमळा ॥ वसुदेव देवकी, देवकीच्या बाळा ॥ नंद येशोदा करूं सोहळा ॥ चाल ॥ तुझें नाम घेतां, सर्वांसीं पावन होतां॥तुकाराम विनविता, विनविता वारंवारी ॥ जणूं कां पाहिली पंढरपुरी ॥ ४ ॥

## ॥ भजन ॥

॥ देव आला हो आला ॥ गोकुळांत आनंद झाला ॥

## पद ८ वें.

भक्तांसाठीं तो जगजेठी बसोनि माळ्यावर ॥ पांखरें उडवी सारंगधर ॥ धृ० ॥ भक्तांमध्यें भक्ति पहा त्या बोधल्यानें केली ॥ थोटच्या ताटांना कणसें आलीं ॥ ऐसा तो देव अनंत विठ्ठल अनंत रूपें ख्याली ॥ कशी देव भक्तांची माउली ॥ त्याचे चरणापाशीं विनंति जोडुनि कर ॥ पांखरें उडवी सारंगधर ॥ १ ॥ नामदेवासी ह्मणती ब्राह्मण जात

तुझी वांगळ ॥ नीघ बाहेर करिशी विटाळ ॥ तेव्हां तो गेला देउळामागें ॥ केले दगडाचे टाळ ॥ हरीनें फिरविलें देऊळ ॥ अगाध लीला त्याची ॥ द्वारका एके खांबावर ॥ पांखरें उडवी सारंगधर ॥ २ ॥ जनाबाईच्या घरीं भरिल्या पाण्याच्या घागरी ॥ चहूं हातांनीं रांजण भरी ॥ दळण कांडण धुणें धुवोनी पाटी डोईवरी ॥ गंवऱ्या वेंचून आणि घरीं ॥ प्रल्हादाला तेव्हां तारिलें जळत अग्नीवर ॥ पांखरें उडवी सारंगधर ॥ ३ ॥ चोख्यामेळ्याचे घरीं देवानें सोडिली द्वादशी ॥ तेव्हां तें श्रुत झालें रायासी ॥ नेलें पाचारुनी रायें तेव्हां शिक्षा दिधली त्यासी ॥ देवा तूं मार त्याचा खासी ॥ अगाध तुझी माव कळेना ॥ तुका जोडुनी कर ॥ पांखरें उडवी सारंगधर ॥ ४ ॥

## पद ९ वें.

पुरे एकचि पुत्र मायपोटीं ॥ हरि स्मरणें उद्धरी कुळें कोटी ॥ १ ॥ धन्यवंशीं जन्मला भगीरथ ॥ गंगा आणोनि पूर्वज केले मुक्त ॥ २ ॥ गौतमानें आणिली गोदावरी ॥ आपण तरोनी दुजयासी तारी ॥ ३ ॥ पांच वर्षांचें ध्रुव बाळक तान्हें ॥ अढळपदीं स्थापिलें बहुमानें ॥ ४ ॥ तेजःपुंज शीतल सौख्यदानीं ॥ एक चंद्रप्रकाश त्रिभुवनीं ॥ ५ ॥ पहा

कैसा तो पुंडलीक धीट ॥ उभा केला वैकुंठनायक ॥ ६ ॥
रामरूपी जन्मला किर्तिवंत ॥ अंजनीचे उदरीं हनुमंत ॥७॥
तुका ह्मणे हरिसीं विन्मुख ॥ गांधारीचे उदरीं शत मूर्ख ॥ ८ ॥
पुरे एकचि पुत्र० ॥

## पद १० वें.

धूतांच मोतीं जळीं हरपलें सखोल मोठें पाणी ॥ चला पाहूं सहा चार अठराजणी ॥ ध्रु० ॥ प्रपंच धोंडा मृगजळ पाणी ॥ आपटीत होतें चोळी॥विसरलें सुख घसरलें तळीं ॥ सखे मायेनें मोतीं दडविलें भवसिंधूच्या जळीं ॥ होती गडे भ्रांति बहिण जवळी ॥ तिणेंच मजला गोष्टी विनविल्या चित्त गेलें भुलोनी ॥ चला पा० ॥ १ ॥ आठजणीनीं मोतीं दडविलें वर ठेविला धोंडा॥ अशाच पहाती अवव्या रांडा ॥ बारा सोळा तळीं उतरल्या त्यांनीं धरिला दांडा ॥ ठाउक सत्राविला झेंडा ॥ त्यामध्यें मी गर्क झालें एकलीच बाई वनीं ॥ चला पा०॥ २ ॥ चवधीजणी सत्वर मिळोनी डोळीं अंजन घाल॥माझ्या मोत्याला प्रेमें न्याहाळा ॥ ज्ञानबोधाची लावून दिवटी वरती वात उजळा॥माझे मोत्याला सर्व कळा॥ प्रपंच पडदा फाडून गुरुपदीं लावा गे ठिकाणीं ॥ चला पा० ॥ ३ ॥ चौघीजणी मोक्ष नाईका मजला धरा हातीं॥ उतरा

सागरपैल पंथीं ॥ या मोत्याच्या साठीं मजला जाणें आहे सती॥ ह्मणून मी येतें काकुळती ॥ ज्ञानदेव ह्मणे चिन्मयमोतीं न मिळे गुरुवांचुनी ॥ चला पा० ॥ ४ ॥

## पद ११ वें.

विटेवरी उभी हो विठ्ठले ॥ पहातां मन माझें रमलें ॥ ॥ ध्रु० ॥ दीन पाहूनि सुदामा ॥ दिधली कांचनपुरी धामा ॥ भक्ति माउली विठ्ठले ॥ पहातां मन मा० ॥ १ ॥ दीन पाहुनि दामाजीपंता॥परिहार झाला श्रीमंता ॥ अर्जी लिहिली विठ्ठलें ॥ पहातां म०॥ २ ॥ पचविली वाटी विषाची॥लज्जा राखिली मिराबाईची ॥ स्वरूप ओळखिलें विठ्ठलें ॥ पहातां० ॥ ३ ॥ प्रश्न वाढविला ज्ञानाचा ॥ अभिमान धरला रेड्याचा ॥ वेद बोलले त्रिवाचा ॥ सेवक झाला नाथाचा॥ गंध उगळिलें विठ्ठलें ॥ पहातां मन माझें रमलें ॥ ४ ॥

## पद १२ वें.

तें रूप पहावें गे बाई पहावें गे ॥ तरीच जन्मा यावें ॥ ॥ ध्रु० ॥ चिंतिती हरिहर तें रूप सादर ॥ अलक्ष अगोचर॥ तेथें मन हें न्यावें गे बाई न्यावें गे ॥ तरीच जन्मा यावें ॥तें रूप प० ॥ १ ॥ उलट पलट कर, त्रिकुट शिखरपर ॥ अ-

मृत झर झर वाहे निरंतर ॥ योगबळानें प्यावें गे बाई प्यावें गे ॥ तरीच ज०॥ २ ॥ झां झां झंगड वाजे अवघड॥ नाद भडाभड होती कडाकड ॥ अनुहत त्याचें नांव गे ॥ बा० ॥ तरीच ज० ॥ ३ ॥ निजानंदें निज आनंदें॥ नारायण श्रीरंगीं रंगुनि ॥ जावें गे बाई जावें गे॥ तरीच जन्मा यावें ॥ तें रूप पहावें गे बाई० ॥ ४ ॥

## ॥ भजन. ॥

॥तुकोबा आमुचा अळंदिचा॥त्यानें देव आणिला पंढरीचा ॥

## पद १३ वें.

देव कांहो विटेवरी उभा उभा ॥ देव कां० ॥ धृ० ॥नका पुसूं बाई ॥ वेदासीं कांहीं ॥ कळलें नाहीं ॥ तोड ॥ शेष शिणला झाल्या दोन जिभा जिभा ॥ देव० ॥ १ ॥ सखी पुसे सखयासीं ॥ युगें अठ्ठाविस झालीं कीं ॥ चाल ॥ कटावरी कर ॥ भीमातीर ॥ तोड ॥ वाळवंटीं संत सभा सभा ॥ देव० ॥ २ ॥ तेथें गोपाळ लुटतो काला ॥ हरिनामें तयांचा गलबला ॥ चाल ॥ गण नाहीं गोत ॥ मिळाले संत ॥ तोड ॥ आला तयांचीया लोभा लोभा॥देव० ॥ ३ ॥ हरि वैकुंठ सांडुनी ॥ आला पुंडलिकालागुनी ॥ चाल ॥

युगानुयुगीं भक्तांलागीं ॥तोड ॥ वाळवंटीं संत शोभा शोभा ॥ देव कांहो विटेवरी उभा उभा ॥ देव० ॥ ४ ॥

## पद १४ वें.

मसिं बोल किंरे केशवा किं सारंगधरा ॥ कां रुसला माझ्या रुक्मीणीच्या वरा ॥ धृ० ॥ आलें बाच्छायाचें मूळ जाऊं कीं काय ॥ मी तुह्मां पुसतें बरें विचारूनि पाहें ॥ या त्रैलोक्यामध्यें माझें कोणी नाहीं ॥ दीनबंधु दयाळ तूंच बाप माई ॥ शरणागत हरि आलें मजकडे परतोन पाहीं ॥ मग या मारिले त्याची बिशाद काय ॥ नको देऊं दुसऱ्याचे हातीं तारीं महाराजा ॥ कां रुसला मा०॥ १ ॥ नारद मागूं आला तुझी कांता ॥ नारदाची नारदी जाहली पहातां पहातां ॥ सोळा हजार स्त्रिया प्रीतीनें नांदविता ॥ त्या वेळीं कसी सांडिली तुह्मी अहंता ॥ सोळा हजार स्त्रिया त्यांवर तुमची ममता ॥ मी कशी अपराधी सांगा कीं हो अनंता ॥संचितीं विधिनें बाच्छाई लिहिला वरा ॥ कां रुसला० ॥ २ ॥ मी वैश्याची कन्या ह्मणूनि करितां अपमान ॥ जांबुवंती केली कोणाची सांग प्रिया मान ॥ ती दैत्याची कन्या सत्यभामा तिचा राखिला मान ॥ कां माझ्या वेळे वाहिलीस तूं आण॥

मसि बोल किं रे केशवा कीं सारंगधर॥कां रुसला०॥ ३ ॥

## पद १५ वें.

बहु नेत्र शिणले माझे हरि कांहो येइना ॥ धृ० ॥ दोन प्रहर रात्र झाली ऋषि आले भोजना॥निद्रिस्थ आह्मि होतों त्यांनीं केलें आगमना ॥ स्नानसीं पाठवीलें करुं कैशी योजना ॥ बहु ने० ॥१॥ दुर्वास ऋषि क्रोधें आतांची येईल॥ घाबरला जीव माझा ब्रीद तुझें जाइल॥यासमयीं नीज आली कां जागा होइना ॥ बहु ने० ॥ २ ॥ धांवोनी येइ वेगें हरि माझे पाठिसीं ॥ कैवारी बंधुराया आज माझे भेटिसीं ॥ घाबरला जीव माझा धरिं मजला पोटासीं ॥ या समयीं नीज आली कैसा डोळा उघडेना ॥ बहु ने० ॥३॥ ऐकोनी दीनवाणी झडकरी आलासी ॥ ऋषि सर्व तृप्त केले महिपती गात जासी॥नरहरि दासा दुःख होतां हरि कोठें राहिना॥बहु नेत्र शिणले माझे हरि कांहो येईना ॥ ४ ॥

## पद १६ वें.

कपट नाटका, सूत्रधारियारे ॥ धरुनी वेष लाविलीं आस, दे पदास, हामाय पाश, सोडवी त्वरारे ॥ धृ० ॥ कमललोचना, भक्त प्रियकराहो ॥ गरुडवाहन, ह्मणनि मो-

हन, कामदहन, करिसीं सहन, मायबाप तूं खरारे ॥ कपट० ॥ १ ॥ शेषवाहना, पद्मप्रियकरारे ॥ ह्मणति लाल, नंदबाल, कंसकाल, तूं दयाळ, प्रेमजाळ ॥ दाविशी बरारे ॥ कपट० ॥ ॥ २ ॥ भक्तभूषणा, शंकरप्रिया रे ॥ गोपीसदन, पाहुनी मदन, करिसी कंदन, दावीं वदन, त्यांसी तूं प्रियारे ॥ कपट० ॥ ॥३॥ लक्ष्मणासी तूं पावसी त्वरें रे ॥ स्मरणें विमल, करुनी शमल, चरणकमल दाविं सत्वरारे ॥ कपट० ॥ ४ ॥

## पद १७ वें.

नवल नेणो कोणी तुह्मी सांगा ब्रह्मज्ञानी ॥ धृ० ॥ चहूं रंगा वेगळी गाय दुभते माझे घरीं ॥ मांजर बाई चोरटें मोठें॥ टपलें लोण्यावरी ॥ नवल० ॥ १ ॥ लोण्याकडे मांजर टपलें पाहिगे उमाबाई ॥ लोण्यानें तें मांजर खादलें ॥ नवल सांगूं काई ॥ २ ॥ आकाशीं करुनी कुमार तिघे पुत्र व्याली ॥ पुत्राचें तें लग्न नाहीं ॥ आपण बाइल झाली ॥ नवल० ॥ ३ ॥ बायको कशी दादल्यासकट पांच पुत्र व्याली ॥ तेथोनीयां वोस करोनी मुळचे घरा आली ॥ नवल नेणो० ॥ ॥ ४ ॥ दास करी आस तुझी मिथ्या सकल माया ॥ केशवाची कृपा झाली ॥ न ढळे अमर काया॥नवल नेणो०॥५॥

## पद १८ वें.

सखे साजणी जिवलग गडणी स्वप्न पाहिलें डोळां ॥ आकाशीं देखिला एक मळा ॥ धृ० ॥ पहिले प्रहरीं उफराटी विहिर मोट लाविली एक ॥ खालीं नाडा वरती चाक॥ तीन बैल आणि माळी निजला अमोलीक ॥ पिकलें पीक तेथें कोल्हा सवकला एक ॥ चाल ॥ या कोल्ह्याला तीन मस्तकें दोन तोंडें थान एक ॥ एक पाट वाहे उदक॥तोड॥ नार देखणी पहाया गेलों विवशी पडली गळां ॥ आकाशीं देखिला एक मळा ॥ १ ॥ दुसरे प्रहरीं स्वप्न देखिलें आईका चित्त देऊन ॥ केलें मडकें कुंभारानें ॥ त्या मडक्याला नऊ छिद्रें आंत भरलें जीवन ॥ त्यामध्यें एक कामीन ॥ चाल ॥ तिच्या मुखांत चवदा लोक ॥ जळीं असून पडला सोक ॥ गेला कुंभार तिच्या पोटांत ॥ तोड ॥ ठाऊक असेल ह्मणून पुसतों तुला ॥ आकाशीं दे० ॥ २ ॥ तिसरे प्रहरीं गाय देखिली काय सांगूं कौतुक ॥ तिच्या मुखांत चौदा लोक ॥ तिजला पाहतां दृष्टि ठरेना कोठें तिची बेठक ॥ दोन तोंडें थान एक ॥ चाल ॥ तिचा पार कळेना कोणा ॥ वेद शास्त्र पुराणा ॥ गुरुमनींच्या खुणा ॥ तोड ॥ ठाऊक असेल ह्म-

णून पुसतों तुला ॥ आकाशीं० ॥ ३ ॥ चवथे प्रहरीं ब्रह्म-मूर्ती मन करून निश्चळ ॥ तिथें पार्वतीची एक वेल॥त्या वेलीची घटखट सरली पहाया बीजाचें मूळ ॥ तेथें ईश्वर गण केवळ ॥ चाल ॥ तेथें वाद्यें वाजती दहा ॥ सद्गुरु कृपा तरी पहा ॥ कवि नाथ निरंजन महा ॥ तोड ॥ जिकडे तिकडे व्यापक अवघा हाची घनदाटला ॥ आकाशीं० ॥ ४ ॥

## ॥ भजन ॥

॥ कृष्ण झेली वा झेली ॥ गोकुळांत मात केली ॥

## पद १९ वें.

येथें कोणाचें काय बा गेलें ॥ ज्याचें त्यानेंच अनहित केलें ॥ ध्रु० ॥ संतीं सांगितलें ऐकेना ॥ स्वतः बुद्धिही असेना ॥ वृत्ति निवरली पिकेना ॥ मूढ कोणाचें ऐकेना ॥ येथें० ॥ १ ॥ अन्य यातीचे संगतीं लागे ॥ साधुजनांमध्यें न वागे ॥ कल्यावीण पराक्रम सांगे ॥ जेथेंचि सांगे तेथें भीक मागे ॥ येथें को० ॥ २ ॥ नीत अनीत चाले ॥ भडभड भलतेंच बोले ॥ मंद होउनी उन्मत्त डोले ॥ अखेर फार वाइट झालें ॥ येथें को० ॥३॥ तुका ह्मणे कांहीं नेम॥ चित्तीं न धरी जो अधम ॥ सांग पडलासे भ्रम ॥ अंतीं

कुटील त्यांसी यम ॥ येथें कोणाचें काय बा गेलें ॥ ४ ॥

## पद २० वें.

यशोदे घरकाडे चाल ॥ मला जेउं घाल ॥ मला जेउं घाल ॥ धृ० ॥ साध्या गव्हांची पोळी लाटीं ॥ पुरणपोळी करून दे मोठी ॥ नाहीं अडवित गुळासाठीं ॥ मला जेउं घाल ॥ य० ॥ १ ॥ तूप लावून भाकर करीं ॥ वांगें भाजून भरीत करीं ॥ वर कांद्याची कोशिंबीरी ॥ मला जेउं घाल ॥ य० ॥ २ ॥ आईग खडिसाखरेचे खडे ॥ लवकर मला करून दे वडे ॥ बाळ स्फुंदस्फुंदोनी रडे ॥ मला जेउं घाल ॥ य० ॥ ३ ॥ आई लहानच घेगे उंडा ॥ लवकर भाजून दे मांडा ॥ लांब गेल्या गाईच्या झुंडा ॥ मला जेउं घाल ॥ य० ॥ ४ ॥ आई मी खाइन शिळा घाटा ॥ दुह्याचा करून दे मठ्ठा ॥ नाहीं माझ्या आंगीं ताठा ॥ मला जेउं घाल ॥ य० ॥ ५ ॥ भाकरी बरिच गोड झाली ॥ भक्षुनि भूक हरपली ॥ यशोदेनें कृपा केली ॥ मला जेऊं घाल ॥ य० ॥ ६ ॥ आई मी तुझा एकुलता एक ॥ गाई राखितों नऊ लाख ॥ गाई राखुन झिजलीं नख ॥ मला जेउं घाल ॥ य० ॥ ७ ॥ नामा विनवी केशवासी ॥ गाइ

राखितों वनासी ॥ जाऊन सांगा यशोदेसी ॥ मला जे० ॥ यशोदे घराकडे० ॥ ८ ॥

## पद २१ वें.

पतितपावन दीन दयाघन करुणाकर देवा ॥ श्रवण मनन निदिध्यासें निरंतर करूं तुझी सेवा ॥ ध्रु० ॥ परम प्रकाशक तेजोमय हें गुप्त तुझें स्वरूप ॥ परतुनि दृष्टीं पाहणें पाहतां निर्गुण हें अरूप ॥ परिपूर्ण परमार्थ साधनें भरलें अमूप ॥ परात्पर तूं अंतरसाक्षी हृदयभुवनदीप ॥ पतित० ॥ १ ॥ तिन्ही संधी साधुनि घेणें सुख हें एकांतीं ॥ तीन गुण हे निरखुनि शून्यीं उगवली हे ज्योती ॥ तीक्ष्ण दृष्टीं पहाणें पाहातां दिवस ना राती ॥ तितुकी प्रतिती बाणलिया मग कुल नाहीं जाती ॥ पतित० ॥२ ॥ तरंगती सकळही जीव हे चित्सिंधु आंत ॥ तरंग जैसे उमटत भासत नासत हे ब-हुत ॥ तरणोपाय सांगती साधु मत हें सिद्धांत ॥ तरले ब-हुत येणें मार्गें देही देहातीत ॥ पतित० ॥ ३ ॥ पान्हा पिउनी प्रेमकळेचा हरिलें संकल्पा ॥ परंपरेनें पाहतां भवभय दोरीच्या सापा ॥ पारंगत हें करुनी सकळही अहं सोहं कापा॥पारख करितां ताठता आली नेत्रांच्या मलपा ॥ पतित० ॥ ४ ॥ ब-

रिली शांती अंगीं झाला पूर्ण अनुभव ॥ वरद बळें सग्दुरुप्रसादें अक्षय वैभव ॥ वमिळें मायिक कवणाचाही नाहीं हा भाव ॥ वदली वाणी मौन्य पाहतां रूप नाहीं नांव॥पति ० ॥ ५ नम्र होऊनि वृत्ति लागली अलक्ष हें लग्न ॥ नटत नटत हे कळा अंतरीं होउनियां मग्न ॥ नख नलगे जेथ देह बुद्धिचें विकासलें गगन ॥ नमुन सोहिरा ह्मणे किं अवघा अलक्ष निरंजन ॥ पत्ति० ॥ ६ ॥

## पद २२ वें.

दशरथनंदन बाळ ॥ सीते घालिं त्यासि माळ ॥ ॥ धृ० ॥ मदनमनोहर रूप जयाचें, करिल तुझा प्रतिपाळ ॥ सीते० ॥ १ ॥ राम सखा हा मन्मथपुतळा, दिसतो सुंदर बाळ ॥ सीते० ॥ २ ॥ काळा डोंगर अंतरिं ओंगळ, रावण हा फटकाळ॥सीते० ॥ ३ ॥ देखुनि रूप वेडावले भूप, अंतरिं घोटिति लाळ ॥ सीते० ॥ ४ ॥ मध्वमुनीश्वर स्वामि रमापति, दानवकुळिंचा काळ ॥ सीते० ॥ ५ ॥

## पद २३ वें.

येडका मदन, तो केवळ पंचानन ॥ येडका० ॥ धृ० ॥ थडक मारिली नारदा, केला रावणाचा चेंदा ॥ दुर्योधना मारिली गदा, घेतला प्राण ॥ तो केवळ पंचानन० ॥ १ ॥

थडक मारिली शंकरा, केला ब्रम्ह्याचा मातेरा ॥ इंद्रा चंद्रासि भेदरा ॥ लाविला ज्यानें ॥ तो केवळ पंचानन० ॥ २ ॥ भस्मासुर मुकला प्राणासी ॥ तीच गत झाली वाळीसी ॥ तिसरा विश्वामित्र ऋषि, नाडिला जेणें ॥ तो केवळ पं० ॥३॥ शुकदेवानें ध्यान धरोनी ॥ येडका आणिला आकळोनी ॥ एका जनार्दनाचे चरणीं ॥ लाविला जेणें ॥ तो केवळ पंचानन ॥ येडका मद० ॥ ४ ॥

## पद २४ वें.

ऐसा गे माय कैसा हा योगी ॥ जे ठायीं जन्मला तो ठाव भोगी ॥ ध्रु० ॥ माय कुमारी बाप ब्रह्मचारी ॥ एकविस पुत्र झाले उदरीं ॥ ऐसा गे माय० ॥ १ ॥ आचार सांडोनी झालाअसे भ्रष्ट ॥ मावशीसंगें लाविला पाट ॥ ऐसा गे माय० ॥ २ ॥ आणिक याचें नवल सांगू मी काई ॥ बहिण भोगिली एकेची ठायीं ॥ ऐसा गे माय० ॥ ३ ॥ पित्याचा अंश घेऊनि आला ॥ मातेसी जेणें उपभोग केला ॥ ऐसा गे माय० ॥ ४ ॥ ज्ञानदेव ह्मणे अनुभवीं जाणें ॥ अनुभवावांचून कांहींच नेणें ॥ ऐसा गे माय कैसा हा योगी ॥ जे ठायीं जन्मला तो ठाव भोगी ॥ ५ ॥

## पद २५ वें.

कैवारी हनुमान ॥ आमुचा कैवारी ह० ॥ ध्रु० ॥ पाठीं असतां तो जगजेठी ॥ वरकड काय गुमान ॥ आमुचा कैवारी ह० ॥ १ ॥ नित्य निरंतर भजकां रक्षी ॥ धरोनियां अभिमान ॥ आमुचा कैवारी ह० ॥ २ ॥ दासा रक्षिल हाचि भरोंसा ॥ वदतसे त्याची आण ॥ आमुचा० ॥ ३ ॥

## पद २६ वें.

सगुण चरित्रें परम पवित्रें हरिचीं वर्णावीं ॥ सज्जनवृंदें मनोभावें आधीं वंदावीं ॥ ध्रु० ॥ संतसंगें अंतरंगें नाम बोलावें ॥ किर्तनरंगीं देवासन्निध सुखें डोलावें ॥ सगुण चरित्रें० ॥ १ ॥ भक्तिज्ञानाविरहित गोष्टी इतरा न कराव्या ॥ प्रेमभरें वैराग्याच्या युक्ती विवराव्या ॥ सगुण चरित्रें० ॥ २ ॥ जेणेंकरुनी मूर्ति ठसावे अंतरिं श्रीहरिची ॥ ऐसी कीर्तनमर्यादा हे देवाचे घरची ॥ सगुण चरित्रें० ॥ ३ ॥ अद्वयभजनें अखंड स्मरणें वाजवि करताळी ॥ एकाजनार्दनीं मुक्ति होये तत्काळीं ॥ सगुण चरित्रें परम० ॥ ४ ॥

## पद २७ वें.

अपने गोविंदसे रुचि रहिये ॥ धृ० ॥ ज्यो काकली भली

न होवे ॥ बुरि किसिकी न कहिये ॥ अपने० ॥ १ ॥ ज्यो कोई जादि बाद मचावे ॥ चार बात सुनलिये ॥ अपने० ॥ २ ॥ ज्यो कोई संत मिले बडे भागी ॥ दुःख सुख उनसु कहिये ॥ अपने० ॥ ३ ॥ नानक दास कहे जन तेरा ॥ लाज ब्रिजनकी निभय्ये ॥ अपने० ॥ ४ ॥

## पद २८ वें.

बंदे क्यौं भुला क्यौं भुला ॥ आखर खावेगा झोला ॥ बंदे० ॥ धृ० ॥ कवडी कवडी माया जोडी ॥ आखर जावेगा खुला ॥ बंदे क्यौं भुला० ॥ १ ॥ भाई बहिन जोरू लरके ॥ कोन किसीका साला ॥ बंदे क्यौं० ॥ २ ॥ शिवराम कहे समाल बंदे॥कर साहेबसों सल्ला॥बंदे क्यौं भुलाक्यौं०॥३॥

## पद २९ वें.

बंदे हुशार रहना बे ॥ साहेब राजी रखना बे ॥ धृ० ॥ गांजा दारू मत पी यारो, अक्कल गुंग होती ॥ अपने पल्लवका दाम खरचकर, मुखमें मखिया जाती ॥ बंदे हु० ॥ १ ॥ जुवेबाजी मत कर यारो, अक्कल गुंग होती ॥ अपने पल्लवका दाम खरचकर, शिरपर जुतियां पडती ॥ बंदे हु०॥

॥ २ ॥ रंडीबाजी मत कर यारो, अक्कल गुंग होती ॥ अपने पल्लवका दाम जाकर, हातमें चवरी आती ॥ बंदे हु० ॥ ३ ॥ एक जनार्दनका बंदा, अक्कल तुजकूं देता ॥ दिल चाहे तो सिखले प्यारे, नहि तो जा गू गाता ॥ बंदे हुशार रहना बे ॥ साहेब रा० ॥ ४ ॥

## ॥ भजन. ॥

॥ निर्गुण निराकार गुरुमाय ॥ भावें आलिंगावे पाय ॥

## पद ३० वें.

कायकु देह धरोरे अभागी ॥ काय ० ॥ धृ० ॥ इस सुख ब्रह्मा इस सुख पायो ॥ निजपद क्यौं बिसरोरे ॥ अभागी काय० ॥ १ ॥ श्यामसुंदरकी सेवा चूकी ॥ उपजत क्यौं न मरो रे ॥ अभागी काय० ॥ २ ॥ कहत कबीरा सुन भई साधू ॥ नहीं तो नरकीं पडो रे ॥ अभागी कायकु देह धरोरे ॥ ३ ॥

## पद ३१ वें.

इस तन धनकी कोन बडाई ॥ देखत नैनोंमें मट्टी मिलाई ॥ इस त० ॥ धृ० ॥ अपनें खातर महेल बनाया ॥ आपहि जाकर जंगल सोया ॥ इस त० ॥ १ ॥ हाड जले जैसी लकरिकी मोली ॥ बाल जले जैसी घासकी पोली ॥ इस तन ध० ॥ २ ॥

कहत कबीरा सुन भाई गुनिया ॥ आप मुवे पिछे डुब गयि दुनिया ॥ इस तन धन० ॥ ३ ॥

## पद ३२ वें.

जमका अजब तडाका बे ॥ तूं क्या जाने लडका बे ॥धृ०॥ बडे मिजाजी कठडे बैठे तक्या बिछाईत साजा ॥ मारे झपटकर जब ले जावे जैसा खबुतर बूझा ॥ जमका० ॥ १ ॥ नवभी मरगये दसभी मरगये मरगये सहस्र अठचांसीं॥ तेहतिस कोटी देवता मरगये पडे कालके फांसी ॥ जमका अज० ॥ २ ॥ पीर मरे पैगंबर मर गये ॥ मरगये जिंदा जोगी ॥ जपी तपी संन्यासी मर गये मर गये हकीम रोगी ॥ जमका अज० ॥ ३ ॥ तीन लोकपर छत्र विराजे लुटे कुंजबिहारी ॥ कहत कबीरा पाखरया लुटा रय्यत कोन बिचारी॥जमका अज० ॥४॥

## पद ३३ वें.

तनका नहीं भरोंसा बे ॥ देखे काल तमासा बे ॥ धृ० ॥ बडे राजमो साज बिराजे मत जानो सुख मेला ॥ कोइ किसीका नहिरे यारो आखर जात अकेला ॥ तनका० ॥ १ ॥ चोप चापके पगरी बांधी वालंपेच सवाई ॥ मुछा मुरडकर दरपन देखे ढाल फिरंग रह जाई ॥ तनका० ॥ २ ॥ शाल

दुशाला पट्टू ओढे खावे गरम मसाला ॥ जब आवेगा जम-का फांसा होवे गर्दी हल्ला ॥ तनका० ॥ ३ ॥ कहत कबीरा सुन भई साधु मारग सिधा सवारो ॥ नजर खोलकर देखो यारो ये सब झूट पसारो ॥ तनका नहीं० ॥ ४ ॥

## पद ३४ वें.

काया नहिं तेरी नहीं तेरी ॥ मत कर मेरी मेरी ॥धृ०॥ नाहावें हांडा पानी गरम ॥ नहिं करता कवडी का धरम ॥ काया नहिं ते० ॥ १ इस कायेका कोन भरोंसा ॥ आ-खर जम डारेगा फांसा ॥ काया नहिं ते ० ॥२॥खावे घी खिचडीका खुराक ॥ आखर जलकर जावे खाक ॥ काया नहिं ते० ॥ ३ ॥ चंदन सीस लगावे टीका ॥ आखर राम भजनबिन फीका ॥ काया नहिं ते ० ॥ ४ ॥ दुवाजानमें गट्टू ॥ राम भजले वीके तट्टू ॥ काया नहिं ते० ॥ ५ ॥ खाके पानसुपारी लवंगा ॥ गल्ली गल्ली फिरता बेढंगा ॥ काया नहिं ते० ॥ ६ ॥ बाजे थंड बनावे डगला ॥ उप्पर काल फिरत है बगला ॥ काया नहिं ते० ॥ ७ ॥ वोढे शाल दुशाला पट्टू ॥ इसमें क्यों भुलारे खट्टू ॥ काया नहिं ते० ॥ ८ ॥ न्याहली पलंगपर सोवे॥ इसके खातर जान खोवे॥

काया नाहिं ते० ॥ ९ ॥ अमृत कहे सब झूटा धंदा ॥ भजले राम कृष्ण गोविंदा ॥ काया० ॥ १० ॥

## पद ३५ वें.

जमसों नहीं डरूंगा वे ॥ हरिका भजन करूंगा वे ॥ ॥ धृ० अहंता मारूं ममता मारूं खानजाद मैं कहाऊं ॥ मन मेरा अब चौकस राखूं चित्त चैतनमें मिलाऊं ॥ जमसों नहीं डरूंगा वे ॥ हरिका० ॥ १ ॥ रामनामका घोडा मेरा मैदानमें दवडाऊं ॥ भजनप्रताप हातमें बर्छी सन्मुख लेकर जाऊं ॥ जमसों नहीं० ॥ २ ॥ और लोक कसबेके चाकर मैं हुजूरका काजी ॥ कामक्रोधकी गरदन मारूं साहेब राखूं राजी ॥ जमसों नहीं डरूंगा० ॥ ३ ॥ मैं साहेबका सच्चा चाकर मेरा नाम कबीरा ॥ सब संतनकूं शीस नमाऊं जोहरि पारखे हिरा ॥ जमसों नहीं डरूंगा वे ॥ हरिका० ॥ ४ ॥

## पद ३६ वें.

वाहवा साहेबजी ॥ खूब ख्याल तुमाराजी ॥ धृ० ॥ गगन लेकर बाज उडावे कव्वा तीर चलावे ॥ जद बकरीने वाघ पछाडा ॥ उस्कूं कोन छुडावे ॥ वाहवा० ॥ १ ॥ जद चुवेने बिल्ली पकडी ॥ मूरगी घरघर रोवे ॥ बंदरके घर घूम

मघी है ॥ उठ बिसनी पद गावे ॥ वाहवा० ॥ २ ॥ मुंगा भैरा बात चलावे ॥ अंधा कुरान बाचे ॥ जब थोटेने मृदंग बजाया ॥ लंगडा क्या सुब नाचे ॥ वाहवा० ॥ ३ ॥ कहत कबीरा उलटी बानी ॥ बिरला कोइ एक जाने ॥ सोही गुरुका पुरा होयगा ओही बात पछाने ॥ वाहवा साहेबजी ॥ खूब ख्याल० ॥ ४ ॥

## पद ३७ वें.

जमुनाजीको तीर ॥ चलोजी मन जमुनाजीको तीर ॥ ॥ धृ० ॥ कान्हाजी गावत बन्सी बजावत ॥ संग लियो बलभीम ॥ चलोजी मन० ॥ १ ॥ जमुनाजीको निरमल पानी ॥ शीतल भयो शरीर ॥ चलोजी मन० ॥ २ ॥ मिराके प्रभु गिरधर नागर ॥ चरण कमल बलहारो॥चलोजी मन०॥ ३ ॥

## पद ३८ वें.

गुमन आयो बदरा शाम बिना ॥ धृ० सोवत सपनोमें देखत शामकुं ॥ भर आयो नयन निकल गयो कचरा ॥१॥ मथुरा नगरकी चतुरा मालणया ॥ शामकु हार हमकुबी गजरा ॥ २ ॥ मिराके प्रभु गिरिधर नागर ॥ समज गयो पिछे मिटगयो झगडा ॥ ३ ॥

## पद ३९ वें.

किसनजी पैरे मोतनका तूरा ॥ धृ० ॥ भक्तवत्सल तुम करुणासागर ॥ कृपा करे मज पैया थारा ॥ मै हुजूरा तेरा ॥ तूं प्रभु मेरा ॥ १ ॥ अंबऋषीका गर्व जो धारा ॥ देवकी सुख कीनो दैत्य संहारा ॥ दुर्जन मारा भक्तन तारा ॥ २ ॥ लंकानाथ जो प्रौढ जा भया हा ॥ राम अवतार ले रावन मारा ॥ अहिल्या तारा ॥ बिभीषण तारा ॥ ३ ॥ गोकुल-म्यांन गजबज उठले ॥ किसन विंध्यो कंस चाणूरा ॥ द्रोपदी कैवारा ॥ कुब्जा उद्धारा ॥ ४ ॥ पंढरीनाथका दास लागे पैया हा ॥ कृपाकरे तुज मैया थारा ॥ मैं तेरा छोरा ॥ लेव मेरा मुजरा ॥ ५ ॥

## पद ४० वें.

जसवदा मैय्या नित सतावे कनैय्या ॥ वाकूं भुरकत क्या कहूं मैय्यां ॥ धृ० ॥ बैल लावे भीतर बांधे छोरे देत सब गैय्यां ॥ जसवदा० ॥१॥ सोते बालक आन जगावे ॥ ऐसा धीट कनैय्या ॥ जसवदा मै० ॥ २ ॥ मीराके प्रभु गिरिधर नागर ॥ हरि लागूं तारी पैंय्या ॥ ३ ॥ जसवदा मैय्या०॥

## पद ४१ वें.

मैया मोरे भाग जागे ॥ साधु आया पावणा ॥ चुवा चंदन घासलियो ॥ आंग कुं लगावना ॥ १ ॥ मथुरामें कंस मारा ॥ लंकापती रावणा ॥ राजा बळी द्वारे ठहरी॥द्वारका वसावना ॥२॥ मिराबाई हरिकी दासी॥पगकू लगावना॥३॥

## पद ४२ वें.

काना बनसरी बजाय गिरधारी ॥ तारी बन्सरी लागी मोको प्यारी ॥ धृ ॥ दहिं दूध बेचने; जातो यमुना ॥ कानाने घागर फोरी ॥ काना० ॥ १ ॥ शिरपर घट, घट पर झारी ॥ उस्कूं उतार मुरारी ॥ का० ॥२॥ सास बुरी ने ननंद हटेली ॥ देवर देवे मोकों गारी ॥ ३ ॥ मिराके प्रभु गिरिधर नागर चरण कमल बलहारी ॥ का० ॥ ४ ॥

## पद ४३ वें.

कुबेजेनें जादु डारा ॥ उन्ने मोहे शाम हमारा ॥ धृ ॥
जादुकी पुडीयां फडफड मारे॥जाने कोन भेद विचारा ॥१॥
रात्र अंधारी बिजली चमके ॥ देखे चंद्र विचकोरा ॥ २ ॥
आव मोरे सांवरीया॥ चवसर खेलूं ॥तुम जिता मै हारा॥३॥
मिराके प्रभु गिरिधर नागर ॥ संत समागम न्यारा ॥ ४ ॥

## ॥ भजन ॥

॥ रघुपति राघव राजाराम ॥ पतितपावन सीताराम ॥

## गौळण १ ली.

( पचरंगी. )

आल्या पांच गौळणी पांच रंगांचा शृंगार करूनी ॥ धृ० ॥ पहिली गोळण रंग सफेत ॥ जसी चंद्राची ज्योत ॥ गगनीं चांदणी लखलखीत ॥ ऐकातिची मात ॥ मंथन करित होती दारांत ॥ धरुनी कृष्णाचा हात ॥ ऐशा आल्या त्या नटुनी ॥ आल्या पांच० ॥ १ ॥ दुसरी गौळण साळी भोळी ॥ हळहीहून पिंवळीं ॥ पिंवळा पीतांबर नेसुनी आली ॥ आंगीं बुट्टेदार चोळी ॥ एक लहान तनु उमर कवळी ॥ जसी चांप्याची कळी ॥ ऐशा आल्या त्या नटुनी ॥ आल्या पांच० ॥ २ ॥ तिसरी गौळण रंग काळा ॥ नेसुनी चंद्रकळा ॥ काळें काजळ लेउनियां डोळां ॥ रंग तिचा सांवळा ॥ काळी गरसोळी लेवुनियां गळां ॥ आली राजसबाळा ॥ ऐशा आल्या त्या नटूनी ॥ आल्या० ॥ ३॥ चवथी गौवळण रंग लाल॥लालीलाल हिंगुळ ॥ कपाळीं कुंकुचिरी रंग लाल ॥ आंगीं भरला गुलाल ॥ मुखीं विडा रंग-

ला रंगलाल ॥ जसें डाळिंबाचें फूल ॥ ऐशा आल्या त्या नटुनी ॥ आल्या० ॥४॥ पांचवी गौळण हिरवा रंग ॥ अवघ्या झाल्या दंग ॥ हिरव्या कंकणाचा पहा रंग ॥ आरशींत जडलें भिंग ॥ फुगडी खेळती कृष्णासंगें ॥ एकनाथ अभंग॥ऐशा आल्या त्या नटुनी ॥ आल्या पांच गौळणी॥५॥

## गौळण २ री.

गौळणी ठकविल्या गौळणी ठकविल्या ॥ एक एक संगतिनें मराठा कानडिया ॥ एक मुसलमानी, कोकणी, गुजरणी ॥ अशा पांचीवजणी, गौळणी ठकविल्या ॥ धृ० ॥ गौळणी सुंदरी. गौळणी सुंदरी गेल्या यमुने तीरीं ॥ वस्त्रें फेडुनियां स्नान करिती नारी ॥ गोविंदानें वस्त्रें, नेलीं कळवावरी ॥ स्नान करूनियां त्या आल्या बाहेरी ॥ गौळणी ठकविल्या० ॥ १ ॥ लडोबा गोविंदा, लडोबा गोविंदा निर्वाणीं आज, अडचाल्लो पडचाल्लो ॥ शीरफोडच्यान फोडो ॥ मारी कन्हैयां ॥ पामी खेळच्यान खेळो ॥ गौळणी० ॥२॥ देखरे कन्हैयां ॥ देख० ॥ मै जातकी वडी ॥ कदम पकडुंगी ॥ मैंया कुटो जुडी, मेरी चुनरी दे ॥ मेरी ले दुल्हडी ॥ ॥ गो० ३ ॥ देवकीनंदना ॥ देव० ॥ तूं एक श्रीपती ॥ उघडो हिंवाची ॥ तुज विनवूं किती ॥ पायां पडतेवा ॥

मी येतें काकुळती ॥ माझी साडी दे ॥ घे नाकाचें मोतीं ॥ गौळणी० ॥ ४ ॥ पावगा दाताला ॥ पाव० ॥ तूं नंदाचो झिलो ॥ माका फडको दो ॥ मी हीवान मेलय ॥ घी माझो कोयतो ॥ देवा पायां पडतय ॥ गौळणी० ॥ ५ ॥ ज्योरे माधवजी ॥ ज्यो० ॥ मै शरण भई ॥ तनका का कैफी ॥ बाप दयाळ तूं ही ॥ मारी साडी आपो ॥ हातनी ले कंगणी ॥ गौळणी० ॥ ६ ॥ इतुकें ऐकुनि ॥ इतुकें० ॥ देव बोले हांसोनी ॥ सूर्या दंडवत ॥ करा कर जोडुनी ॥ नामा विनवीलो ॥ ह्मणे सारंगपाणी ॥ गौळ्या ऐक तूं ॥ धन्य तुझी करणी ॥ गौळणी० ॥ ७ ॥

## हिंदुस्थानी गौळण ३ री.

पाणिबिच खडे दैन्यवानी ॥ बाता बोले हिंदुस्थानी ॥ अब तुम करोजी मेहेरबानी देव मेरे कपडे ॥ धृ० ॥ मेरे नंदजीके लाल ॥ दे० ॥ तुम तो मथुरा राखनवाला ॥देव०॥ तुम गोपी पालनवाला ॥ देव०॥ सब कपडे लिये छिनकर॥ ले गये झाडके उपर ॥ गवालन कहे कन्हैया चोर ॥ देव मेरे क० ॥ १ ॥ मेरी ननंद है बिजली ॥ छपन्न देशकी चुगली ॥ कन्हैया छोडो मोरी चोली ॥ देव मेरे क० ॥२॥ मेरी सास है जंजाल ॥ उपटे शिरके लंबे बाल ॥ मेरेकुं मारे

## पद ४१ वें.

मैया मोरे भाग जागे ॥ साधु आया पावणा ॥ चुवा चंदन घासलियो ॥ आंग कुं लगावना ॥ १ ॥ मथुरामें कंस मारा ॥ लंकापती रावणा ॥ राजा बळी दवारे ठहरी॥द्वारका वसावना ॥२॥ मिराबाई हरिकी दासी॥पगकू लगावना॥३॥

## पद ४२ वें.

काना बनसरी बजाय गिरधारी ॥ तारी बन्सरी लागी मोको प्यारी ॥ धृ ॥ दहिं दूध बेचने; जातो यमुना ॥ कानाने घागर फोरी ॥ काना० ॥ १ ॥ शिरपर घट, घट पर झारी ॥ उस्कूं उतार मुरारी ॥ का० ॥२॥ सास बुरी ने ननंद हटेली ॥ देवर देवे मोकों गारी ॥ ३ ॥ मिराके प्रभु गिरिधर नागर चरण कमल बलहारी ॥ का० ॥ ४ ॥

## पद ४३ वें.

कुबजेनें जादु डारा ॥ उन्ने मोहे शाम हमारा ॥ धृ ॥
जादुकी पुडीयां फडफड मारे॥जाने कोन भेद विचारा ॥१॥
रात्र अंधारी बिजली चमके ॥ देखे चंद्र बिचकोरा ॥ २ ॥
आव मोरे सांवरीया॥ चवसर खेलूं ॥तुम जिता मै हारा॥३॥
मिराके प्रभु गिरिधर नागर ॥ संत समागम न्यारा ॥ ४ ॥

## ॥ भजन ॥

॥ रघुपति राघव राजाराम ॥ पतितपावन सीताराम ॥

## गौळण १ ली.

( पचरंगी. )

आल्या पांच गौळणी पांच रंगांचा शृंगार करूनी ॥ धृ० ॥ पहिली गोळण रंग सफेत ॥ जसी चंद्राची ज्योत ॥ गगनीं चांदणी लखलखीत ॥ ऐकातिची मात ॥ मंथन करित होती दारांत ॥ धरुनी कृष्णाचा हात ॥ ऐशा आल्या त्या नटुनी ॥ आल्या पांच० ॥ १ ॥ दुसरी गौळण साळी भोळी ॥ हळहीहून पिंवळीं ॥ पिंवळा पीतांबर नेसुनी आली ॥ आंगीं बुट्टेदार चोळी ॥ एक लहान तनु उमर कवळी ॥ जसी चांप्याची कळी ॥ ऐशा आल्या त्या नटुमी ॥ आल्या पांच० ॥ २ ॥ तिसरी गौळण रंग काळा ॥ नेसुनो चंद्रकळा ॥ काळें काजळ लेउनियां डोळां ॥ रंग तिचा सांवळा ॥ काळी गरसोळी लेवुनियां गळां ॥ आली राजसबाळा ॥ ऐशा आल्या त्या नटूनी ॥ आल्या० ॥ ३ ॥ चवथी गौवळण रंग लाल ॥ लालीलाल हिंगुळ ॥ कपाळीं कुंकुचिरी रंग लाल ॥ भांगीं भरला गुलाल ॥ मुखीं विडा रंग-

ला रंगलाल ॥ जसें डाळिंबाचें फूल ॥ ऐशा आल्या त्या नटुनी ॥ आल्या० ॥४॥ पांचवी गौळण हिरवा रंग ॥ अवघ्या झाल्या दंग ॥ हिरव्या कंकणाचा पहा रंग ॥ आरशींत जडलें भिंग ॥ फुगडी खेळती कृष्णासंगें ॥ एकनाथ अभंग॥ऐशा आल्या त्या नटुनी ॥ आल्या पांच गौळणी॥५॥

## गौळण २ री.

गौळणी ठकविल्या गौळणी ठकविल्या ॥ एक एक संगतिनें मराठा कानडिया ॥ एक मुसलमानी, कोकणी, गुजरणी ॥ अशा पांचीवजणी, गौळणी ठकविल्या ॥ धृ० ॥ गौळणी सुंदरी. गौळणी सुंदरी गेल्या यमुने तीरीं ॥ वस्त्रें फेडुनियां स्नान करिती नारी ॥ गोविंदानें वस्त्रें, नेलीं कळवावरी ॥ स्नान करूनियां त्या आल्या बाहेरी ॥ गौळणी ठकविल्या० ॥ १ ॥ लडोबा गोविंदा, लडोबा गोविंदा निर्वाणीं आज, अडचाह्लो पडचाह्लो ॥ शीरफोडच्यान फोडो॥ मारी कन्हैयां ॥ पामी खेळच्यान खेळो ॥ गौळणी० ॥२॥ देखरे कन्हैयां ॥ देख० ॥ मै जातकी वडी ॥ कदम पकडुंगी ॥ मैंया कुटो जुडी, मेरी चुनरी दे ॥ मेरी ले दुह्लडी॥ ॥ गौ० ३ ॥ देवकीनंदना ॥ देव० ॥ तूं एक श्रीपती ॥ उघडो हिंवाची ॥ तुज विनवूं किती ॥ पायां पडतेवा ॥

मी येतें काकुळती ॥ माझी साडो दे ॥ घे नाकाचें मोतीं ॥ गौळणी० ॥ ४ ॥ पावगा दाताला ॥ पाव० ॥ तूं नंदाचो झिलो ॥ माका फडको दो ॥ मो हीवान मेलय ॥ घी माझो कोयतो ॥ देवा पायां पडतय ॥ गौळणी० ॥ ५ ॥ ज्योरे माधवजी ॥ ज्यो० ॥ मै शरण भई ॥ तनका का कैफी ॥ बाप दयाळ तूं ही ॥ मारी साडी आपो ॥ हातनी ले कंगणी ॥ गौळणी० ॥ ६ ॥ इनुकें ऐकुनि ॥ इनुकें० ॥ देव बोले हांसोनी ॥ सूर्या दंडवत ॥ करा कर जोडुनी ॥ नामा विनवीतो ॥ ह्मणे सारंगपाणी ॥ गौळ्या ऐक तूं ॥ धन्य तुझी करणी ॥ गौळणी० ॥ ७ ॥

## हिंदुस्थानी गौळण ३ री.

पाणिविच खडे दैन्यवानी ॥ बाता बोले हिंदुस्थानी ॥ अब तुम करोजी मेहेरबानी देव मेरे कपडे ॥ ध्रु० ॥ मेरे नंदजीके लाल ॥ दे० ॥ तुम तो मथुरा राखनवाला ॥देव०॥ तुम गोपी पालनवाला ॥ देव०॥ सब कपडे लिये छिनकर॥ ले गये झाडके उपर ॥ गवालन कहे कन्हैया चोर ॥ देव मेरे क० ॥ १ ॥ मेरी ननंद है बिजली ॥ उपन्न देशकी चुगली ॥ कन्हैया छोडो मोरी चोली ॥ देव मेरे क० ॥२॥ मेरी सास है जंजाल ॥ उपटे शिरके लंबे वाल ॥ मेरेकुं मारे

गालोगाल ॥ देव मेरे क० ॥ ३ ॥ मेरा मरद है मर्दाना ॥ उसिका शिपायोंका बाना ॥ गोळी मारेगा दिवाना ॥ देव मेरे क० ॥ ४ ॥ मैं जातकी बम्मनी ॥ मेरा सांवळा है गगनीं ॥ निचे उतरो सारंगपाणी ॥ देव मेरे क० ॥ ५ ॥ गवालन कहे मैं क्या करूं ॥ कपडेबिन दिवानी फिरूं ॥ तेरे मूमें शक्कर भरूं ॥ देव मेरे क० ॥ ६ ॥ गवालन कहे जी नंदलाल ॥ मत कर मेरे कपडेके हाल ॥ कबीरा कहे सुनो मेरा ख्याल ॥ देव० ॥ ७ ॥

## हिंदुस्थानी गौळण ४ थी.

देखो देखोरे जसवदा मैय्यां तेरा लालना ॥ तेरा लालना मैय्यां झुले पालना ॥ धृ० ॥ बाहार देखे तो बारा बरसकूं॥ भीतर देखे मैयां तेरा लालना ॥ देखोरे ज० ॥ १ ॥ जमुनाजल राधा भरनेकू निकली ॥ पकरत जोबन मैय्यां॥तेरा लालना ॥ देखोरे ज० ॥ २ ॥ मिराके प्रभु गिरिधर नागर॥ हरिका भजन नित्य करना ॥ तेरा लालना ॥ ३ ॥

## गौळण ५ वी.

मनमोहन दिलका प्यारा॥माता जश्वदा पालना हलावे॥ हातमें लेके दोरा ॥ मनमोह० ॥ १ ॥ कबसे अंगनमो खडी है राधा ॥ देखे किसनका चेहेरा ॥ मन मोह० ॥२॥

मोर मुकुट पीतांबर शोभे ॥ गळा मोतनका गजरा ॥ ३ ॥ मिराके प्रभू गिरिधर नागर ॥ चरण कमल बलहारा ॥ मनमोह० ॥ ४ ॥

## गुजराथी गौळण ६ वी.

काना चालो मारा घेर काम छे ॥ मारा घेर काम छे, सुंदर तारूं नाम छे ॥ धृ० ॥ मारे अंगनमों तुळशीनों झाड छे ॥ राधा गौळण मारूं नाम छे ॥ काना चा० ॥ १ ॥ आगला मंदिरमो ससरा सुवेलो छे ॥ पाछला मंदीर साम-सुम छे ॥ काना चा० ॥ २ ॥ मोर मुकुट पीतांबर शोभे ॥ गळा मोतनकी माल छे ॥ काना चा० ॥ ३ ॥

## गौळण ७ वी.

जमुनाजीको तीर ॥ दधी बेचन जावूं ॥ धृ० ॥ एक तो घागर शिरपर भारी ॥ दुजा सागर दूर ॥ दधी बेचन जाऊं० ॥ १ ॥ एक तो कन्हया हाटेला ॥ दुजा माखनचोर ॥ दधी बेचन जा० ॥ २ ॥ एक तो ननंद हाटेली ॥ दुजा ससरा नादान ॥ दधी बेचन जा० ॥ ३ ॥ हे मिरादर्शनसुं-प्यासी ॥ दर्शन दिजोरे महाराज ॥ दधी ० ॥ ४ ॥

## गौळण ८ वी.

काना तोरी घुंगरिया पेहेरी ॥ होरी खेले किसन गिर-

धारी ॥ धृ० ॥ जमुनाके निरतीर धेनु चरावत ॥ खेलत राधा प्यारी ॥ काना तोरी० ॥१॥ आनी कोरे गंगा, ओरी कोरे जमुना ॥ बिचमें राधा प्यारी ॥ काना तोरी० ॥ २॥ मोर मुकुट पितांबर शोभे ॥ कुंडलकी छब न्यारी ॥ काना तोरी० ॥ ३ ॥ मिराके प्रभु गिरिधर नागर ॥ चरण कमल बलहारी ॥ काना तारी ॥ ४ ॥

## बोबडी गौळण ९ वी.

जात होतें पानियां तेथें भेतला सांवला ॥ दोस्यवल तोपि मयुलपिछांची खांधावलि कांबला ॥ १ ॥ काय थांगुं तुतें बाई ॥ काय थांगु तुतें बाई ॥ धृ० ॥ गुलगे माझे फुतले ॥ मग मी ललत बतलें ॥ कुनिकुन आला काना, मला पोंताशीं धलिलें॥काय थांगुं० ॥ २ ॥मलापोताशीं धलिलें ॥ सुख मोतें वातलें ॥ नवलतीचे कलवें कलूनी, ज्ञानोबा लाधलें ॥ काय थांगुं० ॥ ३ ॥

## गौळण १० वी.

सांवळें सुंदर माझें लेंकरूं गुणाचें ॥ माझें लें० ॥ सवल-स गौळणी गाऱ्हाणें देती हरीचें ॥ धृ० ॥ ऐकाहो घरधनी मज सासूची जाचणी ॥ मजविण वेगळा कृष्ण न राहे अंग-णीं ॥ सांवळें सुं० ॥ १ ॥ घरीं कृष्ण दारीं कृष्ण अवघाची

हा कृष्ण ॥ हरि हा० ॥ कपाळकुट जहालें लोकीं बोभाट ऐकिलें ॥ सांवळें सुं० ॥ २ ॥ आतां काय सांगूं या गांवींचें नवल ॥ या गांवीं ० ॥ गोरस पिऊनी हरी पळाला न बोलतां बोल ॥ सांवळें सुं० ॥ ३ ॥ एका जनार्दन हरी हा यशोदेचा तान्हा ॥ हरी० ॥ गौळियाचें भाग्य देखिला चतुर्भूज कान्हा ॥ सांवळें सुं० ॥ ४ ॥

## गौळण ११ वी.

कसी जाऊं मी वृंदावना ॥ मुरली वाजवी कान्हा, कान्हा ॥ ध्रु० ॥ पैल तीरीं हरी वाजवी मुरली ॥ नदी भरली यमुना ॥ कसी० ॥ १ ॥ कांसे पितांबर केसरी टिळक ॥ कुंडल शोभे काना ॥ कसी० ॥ २ ॥ काय करूं बाई कोणाला सांगूं ॥ हरिनामाची सांगड आणा ॥ कसी० ॥ ३॥ नंदाच्या हरीनें कौतुक केलें ॥ जाणें अंतरींच्या खुणा ॥ कसी० ॥ ४ ॥ एका जनार्दनीं मनीं ह्मणा ॥ देवमाहात्म्य कळेना कोणा ॥ कसी० ॥ ५ ॥

## गौळण १२ वी.

माझे अछुकडे बछुकडे छकुडे ग राधे रुपडें ॥ पांघरूं घालसी कुंचडे ॥ ध्रु० ॥ हरी माझागे नेणता ॥ करी त्रिगुणाचा गोंगटा ॥ हरी रांगे त्रिभुवनीं राजरूपडें ॥ पांघरूं

घालसी कुंचडें ॥ माझें० ॥ १ ॥ हरी माझागे सांवळा ॥ पायीं पैंजण वाजे खुळखुळा ॥ त्यानें भुलविल्या गोपिका बाळा राजरूपडें ॥ माझें० ॥ २ ॥ ऐसे देवाजीचे गडी ॥ पेंद्या सुदामाची जोडी ॥ बळीभद्र तयांचे गृहीं राजरूपडें माझें० ॥ ३ ॥ मिरा ह्मणे तूं चक्रपाणी ॥ खेळ खेळे वृंदावनीं ॥ त्यानें भुलविल्या गौळणी राजरूपडें ॥ माझें० ॥ ४ ॥

## गौळण १३ वी.

कायकूं बहार परी मुरलिया ॥ कायकूं बहार परी ॥ध्रु०॥ ज्येलो तेरी ज्यानी, मग पछानी ॥ आई बनकी लकरी मुरलिया ॥ का० ॥ १ ॥ घडी एक करपर, घडी एक मुखपर एक अधर धरी मुरलिया ॥ काय० ॥२॥ कनक बासकी मंगाव लकरियां ॥ छिलके गोल करी मुरलिया ॥ काय० ॥ ३ ॥ सुरदासकी बाकी मुरलिया ॥ संतनसे सुधरी मुरलिया ॥ काय० ॥ ४ ॥

## गौळण १४ वी.

अग बाई हाच माझा पोसयाचो धान्यान ॥ यानें लुटिल्या चावलाच्या ॥ गोनयान ॥ गो गवारी गो, हाच माझा पोसया० ॥ धृ० ॥ यानें अगासुर बगासुर मारल्यान ॥ यानें बळी पाताळीं नेऊन गारल्यान ॥ यानें कंसाची गरदन

तोरल्यान ॥ गो गवारी गो ॥ हाच मा० ॥१॥ समुद्रासीनी भाक दिली गोरयान ॥ यानें वळविलें गोरयाचें डोरयान ॥ प्रल्हादासीन अग्नींत तारल्यान ॥ गो गवारी गो ॥ हाच मा० ॥ २ ॥ द्रौपदीच्यानी धांवण्यासी धांवल्यान ॥ बहीण ह्मणून संकटीं तारल्यान ॥ अभिमन्यासी केला त्याणी मावळ्यान ॥ गो गवारी गो हाच माझा० ॥ ३ ॥ यानें रावण कुंभकर्ण मारल्यान ॥ यानें राज्यासी बिभीषण स्थापल्यान ॥ वाळ्या कोळ्यासी गडे याणें तारल्यान ॥ गो गवारी गो हाच माझा० ॥ ४ ॥ दुबळे ब्राह्मणासी वस्त्रासी नाडल्यान ॥ त्याला सोन्याची नगरी धाडल्यान ॥ मोठें दारिद्र त्याचें फेडल्यान ॥ गो गवारी गो ॥ हाच माझा० ॥ ५ ॥ बारा सोळा मिळूनी गौळणी ॥ त्यांनीं वेढीला चक्रपाणी ॥ मध्वनाथ धन्य तुझी वाणी ॥ गो गवारी गो ॥ हाच माझा० ॥ ६ ॥

## ॥ भजन. ॥

॥ रघुपति राघव राजाराम, पतितपावन सीताराम ॥

## गौळण १५ वी.

आह्मी व्रज गोकुळीच्या, गोकुळींच्या गे नारी ॥ करूनी शृंगार कळाकुसरी ॥ भरुनी नवनीत, नवनीत घेउनी

शीरीं । हटा जातां मथुरानगरीं ॥ तुझा नटनाटक, नाटक श्रीहरी । दान मागे धरून पदरीं ॥ चाल ॥ मस्कऱ्या करितो ॥ कर सोडुनी कुचाग्र धरितो ॥ भलभलत्या मस्कऱ्या करितो ॥ तोड ॥ बाई करीतो या काळीं मार्गी बाई करीतो गे धुमाळी ॥ याशोदे तुझा० ॥ १ ॥ तुझा वनमाळी मार्गी बाई करीतो गे धुमाळी ॥ यशो० ॥ धृ ॥ संगें गोपाळ गोपाळ गडी घेतो ॥ उठुनी मध्यरात्रीं बाई येतो ॥ सारें नवनीत, नवनीत गोरस पीतो ॥ शिरीं तबकें लवंडुन देतो ॥ चाल ॥ करीतो चेष्टा. गोकुळीं करीतो चेष्टा ॥ यशोदे तुझा कारटा ॥ आडवीतो गौळणी श्रेष्ठा ॥ तोड ॥ बाई श्रेष्ठा या काळीं ॥ मार्गी बाई क० ॥ २ ॥ जळोगे या गोकुळची, गोकुळची वस्ती ॥ किती सोसावी जबरदस्ती ॥ जाउं दे उलथुन, उलथुन याची मस्ती ॥ राज्य कंसाचें राज्य स्वस्थीं ॥ चाल ॥ येथून आह्मी जाउं ॥ कंसाची ग मथुरा पाहूं ॥ सुख वस्ती ग तेथें राहूं ॥ तोड ॥ बाई राहुंगे या काळीं ॥ मार्गी बाई करीतो गे ॥ ३ ॥

## गौळण १६ वी.

हरि माझ्या मंदिरीं कधीं तुह्मी याल ॥ ध्रु० ॥ बसल्यें मी होतें रंगमहालीं ॥ आरसे लाविले चार ॥ हरि० ॥ १ ॥

येतां जातां रोखुनी पाहतां ॥ वाईट तुमचा चाल ॥ हरि० ॥२॥ पलंगीं केली शेज फुलांची ॥ परिमळ सुगंधी व्याल ॥ हरि० ॥ ३ ॥ तुमच्या चरणांची झाल्यें मी दासी॥एक वेळ दर्शन घाल ॥ हरि० ॥ ४ ॥ एका जनार्दनीं पूर्ण कृपेनें ॥ मोक्षपदासी न्याल ॥ हरि० ॥ ५ ॥

## धांवा द्रौपदीचा.

कृष्णा धांवरे लवकरी ॥ संकट पडलें भारी ॥ हरि तूं आमुचा कैवारी ॥ आलें विघ्न निवारी ॥कृष्णा०॥१॥ पांडव असतां वनवासीं ॥ कळलें कौरवांसीं ॥ त्यांणीं पाठविलें ऋषींसीं ॥ सत्व हरायासी ॥ कृष्णा० ॥ २ ॥ साठी सहस्त्र खंडया अन्न ॥ दुर्वासभोजन ॥ सत्व जातील घेऊन ॥ अंतर पडतां जाण ॥ कृष्णा० ॥ ३ ॥ रात्र झालीसे दोन प्रहर॥ आलें ऋषीश्वर ॥ भोजन मागती सत्वर ॥ करूं कैसा विचार ॥ कृष्णा० ॥ ४ ॥ आज कां निष्ठुर जाहलासी॥ कोठें गुंतलासी ॥ माझी होईल बा गत कैशी ॥ अनाथ मी परदेशी कृष्णा० ॥ ५ ॥ आतां न लावीं उशीर ॥ धर्म चिंतातुर ॥ अनर्थ करील तो फार ॥ एवढा करिं उपकार ॥ कृष्णा० ॥ ६ ॥ कंठ शोषला अनंता॥ प्राण जाईल आतां ॥ पदर पसरीतें तुज ताता ॥ पावे रुक्मिणीकांता ॥ कृष्णा०॥

॥ ७ ॥ ऐकुनी बहिणीची करुणा ॥ आला यादवराणा ॥ द्रोपदी लोळतसे हरिचरणां ॥ उद्धव चिद्घन जाणा ॥ कृष्णा धांवरे० ॥ ८ ॥

## सौरी १ ली.

टाक रुका चाल रांडे कांगे केली गोवी ॥ पुसोनियां आलें ठाव ह्मणोनि देते शिवी ॥ ध्रु० ॥ आतां येणें छंदें नाचो विनोदें ॥ नाहीं या गोविंदें माझें मजसीं केलें ॥ १ ॥ कोरडे ते बोल कांगे वेचितेसी वायां ॥ वर्तें करूनी दावी तुझ्या मुळींचिया ठाया ॥ २ ॥ याजसाठीं म्यां डौर धरियेला हातीं ॥ तुका ह्मणे तुह्मा गांठी सोडायाची खंती ॥ ३ ॥

## सौरी २ री.

मोकळी गुंते रिती कुंथे नाहीं भार दावें ॥ घेडवाडा बैसली खोडा घेतली आपुल्या भावें ॥ ध्रु० ॥ ऐका बाई लाज नाहीं आणिकां त्या गरतीची ॥ समाधानीं उंच स्थानीं जाणें सेवा पतीची ॥ १ ॥ न बोलतां करी चिंता न मारितां पळे ॥ दादला सेजे नावडे निजे जगझोडीचे चाळे ॥ ॥ २ ॥ देखत आंध बहिर कानीं बोल बोलतां मुकें ॥ तुका ह्मणे पतन सोयरीं ऐसीं झालीं एकें ॥ ३ ॥

## सौरी ३ री.

सातें चला काजळ घाला तेल फणी करा ॥ दिवाण दारीं वैसले पारीं नाचों फेर धरा ॥ धु० ॥ या साहेबाचें झालें देणें वेळोवेळां नलगे येणें ॥ आतां हाटीं कशासाठीं हिंडे पाटी दुकानें ॥ १ ॥ अवघ्याजणी मुंडा धणी नाचों एके घाईं ॥ सरसावलें सुख कैसा चाळा एकेठायीं ॥ २ ॥ तुका ह्मणे बोळगों एका तोड चिंता माया ॥ देउं उद्गार आतां जाऊं मुळींचिया ठाया ॥ ३ ॥

## सौरी ४ थी.

नीट पाट करुनी थाट ॥ दावीतसे तोरा ॥ आपणाकडे पाहो कोणो ॥ निघाली बाजारा ॥ १ ॥ते सौरी नव्हे किती भक्तिविण फिकी ॥ धृ० ॥ चांग भांग करुनी सोंग ॥ दावी माळा मुद्री ॥ रुक्याची आस धरूनि ॥ हालविती फुद्री ॥ ॥ २ ॥ थोर घरीं करी फेरी ॥ तेथें नाचे बरी ॥ जेथें निघे रुका ॥ तेथें हालवी टिरी ॥ ३ ॥ आंत भांग बाहेर चांग सौरी ती नव्हे तेग ॥ तुका दास नटतसे ॥ न करी त्याचा संग ॥ ४ ॥

## सौरी ५ वी.

ये सखे माय ॥ नवल बोलूं काय ॥ नवल० धृ० ॥

देवळावरतें देऊळ बाई देखिलें एका एकीं ॥ दे० ॥ उफराटी पाहूं जातां झालें थोर सुखी ॥ ये सखे मा० ॥ १ ॥ देवळामध्यें उभी ठेली मूर्त निराकारी ॥ मूर्त० ॥ न्याहाळितां सईबाई झाली वारासारी ॥ ये सखे मा० ॥ २॥ निळी पिंवळी शुभ्रवर्ण सांवळी सकुमार ॥ सांवळी स० ॥ कस्तुरीचा टिळा भाळीं कासे पीतांबर ॥ ये सख० ॥ ३ ॥ चार मुख दहा डोळे आठ तीला हात ॥ आठ ती० ॥ नवखंड पोटीं तिच्या समुद्र आणि सात ॥ ये सखे मा० ॥ ४ ॥ राई एवढी डोई तिची गंगे एवढी वेणी ॥ गंगे० ॥ मान बारीक सुईपरी अनामची राणी ॥ ये सखे० ॥ ५ ॥ सद्गुरुकृपा पांडुरंगीं प्रसन्न झाली आजा ॥ प्रसन्न० ॥ अनन्य भावें शरण जातां तीच तया राजी ॥ ये सखे माय नवलं बोलूं काय ॥ नवल० ॥ ६ ॥

## सौरी ६ वी.

उभी राहें रांडे शब्द चाळ भांडे ॥ चब्द चाळ भांडे ॥ ॥ धृ० ॥ काजळ कुंकु लेऊनि रांडे किती करशील नखरा ॥ किती० ॥ भिल्लीण होऊनी रुद्र नेला ठकवीलें त्वां शंकरा ॥ उभी राहें रांडे० ॥ १ ॥ साही त्रिकुट अठरा साडे तिंही वेडावली ॥ तिंही वे० ॥ चौघीजणी वाद केला तेही धुंडावली

॥ उभी राहें रांडे० ॥ २ ॥ दुर्वासासीं गर्व केला तेथें ह्मा-
लीस घोडी ॥ तेथें ह्मा० ॥ कोठें ह्मणतां लाज नाहीं डाग-
वीया घोडी ॥ उभी राहें रांडे० ॥ ३ ॥ शुकाशीं जाऊनि
रांडे काय उजेड केला ॥ काय उ० ॥ मारुनीज्ञानबाण
तुझा ह्मोरा फिरविला ॥ उभीराहें रांडे० ॥ ४ ॥ रामदासें
पर्णुनी तुला लग्नीं टाकुनी दीलें ॥ लग्नीं टा० ॥ संतंसगती
जाणुनीयां फार फजीत केलें ॥ उभी रा० ॥ ५ ॥

## ॥ भजन. ॥

॥ स्वामी तारींरे जगदीशा ॥ जयजय पुराणपुरुषा ॥

## सौरी ७ वी.

सौरी झालें बाई आतां करूं गत काई ॥ करूं गत काई
॥ धृ० ॥ अटवे परतें निवटें झालें दिवा मागें सारा ॥ दिवा
मागें सारा ॥ हातापायां टिपरी लागे भुंगळ घेती वारा ॥
भुंगळ घेती वारा ॥ १ ॥ भावार्थाचें झालें गेलें गेलें सं-
तांपाशीं ॥गेलें संतांपाशीं ॥ ज्ञानडौर घेउन हातीं लिंगदेह
जोशी ॥ लिंगदेह जोशी ॥ २ ॥ पांच गाथ तीन माचे
त्यावर निजलें होतें ॥ त्यावर निजलें होतें ॥ फटफटीत उजा-
डलें खाटलें पडलें रितें ॥ खाटलें पडलें रितें ॥ ३ ॥ कर्म

नेणों धर्म नेणों नेणों आह्मी कांहीं ॥ नेणों आह्मी कांहीं ॥ ज्ञानदेव ह्मणे आह्मां जाणें येणें नाहीं ॥ जाणें येणें नाहीं॥ चाल माझ्या विठू आतां तुह्मी आह्मीं भेटूं ॥ ४ ॥

## सौरी ८ वी.

सहा दादले केले परि म्यां ऐसा नाहीं देखिला दादुला ॥ काया वाचा रमलें त्यासीं ऐसा नाहीं देखिला दादुला ॥ सौरी झालें सौरी सखे बाई झालें त्याची नवरी ॥ धृ०॥१॥ नग्न होउन भोगिला पुरुष म्यां ऐसा नाहीं देखिला दादुला॥ देतो गोड गोड खाया परि म्यां ऐसा नाहीं देखिला दादुला ॥ सौरी झालें सौरी सखे बाई त्याची नवरी ॥ २ ॥ केला संसार गोड परी म्यां ऐसा नाहीं देखिला दादुला ॥ याचे मनाची पुरली खोड परि म्यां ऐसा नाहीं देखिला दादुला ॥ सौरी झालें सौरी सखे बाई झालें त्याची नवरी ॥ ॥ ३ ॥ ऐसी नवरी झालें परि म्यां ऐसा नाहीं देखिला दादुला ॥ एका जनार्दनीं नमिलों पायीं ऐसा नाहीं देखिला दादुला ॥ सौरी झालें सौरी सखे बाई झालें० ॥ ४

## सौरी ९ वी.

एक तांब्याचें बावलें केलें ॥ पाट मांडोनी वरी बैसविलें॥

वस्त्र अलंकार चढवीले ॥ मना आलें तें नांव ठेविलेंगा ॥ या जगाशीं लागलें वेड ॥ याज० ॥ १ ॥ शुद्ध पाण्यानीं प्रक्षाळिलें ॥ गंधपुष्पांनीं वाहीलें ॥ धुप जाळोनी दीप उजळीले ॥ आनंदवुनी चालविलें ॥ मना आलें तें नांव ठेविलेंगा ॥ या० ॥२॥ करीं घेवोंनी वोवांळीलें ॥ आडवें पडोनीं दंडवत केलें ॥ आपपरी नाहीं देखिलें ॥ एका जनर्दनीं वोळखीलें ॥ या जगा० ॥ ३ ॥

## सौरी १० वी.

हाट करोनी घराशी आली बसली वोसरीच्या काठींरे ॥ घरांतली बाईल बाहेर निघाली वसवस लागे पाठींरे ॥ शंकीन बाबा डंकीन त्या घरीं शंकीन बाबा डंकीनरे ॥ ॥ शंकी० ॥ १ ॥ चौ शेराचा वरण भात केला, वर भाजीचा गोळारे ॥ मोठे मोठे घांस घेतां, दुरूनीच मारी डोळारे ॥ शंकीन बाबा डं०॥२॥आठ भाकऱ्या बारा पोळ्या, खिरडीं घातलीं सोळारे ॥ पाणी पिऊनी ढेंकर दिला, हिचा मराठी मौलारे ॥ शंकीन बा० ॥ ३ ॥ बारा सोळा लुगडीं नेसली, येईना पाठींपोटींरे ॥ सात खणाची चोळी शिवली, उराशी येईना गांठीरे ॥ शंकीन बा० ॥ ४ ॥ एका

जनार्दनीं ऐशी बाईल केलीरे ॥ तिच्या प्रसगीं सारीं दैवतें पळोनियां गेलींरे ॥ शंकीन बाबा ड० ॥ ५ ॥

## ॥ भजन. ॥

॥ निर्गुण दिगंबर राया हो ॥ श्रीगुरु मला भेट द्याहो ॥

## मुद्रा.

मुद्रा हो मज लागली खेचरी ॥ मुद्रेचें नांव बाई अगोचरी ॥ स्वानुभव प्रत्यक्ष अंतरीं ॥ कांहीं केल्या नव्हेची गोचरी ॥ मुद्रा हो० ॥ ध्रु० १ ॥ नयनांचें राहीलें देखणें ॥ श्रवणांचें पहा रुसलें ऐकणें ॥ वाचेचें खुंटलें बोलणें ॥ नवल मज मुद्रेचें कारण ॥ मुद्रा हो० ॥ २ ॥ अवघड अवघड बाई ये ॥ ज्ञानमुद्रा जाण हो सखये ॥ लाऊनी मुद्रा बैसले योगिये ॥ नवल मज मुद्रेचें भोगिये ॥ मुद्रा हो० ॥ ३ ॥ ऐशी हे मुद्रा जयाशी लागली ॥ त्याची सर्व भ्रांती फिटली॥ संसारचिंता सर्व निरसिली ॥ सद्गुरु कृपें केशवीं लाधली ॥ मुद्रा हो० ॥ ४ ॥

## जोगन.

पंचकर्ण सिद्धांत देखके मैं जोगन हुई ॥ सहज सहजमें अलख जगावे निर्गुणसों पाई ॥ पं० ॥ ध्रु०॥ पुराण अठरा

षट्शास्त्रका भेद मैंने लिया ॥ चार वेदका मरम देखके उसमें चळ दिया ॥ ऋग्वेद यजुर्वेद सामवेद अथर्वण पाया ॥ खेचरी चाचरी भूचरी अगोचरका गंडालिया ॥ अलक्ष मुद्रा लिई हातमों आवाज भरपाया ॥ ज्योगज्युगतका उलटा मारा सोबी बतलाया ॥ भात भातोका रंग उसमें मेरा दिल धाया ॥गुरुनाथकी मेहेर सखी आज मेरेपर हुई ॥ सहजस० ॥ १ ॥ च्यार देहका मकान यारो देखत मैं ज्याती ॥ स्थूल सूक्ष्म कारण महाकारनमों कीई वस्ती ॥ आप चले निरंजन सांईके पांव लागती ॥ अकार उकार मकार अर्धमातृका सुनलेती ॥ सुन सुनसों अर्ध सुनमों लग रहे ज्योती ॥ औ-टपीठ गोल्हाट श्रीहाट लिंगे पूजा करिती ॥ भ्रमरगुंफेके पास सांईके मैं ज्युकावंती ॥ आसन मारके ध्यान पकडेमेखे पतन हुई ॥ सहज स० ॥ २ ॥ ध्यान ग्यानकी मुद्रा मोरे कानोंमें ज्युगती ॥ षोडष दल द्वीदल देखके सहस्त्रदल तंत वितंत घन सुस्वर वाद्यें वाजती ॥ पडा उज्याला गलीमें तान भुल गये सुरती ॥ आगे पीछे सब रूप देखके उस राहासो आई ॥ स०॥३॥ध्यान ग्यानकी मुद्रा मोरे कानमें सुनतो ॥ अनुहातकी आखमों निंदा आज्याती ॥ चार देहेका भस्म चढाके उन्मनीमें सोती ॥ त्रिगुण तुंबा हातमों लैकर आलख

जगावती ॥ इडापिंगला मार्ग सुशुम्ना उस राहसों आई ॥ स० ॥४॥गुरुपीर मेरा बडा आवलिया पावन खुब कीया ॥ हस्त पकडके मुजे खेंचके आपनोमें लीया ॥ रहा हात शिर-पर मेरे फेर समज पाया ॥ सोहं शब्दका मकान मेरे हृदयोमें कीया ॥ बखलिंग स्वामिका प्रसाद चराचर लिया ॥ कुच रही ना बाकी अनुमात्रसों मिलाई सहज ॥ स० ॥ ५ ॥

## गोंधळ १ ला.

चौक भरीला आसनी, पाचारिली कुळस्वामिणी ॥ वैकुं-ठवासिनी ये धांवोनी झडकरी ॥ १ ॥ रंगा येई वो विठाई सांवळिये डोळसे॥तुझें श्रीमुख साजिरें तें मी केधवां देखेन ॥ ॥ ध्रु० ॥ रज तम धूपारती ॥ पंच प्राणाची आरती ॥अवघी सारोनी आईती ॥ ये धांवत झडकरी ॥२॥ मन मारोनियां मेंडा ॥ आशा मनशा तृष्णा तुटीं ॥ भक्तिभाव नैवेद्य ताटीं भरोनि केला हाकारा ॥ ३ ॥ डांका अनुहात गजरे ॥ येऊनि अंगासी संचरे ॥ आपुला घेऊनी पुरस्कार ॥ आरोग्य करी तुकयासी ॥ ४ ॥

## फुलवरा २ रा.

साच माझा देव्हारा । भाक ठेवा भाव खरा ॥ त्रिगुणा-चा फुलवरा ॥ आणा विनंती सांगतों ॥ ध्रु० ॥ माझें दैवत

हें रंगीं ॥ नाचे वैष्णवाच्या संगीं ॥ भरलें मग अंगीं ॥ निवाड करी दोहींचा ॥ १ ॥ तुझें आहे तुजपासीं ॥ परि तूं जागा चुकलासी ॥ चिवडुनियां नासी ॥ तुझ्या घरच्यांनीं केली ॥ २ ॥ आतां न पडे ठावें ॥ वांचुनियां माझ्या देवें ॥ अंधकार व्हावें । नासु ठाव शोधावा ॥ ३ ॥ आंधळ्यासी डोळे । देते पांगुळासी पाय ॥ वांझा पुत्रफळें ॥ नवस पुरविते विठाई ॥ ४ ॥ उगविलीं कोडीं ॥ मागें कित्येकांचीं बापुडीं॥तुका ह्मणे घडी नलगे नवस द्या आधीं ॥ ५ ॥

## गोंधळ ३ रा.

विनति घातली अवधारीं ॥ मज देई वो अभय करीं ॥ पीडिलों खेचरीं ॥ आणीक वारी नांवांची ॥ ध्रु० ॥ रंगा येई वो एकला रंग वोडवला हरिनाम उठिला गजर केला हाकारा ॥ १ ॥ देवांचे दैवतें तुज नमिलें आदिनाथें ॥ येई वो कृपावंते ॥ भोगा माझ्या धावतो ॥ २ ॥ न लावीं आतां वेळ ॥ आईति सारिली सकळ ॥ तुका ह्मणे कुळ ॥ आमुचिये दैवते ॥ ३ ॥

## गोंधळ ४ था.

माझा देव्हारा साचा ॥ नाहीं आणिक कोणाचा ॥ त्रिभु-

वनीं याचा ठसा नलगे पुसावें ॥ ध्रु० ॥ यारे लोटांगणी ॥ कांहीं करा विनवणी॥करील झाडणी । भूत काडी संसार॥१॥ पडिले विषयांचे गोंधळीं ॥ ते त्रिगुण आकळी ॥ हरिनाम आरोळी । कानीं मडतां ते उठी ॥ २ ॥ घेतला अहंकारें ॥ काम क्रोध या मत्सरें ॥ पळती प्रेमभरें ॥ अवघे ठाव सांडुनी॥३॥ घेतलासे पुरा ॥ माया ममता आसरा ॥ अवघ्या एकसरा ॥ पळती रंग देखोनी ॥ ४ ॥ तुका ह्मणे घ्यावा भाव । फिटेल मनिंचा संदेह ॥ आणीक नलगे ठाव । कांहीं कोठें हिंडावें॥५॥

## गोंधळ ५ वा.

राजस सुंदर बाळा ॥ पाहों आलीया सकळा वो ॥ बिंबीं बिंबोनि ठेली ॥ माझी परब्रह्म वेल्हाळा वो ॥ १ ॥ कोटि रवि शशी माझी परब्रह्म वेल्हाळा वो ॥ राजस विठाबाई माझें ध्यान तुझे मायी वो ॥ त्यजुनीयां चौघीसी ॥ लावी आपुलिये सोई वो ॥ धृ० ॥ सुकुमार साजिरी॥कैसी पाऊलें गोजिरीं वो ॥ कंठीं तुळशी माळा ॥ उभी भिवरेच्या तिरीं वो ॥ दंत हिरडच्या ज्योती॥शंखचक्र मिरवे करीं वो ॥२॥निर्गुण निराकार ॥ वेदां न कळेचि आकार वो ॥ शेषादिक श्रमले॥ श्रुती न कळे तुझा पार वो ॥ उभारोनि बाहे ॥ भक्तां देत

अभयकर वो ॥ ३ ॥ येउनि पंढपुरा ॥ अवतरली सारंगधरा वो ॥ देखोनि भक्तिभाव ॥ वोसरली अमृतधारा वो ॥ देऊनि प्रेमपान्हा ॥ तुकया स्वामीनें किंकरा वो ॥ ४ ॥

## गोंधळ ६ वा.

सुदिन सुवेळ ॥ तुझा मांडिला गोंधळ वो ॥ पंचप्राण दिवटे दोनी नेत्रांचे हिलाल वो ॥ धृ० ॥ पंढरपुरनिवासे ॥ तुझे रंगीं नाचत असें वो ॥ नवस पुरवीं माझा ॥ मनिंची जाणोनियां इच्छा वो ॥ १ ॥ मांडिला देव्हारा ॥ तुझा त्रिभुवनामाझारी वो ॥ चौक साधियेला ॥ नाभिकळस ठेविला वरी वो ॥ २ ॥ बैसली देवता ॥ पुढें वैष्णवाचें गाणें वो ॥ उद्गारें गर्जती ॥ कंठीं तुळशीचीं भूषणें वो ॥ ३ ॥ स्वानंदाचे ताटीं ॥ धूप दीप पंचारती वो ॥ ओंवाळिली माता ॥ विठाबाई पंचभूतीं वो ॥ ४ ॥ तुझें तुज पावलें ॥ माझा नवस पुरवीं आतां वो ॥ तुका ह्मणे राखे आपुलीया शरणांगता वो ॥ ५ ॥

## गोंधळ ७ वा.

सुंदुर मुख साजिरें ॥ कुंडलें मनोहर गोमटीं वो ॥ नागर नाग खोपा ॥ केशर कस्तूरी मळवटी वो ॥ विशाळ व्यंकट नेत्र ॥ वैजयंती तळपे कंठीं वो ॥ कास पितांबराची ॥ चंदन

सुगंध साजे उटी वो ॥ १ ॥ अतिबरवंटा वाळा ॥ आली सुलक्षणी गोंधळा वो ॥ राजस तेजोराशी ॥ मिरवी शिरोमणी वेल्हळा वो ॥ कोटि रविशशि प्रभा ॥ लोपल्या सकळा वो॥ नकळे ब्रह्मादिकां ॥ अनुपम्य इची लीळा वो ॥धृ०॥सांवळी सुकुमार ॥ गोरी भुजा शोभनी चारी वो ॥ सखोल वक्षस्थळ सुढाळ पदक झळके वरी वो ॥ कटीं क्षुद्रघंटिका ॥ शब्द करिताती माधुरी वो ॥ गर्जत चरणीं वाकी ॥ अभिनव संगीत नृत्य करी वो ॥ २ ॥ अष्टांगें मंडित काय ॥ वर्णावी रूप ठेवणी वो ॥ शोधिव सुंदर रासची ओतिली ॥ सुगंध लावण्यखाणी वो ॥ सर्व कळासंपन्न ॥ मंजुळ बोले हास्यवदनी वो ॥ वहु रूपें नटली ॥ आदिशक्ति नारायणी वो॥३॥ घटस्थापना केली ॥ पंढरपुरमहानगरीं वो॥अस्मानीं मंडप दिला तिन्ही तालांवरी वो ॥ आरंभिला गोंधळ हिनें ॥ चंद्रभागेतिरीं वो॥आली भक्तिकाजा॥कृष्णाबाई योगेश्वरी वो ॥४॥ तेहतीस कोटि देव ॥ चामुंडा अष्ट कोटि भैरव वो ॥ आरत्या कुरंवड्या ॥ करिती पुष्पांचा वरुषाव वो ॥ नारद तुंवर गायन ॥ ब्रह्मानंद करिती गंधर्व वो ॥ वंदि चरणरज तेथें ॥ तुकयाचा बांधव वो ॥ ५ ॥

## गांवगुंड १ ला.

आह्मी झालों गांवगुंड ॥ अवघ्यां पुंड भूतांसी ॥ ध्रु० ॥ दुसरें तें खेळों आलें ॥ एका बोले तो मियां ॥ १ ॥ अवघियांचा येऊं लाग ॥ नेदूं अंग शिवाया ॥ २ ॥ तुका ह्मणे खुंटूं नाद जिंनूं वाद सर्तिनें ॥ ३ ॥

## जोगी १ ला.

जग जोगी जग जोगी ॥ जगजागे बोलती ॥ ध्रु० ॥ जागता जगदेव ॥ राखा कांहीं भाव ॥ १ ॥ अवघा क्षेत्रपाळ ॥ पूजा सकळ ॥ २ ॥ पूजा पत्र कांहीं ॥ फल पुष्प तोय ॥ ३ ॥ बहुतां दिसां फेरा ॥ आला या नगरा ॥ ४ ॥ नका घेऊं भार ॥ धर्म तोचि सार ॥ ५ ॥ तुका माझें दान ॥ द्या जी अनन्य ॥ ६ ॥

## सरवदा १ ला.

ऐका गा ए भाई ॥ सरवदा सांगतो काई ॥ तेथें नाडेल माई ॥ दोघां पुत्रांची ॥ ते करिती तिची विटंबना ॥ अवघ्या प्रसिद्ध जना ॥ एक न मारिता शाहणा ॥ तो जाण सुख न पावे ॥ धृ० ॥ आणीक ऐका मा ए ॥ सरवदा सांगतो काय ॥ खरेंचि बोले तो जाय ॥ नरकामध्यें

अधोगती ॥ हें चौघांच्या मुखें ॥ मना आणावें सुखें ॥ अवघीं चुकती दुःखें ॥ खोटें बोला नरनारी ॥ १ ॥ आणीक नाडेल एक जाण ॥ सरवदा बोलतो वचन ॥ जागें माझें ह्मणोन ॥ पडिलें खान तया घरीं ॥ ह्मणोन न ह्मणा माझें कांहीं ॥ निजीं निजा सुखें ठायीं ॥ यत्न होईल तईं ॥ चोराठायीं विश्वास ॥ २ ॥ आणीक एकी परी ॥ सरवदा सांगतों थोरी ॥ दुःख पावेल नारी ॥ पतिव्रता यामधीं ॥ पांचांनीं दिधली हातीं ॥ ह्मणोनि न ह्मणावी निश्चिती ॥ परपुरुषीं होय रती ॥ सुखगती ते पावे ॥ ३ ॥ आणीक एकी परी ॥ सरवदा सांगतो तें करीं ॥ दान देतां जो न वारी ॥ नव्हे भला भला तो ॥ तुका ह्मणे आई ॥ येथें नांव काई ॥ सांगसी तें ॥ ठायीं ॥ मरो रांडेचें ॥ ४ ॥

## मलंग १ ला.

नजर करे सोहि जिंके बाबा दुरबी तमासा देख ॥ लकडी फांसा लेकर बैठा आगले ठकण भेख ॥ १ ॥ काहे भुला एक देखत आंखों मारतडांगो बाजार ॥ ध्रु० ॥ दमरी चमरी जो नर भुला ॥ सोत आघो हि लत खाये ॥ २ ॥ नहिं बुलावत किसे बाबा आप हि मत जाये ॥ कहे तुका उस असाके संग फिरफिर गोते खाये ॥ ३ ॥

## वैद्यगोळी १ ली.

अल्ला देवे अल्ला दिलावें अल्ला दारू अल्ला खिलावे ॥ अ-ल्लाबिगर नहीं कोय अल्ला करे सोहि होय ॥ ध्रु० ॥ मर्द होय तो खडा पीर नामर्दकुं नहीं धीर ॥ आपने दिलकुं करना खुसी तीन दामकी क्या सुखासी ॥ १ सब रसोंका किया मार ॥ भजन गोली एकहि सार ॥ इमान तो सब ही सखा ॥ थोडीं तो भी लेकर ज्या ॥ २ ॥ जिन्हो पास नित सोये ॥ वोहि बसकर तिरोवे ॥ सांतो पांचों मार चलावे ॥ उतार सो पीछे खावे ॥ ३ ॥ सब ज्वानी निकली जावे ॥ पीछे गधडा मट्टी खावे ॥ गांवढाळा सो क्या लेवे ॥ हगवनि भरी नहीं धोवे ॥ ४ ॥ मेरी दारु जिन्हे खाया ॥ दिदार दरगां सोहि पाया ॥ तल्हे मुंडी घाल जावे ॥ बिगारी सोवे क्या लेवे ॥ ५ ॥ बजारका बुझे भाव ॥ वोहि पुसता आवे ठाव ॥ फुकट बाटु कहे तुका ॥ लेवे सोहि ले हि सखा ॥ ६ ॥

## कावडे १ ला.

अहा रे भाई ॥ गंगा नव्हे जळ ॥ वृक्ष नव्हे वड पिं-पळ ॥ तुळशी रुद्राक्ष नव्हे माळ ॥ श्रेष्ठ तनु देवाचीया ॥ १ ॥ समुद्र नदी नव्हे पैं गा ॥ पाषाण ह्मणों नये लिंगा ॥ संत नव्हती जगा ॥ मानसा त्यासारिखे ॥ २ ॥ काठी ह्मणूं नये

वेतू ॥ अन्न ह्मणों नये सांतू ॥ शम राम हे मातु ॥ नये ह्मणों शब्द हे ॥ ३ ॥ चंद्र सूर्य नव्हती तारांगणें ॥ मेरु तो नव्हे पर्वतासमान ॥ शेष वासुकी नव्हे सर्प जाण ॥ विखाराच्या सारिखे ॥ ४ गरुड नव्हे पांखरूं ॥ ढोर नव्हे नंदिकेश्वरू ॥ झाड नव्हे कल्पतरू ॥ कामधेनु गाय न ह्मणावी ॥ ५ ॥कूर्म नव्हे कांसव ॥ डुकर नव्हे वराह ॥ ब्रह्मा नव्हे जीव ॥ स्त्री नव्हे लक्ष्मी ॥६॥ गवास नव्हे हाड॥ पाटाव नव्हे कापड॥ परीस नव्हे दगड ॥ सगुण ते ईश्वरीचे ॥ ७ ॥ सोनें नव्हे धातु ॥ मीठ नव्हे रेतु ॥ नाहीं नाहीं चर्मांतु ॥ कृष्णाजिन व्याघ्रांबर ॥ ८ ॥ मुक्ताफळें नव्हेति गारा॥खडच्याऐसा नव्हे हिरा ॥ जीव नव्हे सोईरा ॥ बोळवीजे स्वइच्छेनें ॥९॥गांव नव्हे द्वारावती ॥ रणसोड नव्हे मूर्ति ॥ तीर्थ नव्हे गोमती॥ मोक्ष घडे दर्शनें ॥ १० ॥ कृष्ण नव्हे भोगी ॥ शंकर नव्हे जोगी ॥ तुका पांडुरंगी ॥ हा प्रसाद लाधला ॥ ११ ॥

## आंधळा १ ला.

आंधळ्या पांगळ्याचा एक विठोबा दाता॥प्रसवला विश्व तेंचि सर्व होय जाणता ॥ घडी मोडी हेळामात्रें पाप पुण्य संचित ॥ भवदुःख कोण वारी तुजवांचुनि चिंता ॥ १ ॥ धर्म गा जागो तुझा तूंचि कृपाळू राजा ॥ जाणसी जीवींचें गा न

सांगतां सहजा ॥ धृ० ॥ घातली लोळणी गा पुंडलीकें वाळवंटी ॥ पंढरी पुण्य ठाव नीरे भीवरे तटीं ॥ न देखू दुसरेंगा झाली अदृश्य दृष्टी॥बोळला प्रेमदाता केली अमृतवृष्टी ॥ २ ॥ आणीक उपमन्यु एक बाळ धाकुटें ॥ न देखे न चालवे जना चालते वाटे ॥ घेतली लोळणी मा हरिनाम बोभाटें ॥ पावला त्याकारणें धांव घातली नेटें ॥ ३ ॥ बैसोनि खोळी शुक राहे गर्भे आंधळा ॥ शिणला येरझारी दुःख आठवी वेळा ॥ मागील सोसिलें तें ना भीं ह्मणे गोपाळा ॥ पावला त्याकारणें लाज राखिली कळा ॥ ४ ॥ न देखे जो या जना तया दावी आपणा ॥ वेगळा सुख दुःखा मोहो सांडवी धना ॥ आपपर तेंहीं नाहीं बंधुवर्ग सज्जना ॥ तुकया तेचिपरी झाली पावें नारायणा ॥ ५ ॥

## वासुदेव १ ला.

गातों वासुदेव मी एका ॥ चित्त ठेवूनि ठायीं भावें ऐका ॥ डोळे झांकुनि रात्र करूं नका ॥ काळ करीत बैसला लेखा गा ॥ १ ॥ राम राम स्मरा आधीं ॥ लाहो करा गांठ घाला मुळबंदी ॥ सांडावा उगिया उपाधी ॥ लक्ष लावून राहा गोविंदीं मा ॥ धृ० ॥ ऐसा अल्प मानवी देह ॥ शत गणिलें अर्ध रात्र खाय ॥ पुढें बालत्व पीडा रोग क्षय ॥ काय भ-

जनासी पुरलें तें पाहेंगा ॥ २ ॥ क्षणभंगुर नाहीं भरंवसा ॥ व्हारे सावध सोडा माया आशा ॥ न चले बळ मग पडेल फांसा ॥ पुढें हुशार आहे वोळसा गा ॥ ३ ॥ कांहीं थोडें बहुत लाग पाठ ॥ करा भक्तिभाव धरा बळकट ॥ तन मन ध्यान लावूनियां नीट ॥ जर असेल करणें गोड शेवट गा ॥ ४ ॥ विनवितों सकळां जनां कर जोडुनि थोरां लहानां ॥ दान इतुकें द्या मज दीना ॥ ह्मणे तुकया बंधु राम ह्मणा गा॥५॥

## वासुदेव २ रा.

गेले टळले प्रहर तीन ॥ काय निदसुरा अझून ॥ जागे होऊनि करा कांहीं दान ॥ नका ऐकोनि झांकों लोचन गा ॥ १ ॥ हरी रामकृष्ण वासुदेवा ॥ जाणवितसें जना ॥ चिपळ्या टाळ हातीं मुखीं घोष ॥ नारायण गा ॥ धृ० ॥ जें ठाकेल कोणा कांहीं ॥ फळ पुष्प अथवा तोय ॥ द्या परी मीस घेऊं नका भाई ॥ पुढें विन्मुख होतां बरें नाहीं गा॥२॥ देवा कारणें भाव तस्मात ॥ द्यावें नलगे फारसें वित्त ॥ झालें एक चित्त तरी बहुत ॥ तेवढ्यासाठीं नका करूं वाताहत गा ॥ ३ ॥ आलों येथवरी बहु सायासें ॥ करितां दान हेंचि मागावयास ॥ नका भार घेऊं करूं निरास ॥ धर्मसार फळ सं-

सारास गा ॥४॥ आतां मागुता येईल फेरा ॥ हें तों न घडे या नगरा ॥ ह्मणे तुकयाबंधु धरा ॥ ओळखी नाहीं तरी जाल अघोरा गा ॥ ५ ॥

## वासुदेव ३ रा.

रामकृष्ण गीतीं गात ॥ टाळ चिपळ्या वाजत॥छंदें आपुल्या नाचत ॥ नीज घेऊनि फिरत गा ॥ १ ॥ जनीं वनीं हा अवघा देव ॥ वासनेचा हा पुसावा ठाव ॥ मग वोळंमती वासुदेव ॥ ऐसा मनीं वसूं द्यावा भाव गा ॥ धृ० ॥ निजदासाची थोर आवडी ॥ वासुदेवासि लागली गोडी ॥ मुखीं नाम उच्चारी घडोघडीं ॥ ऐसी करा हे वासुदेव जोडीगा ॥ २ ॥ अवघा सारूनि शेवट झाला ॥ प्रयत्न नचले कांहीं केला ॥ जागा होई सांडुनि झोंपेला ॥ दान देई वासुदेवाला गा ॥ ३ ॥ तुका ह्मणे रे धन्य त्याचें जिणें ॥ जिहीं घातलें वासुदेवा केलें दान ॥ त्याला नलगे येणें जाणें ॥ जाहलें वासुदेवीं राहणें गा ॥ ४ ॥

## मुंगी.

ती मुंगी उमगा मुंगी उमगा ॥ मुंगी मुखीं त्रिवेणी गंगा ॥ ती मुंगी० ॥ धृ० ॥ उदकाचे ढवळे ते वाती ॥ तेथें

आंधारीं मुंगीनें लाविल्या ज्योती ॥ ती मुंगी० ॥ १ ॥ अवघें आकाश मुंगी मार्गें ॥ मुंगीनें संसार सोडिला मार्गें ॥ ती मुंगी० ॥ २ ॥ विष्णुदास मुंगीच्या मार्गें ॥ मुंगी उमगली खेचरासंगें ॥ ती मुंगी उमगा ॥ ३ ॥

## पद.

सांगड बांधारे भक्तीची ॥ या रघुनाथनामाची ॥ सांगड बांधा० ॥धृ०॥ संसार सागर सागर हा ॥ भरला जातो पूर ॥ सांगड बां० ॥ १ ॥ लाटा उसळती विषयाच्या ॥ ह्या बहुतां प्रपंचाच्या ॥ सांगड बां० ॥२॥ प्रपंच भोंवरा भोंवरा ॥ फिरतसे गरगरां ॥ सांगड बांधा० ॥ ३ ॥ माणकोजी बोधला भक्त भला ॥ हा हरिनामीं रंगला ॥ सांगड बांधा० ॥ ४ ॥

## कांतीण.

तीन ताल जिचें ज्ञान ॥ पहा कांतीण ॥ तीन ताल०॥धृ०॥ पहा कांतिणीचा दोरा ॥ सहा चार अठरा करी येरझारा ॥ चंद्रसूर्य तिच्या मंदोरा ॥ दीप लाविती ॥ तीन ता०॥ १ ॥ पहा कांतीणीचा झळाळ ॥ त्यामध्यें भरले तीन ताल ॥ त्या मध्यें खेळती तीन बाळ ॥ घ्यावे वोळखुन ॥ तीन ता०॥२॥ कांतीण करी पुरुष नार ॥ नाहीं पुरुष नाहीं नार ॥ नाहीं माय बाप भ्रतार ॥ करी स्मरण ॥ तीन० ॥ ३ ॥ कैची कां-

तीण कैंचा दोरा ॥ सद्गुरु गोपाळनाथ खरा ॥ चुकविला चौऱ्याशींचा फेरा ॥ दाविली खूण ॥ तीन ताल जी० ॥ ४ ॥

## प्रदक्षिणा.

धन्य ही प्रदक्षिणा सद्गुरुरायाची ॥ माझ्या श्रीगुरुरायाची ॥ झाली त्वरा सुरवरां विमान उतरायाची ॥ धन्य० ॥ धृ० ॥ गुरुभजनाचा महिमा नकळे आगमनिगमाशीं ॥ अनुभव जे जाणती तेची गुरुपदींचे अभिलाषी ॥ धन्य ही० ॥ १ ॥ पदोपदीं झाल्या अपार पुण्याच्या राशी ॥ सर्वही तीर्थें घडलीं आह्मां आदिकरुनियां काशी ॥ धन्य ही० ॥ २ ॥ विणे टाळ मृदंग घोष भक्ति भावार्थे गाती ॥ नामसंकीर्तनें निजानंदें नाचती ॥ धन्य ही० ॥ ३ ॥ कोटी ब्रह्महत्या पळती करितां दंडवत ॥ लोटांगण घालितां मोक्ष लागे पायांस ॥ धन्य ही० ॥ ४ ॥ करूनियां प्रदक्षिणा देव भावें वोंवाळिला ॥ श्रीरंगात्मज तुझे सन्मुख उभा राहिला ॥ धन्य० ॥ ५ ॥

## हुमाणे.

ऐकरे गुरुपुत्रा हुमाणे सिद्धाचें बोलणें ॥ ऐकरे गुरु० ॥ ॥ धृ० ॥ हत्ती मी देखीला बहु ढीग ॥ त्याचे मस्तकीं शिंग ॥ गुंतलें कांतीणी तंतुसंगें ॥ जाणे चतुर हुमाणे ॥ सिद्धा० ॥

ऐकरे गु० ॥ १ ॥ हांडी कापसाची केली ती अग्नीवर ठेविली ॥ तांदुळ वैरोले लोखंड योगीयाचे बळें ॥ जाणे चतुर हुमाणे, सिद्धाचें बोलणें ॥ ऐकरे० ॥२॥ नाथ गोपाळ खंबिर ज्ञानाचा सागर ॥ शेख सुलतान किंकर लोळे चरणावर ॥ ऐक गुरु पुत्रा हुमाणे, सिद्धाचें० ॥ ३ ॥

## वटवाघूळ.

वटवाघूळ झालें बाई ॥ करावें काई ॥ उपाय नाहीं ॥ वटवाघूळ० ॥ धृ० ॥ पूर्वी पंक्तीस केला भेद ॥ नाहीं अंतःकरण शुद्ध॥झालें वटवाघूळ प्रसिद्ध॥व०॥१॥वटवाघूळीचा जन्म घेऊन ॥ घेतलें उफराटें टांगून ॥ तोंडीं नरक भरला जाण ॥ वटवाघूळ० ॥ २ ॥ वटवाघळीची यातना मोठी ॥ भोगिल्या लक्ष चौऱ्याशीं कोटी ॥ जन्ममरणाच्या तुटल्या गांठी ॥ वट० ॥ ३ ॥ एका जनार्दनीं वटवाघूळ झालें ॥ सद्गुरुला शरण गेलें ॥ जन्ममरण चुकविलें ॥ वटवाघूळ झालें बाई० ॥ ४ ॥

## काऊ.

पैल तो काऊ कोकतसे ॥ शकून ग माय सांगतसे ॥ ॥ धृ० ॥ उड उडरे काऊ ॥ तुझी सोन्यानें मढवीन पाऊ ॥ पाहुणे पंढरिराऊ ॥ घरीं कैं येती ॥ १ ॥ दहीं भाताची

उंडी ॥ लावीन तुझ्या तोंडीं ॥ जीवा पडी वऱ्याची गोडी॥ सांग वेगीं ॥ २ ॥ दुधा भरून वाटी॥लावीन तुझे ओंठीं ॥ प्रत्यक्ष सांग गोष्टी ॥ विठू येईल कैं ॥ ३ ॥ आंबीया डाहाळी ॥ फळें चोखी रस आंवळी ॥ आजिचे रे काळीं ॥ शकुन सांगे ॥ ४ ॥ ज्ञानदेव ह्मणे ॥ जाणिजे येणं खुणें ॥ भेटूं पंढरीराणें ॥ शकुन सांगे ॥ ५ ॥

## पद.

3.3
ml

॥ बाळसंतोष ॥

बाळसंतोष बाबा बाळसंतोष ॥ धृ० ॥ तुझ्या आंगींचा उतारा ॥ देईं देईं गा दातारा ॥ पुनः न यें मी माघारा ॥ बाबा बाळसंतोष ॥ १ ॥ तुझे मस्तकींचा टोप ॥ देतां होईल प्रताप ॥ विलया जाती महापापें ॥ बाबा बाळसंतोष ॥ २ ॥ आह्मी परब्रह्म भिकारी ॥ विनवितों तुझे द्वारीं ॥ द्यावी भक्तीची भाकरी ॥ बाबा बाळसंतोष ॥ ३ ॥ शाल पीतांबर सकलाद ॥ ज्ञान कंचोळी ती शुद्धाशुद्ध ॥ तुका ह्मणे मी परदेशी॥आलों दान मागायासी ॥ बाबा बाळ० ॥ ४ ॥

## पद.

गुरु सगुण निर्गुण ॥ खेळ दावि मजलागून ॥ गु० ॥

धृ० ॥सत्रावीचें गळतें जीवन ॥ पीक विकतें त्यापासून ॥ चहुंकडे पाहे न्याहाळून ॥ गु०॥ १ ॥ नेत्र चंद्रसूर्य जाण ॥ पाहे ब्रह्मांडीं न्याहाळून ॥ तेज फांकलें गगनांतून ॥ येवढी चंद्रकळा जाण ॥ गु० ॥२॥ आत्मबाळ निरंजन ॥उमाकांत धेनूचें दूध काढून ॥ बाळ खाय मुखाविण ॥ ऐसी सद्गुरूची खूण ॥ गु० ॥ ३ ॥ सद्गुरूनीं करीं धरूनी ॥ मजला नेलें त्रिभुवनीं ॥ दाविली अलक्ष आत्मखूण ॥ पाहिली गोपाळ-नाथ संगतीन ॥ गुरू सगुण० ॥४॥

## पद.

तूं कसा उघडा असोनी दिसेना डोळारे, तूं कसा ॥धृ०॥ गोविले प्राणमात्रेसी आपण निराळारे, तूं कसा लावूनी मायेचा मोह बांधिला गळारे, तूं कसा ॥ हा भरला मायेचा पूर दिसेना धूर रे तूं कसा ॥ चाल ॥ या सुखासी भुलले वायां रे, या सु० ॥ जा शरण सद्गुरुरायारे, जा श० ॥ तन मन धन मिथ्या मायारे, तन म० ॥ मन असेल गुरुच्या पायां रे, मन अ० ॥ तोड ॥ मन मोहरिरे तूं हरी उघड पर-द्वारीं, राजमंदिरीं रे, तूं हरी ॥ १ ॥ गुरुचरणीं शरण रिघावें शुद्ध करावेंरे, गुरुच० ॥ गुरमुखीं द्वादश अक्षरी मंत्र अढळ-

पद् घ्यावें रे, गुरुमु० ॥ चाल ॥ तो मंत्र अनाथ आदीरे, तो मंत्र अ० ॥ ब्रह्मयासी तो उपदेशीरे, ब्रह्मया० ॥ जप केला सनकादिकासीरे, जप केला सन० ॥ उपदेशिला प्रल्हादासीरे, उपदे० ॥ बैसविलें अढळपदासीरे, बैसवि० ॥ मनमोहरीरे, मनमोहरीरे तूं हरी, उघड परद्वारीं, राजमंदिरीं रे, तूं ह० ॥२॥ जरी कृपा करील गुरुराज दाखवील नेत्ररे, जरी कृ० ॥ मंगळ हरीचें नाम ऐकावें स्तोत्ररे, मंगळ० ॥ पहा जनीं जनार्दन सखा हरी कुळ गोत्ररे, पहा जनीं० ॥ हालवी जगाची दोरी धरूनि कळसूत्ररे, हाल० ॥ चाल ॥ पावन गुरुचें नाम हो, पावन गु० ॥ योगीयासी निजसुख धामहो, योगीया० ॥ ज्ञानीयासी आत्मारामहो,ज्ञानीया० ॥मनमोहरी मनमोहरीरे तूं हरी, उघड परद्वारीं, राजमंदिरीं रे, तूं हरी ॥३॥

## हरिजागर.

नमन माझें सद्गुरुनाथा ॥ शिवा शंकराच्या सुता ॥ त्याचे चरणीं ठेवूनी माथा ॥ पंढरीनाथा आळवीतें ॥ १ ॥ रुक्मीणीचा प्रिय कांत ॥ प्रकटला हृदयांत ॥ जागर केलासे त्वरित ॥ जागर माथा आळवीतें ॥ २ ॥ आश्विन शुद्ध दशमी दिवशीं ॥ आरंभ होतो जागरासी ॥ तेतीस कोटी देव ऋषी ॥ दहीं दुधासी पाहूं येती ॥ ३ ॥ देव स-

धृ० ॥सत्रावीचें गळतें जीवन ॥ पीक विकतें त्यापासून ॥ चहुंकडे पाहे न्याहाळून ॥ गु०॥ १ ॥ नेत्र चंद्रसूर्य जाण ॥ पाहे ब्रह्मांडीं न्याहाळून ॥ तेज फांकलें गगनांतून ॥ येवढी चंद्रकळा जाण ॥ गु० ॥२॥ आत्मबाळ निरंजन ॥उमाकांत धेनूचें दूध काढून ॥ बाळ खाय मुखाविण ॥ ऐसी सद्गुरूची खूण ॥ गु० ॥ ३ ॥ सद्गुरूनीं करीं धरूनी ॥ मजला नेलें त्रिभुवनीं ॥ दाविली अलक्ष आत्मखूण ॥ पाहिली गोपाळ-नाथ संगतीन ॥ गुरू सगुण० ॥४॥

## पद.

तूं कसा उघडा असोनी दिसेना डोळारे, तूं कसा ॥धृ०॥ गोविले प्राणमात्रेसी आपण निराळारे, तूं कसा लावूनी मायेचा मोह बांधिला गळारे, तूं कसा ॥ हा भरला मायेचा पूर दिसेना धूर रे तूं कसा ॥ चाल ॥ या सुखासी भुलले वायां रे, या सु० ॥ जा शरण सद्गुरुरायारे, जा श० ॥ तन मन धन मिथ्या मायारे, तन म० ॥ मन असेल गुरुच्या पायां रे, मन अ० ॥ तोड ॥ मन मोहरिरे तूं हरी उघड पर-द्वारीं, राजमंदिरीं रे, तूं हरी ॥ १ ॥ गुरुचरणीं शरण रिघावें शुद्ध करावेंरे, गुरुच० ॥ गुरमुखीं द्वादश अक्षरी मंत्र अढळ-

पद् व्यावें रे, गुरुमु० ॥ चाल ॥ तो मंत्र अनाथ आदीरे, तो मंत्र अ० ॥ ब्रह्मयासी तो उपदेशीरे, ब्रह्मया० ॥ जप केला सनकादिकासीरे, जप केला सन० ॥ उपदेशिला प्रल्हादासीरे, उपदे० ॥ बैसविलें अढळपदासीरे, बैसवि० ॥ मनमोहरीरे, मनमोहरीरे तूं हरी, उघड परद्वारीं, राजमंदिरीं रे, तूं ह० ॥२॥ जरी कृपा करील गुरुराज दाखवील नेत्ररे, जरी कृ० ॥ मंगळ हरीचें नाम ऐकावें स्तोत्ररे, मंगळ० ॥ पहा जनीं जनार्दन सखा हरी कुळ गोत्ररे, पहा जनीं० ॥ हालवी जगाची दोरी धरूनि कळसूत्ररे, हाल० ॥ चाल ॥ पावन गुरुचें नाम हो, पावन गु० ॥ योगीयासी निजसुख धामहो, योगीया० ॥ ज्ञानीयासी आत्मारामहो,ज्ञानीया० ॥मनमोहरी मनमोहरीरे तूं हरी, उघड परद्वारीं, राजमंदिरीं रे, तूं हरी ॥३॥

## हरिजागर.

नमन माझें सग्दुरुनाथा ॥ शिवा शंकराच्या सुता ॥ त्याचे चरणीं ठेवूनी माथा ॥ पंढरीनाथा आळवीतें ॥ १ ॥ रुक्मीणीचा प्रिय कांत ॥ प्रकटला हृदयांत ॥ जागर केलासे त्वरित ॥ जागर माथा आळवीतें ॥ २ ॥ आश्विन शुद्ध दशमी दिवशीं ॥ आरंभ होतो जागरासी ॥ तेतीस कोटी देव ऋषी ॥ दहीं दुधासी पाहूं येती ॥ ३ ॥ देव स-

वांगीं सांवळा ॥ पंचामृताचा सोहळा ॥ मुखीं लोणीयाचा गोळा ॥ अनंत कळा न कळे ॥ ४ ॥ पहांटेचे प्रहररात्रीं आनंद होतो घरोघरीं ॥ दह्या दुधाच्या घागरी ॥ श्रीहरीसी अर्पिती ॥ ५ ॥ साखर मधाचें मर्दन ॥ मोगरेल अगंजा चर्चून ॥ उष्ण उदक शुद्ध स्नान ॥ मनमोहन शोभत ॥६॥ पुजाऱ्याचें पुण्य थोर ॥ अखंड पूजा करतील कर ॥ नाना-परीचे उपचार ॥ दीनोद्धारा भोगविती ॥ ७ ॥ पूजा पहाती थोर थोर ॥ काशीखंडीचें शंकर ॥ त्रिशूळ हातींचा डमरू॥ गळां हार शेषाचा ॥ ८ ॥ भैरव क्षेत्रीं बाळराजा ॥ त्याची तिहीं लोकीं ध्वजा ॥ हातीं काठी सन्निध उभा ॥ पाहतो शोभा देवाची ॥ ९ ॥ चतुर्भुज गजानन ॥ त्याचें उंदीरा-चें वहन ॥ प्रेमें नाचे आनंदानें ॥ जगज्जीवना पाहतसे ॥ ॥ १० ॥ वायुपुत्र हनुमंत ॥ त्याची सेवा अखंडित ॥ दोनी जोडुनी हस्तक ॥ चरणीं मस्तक ठेवितसे ॥ ११ ॥ ब्रह्मदेव शिरोमणी ॥ तिन्ही त्रिभुवनींचा तो धनी ॥ पंचामृतासी पाहोनी ॥ अंतरीं ध्यान करीतसे ॥ १२ ॥ राधा रखुमाई सत्यभामा ॥ त्यांची प्रीति असे मेघश्यामा ॥ मिळुनी गेली आत्मारामा ॥ देहभान विसरल्या ॥ १३ ॥ लक्ष्मीचा अहंकार ॥ नारायणें केला दूर ॥ झाली पायांची किंकर ॥

सर्वांहुनी वरिष्ठ ॥ १४ ॥ पुंडरीक भीमरथी ॥ मुख्य गोद भागीरथी ॥ नित्यनेमाशीं येती॥हरिजागरा सावधान॥१५॥ नारद ह्मणे ऋषीश्वरा ॥ वीणा वाहतो योगीश्वरा ॥रामनामाचा गजर ॥ निरंतर ध्यात असे ॥ १६ ॥ गिरिवरधारी व्यंकटरमणा ॥ त्याची वस्ती तैलंगणा ॥ पंचामृताशीं पाहुनी ॥ अंतरीं ध्यान करीत असे ॥ १७ ॥ नरशिंगपुरचा नरहरी ॥ निरा नरशिंगपूर भोंवरी ॥ उभे राहुन मंचकावरी ॥ मोक्ष पंढरी ध्यात असे ॥ १८ ॥ तुळजापुरची निवासिनी ॥ नांव तुझें वरदायिनी ॥ घाट शिळेचे वरूंनी ॥ अंतरीं ध्यान करीतसे ॥ १९ ॥ नरशिंगपूरचा नरहरी ॥ कोळे नरशिंगपूर भोंवरी ॥ गुप्त अनुष्ठान करी ॥ हरिजागरा सावध ॥ २० ॥ करवीर कोल्हापुरवासिनी॥तूं तर विश्वाची जननी ॥ दक्षिण केदार घेऊनी ॥ धांउनी येती जागरा ॥ २१ ॥ निवृत्ति ज्ञानदेव मुक्ताबाई ॥ सोपानदेव चौथा भाई ॥चोखा नामदेव जनाबाई ॥ अक्षयीं पायीं राहिले ॥ २२ ॥ पैठणींचा एकनाथा ॥अरण्यभेंडीचा सांवता ॥तो तर देवाचा पढियंता ॥ प्रीती येतो जागरा ॥ २३ ॥ नरसिंह हुंडिवाला ॥ गोराकुंभार बहुत भला ॥ बाळकं तुडवुनी काला केला ॥ आत्मा नेला जागरा ॥ नमन० ॥ २४ ॥

## फुगडी १ ली.

फुगडी फू फुगडी घालितां उघडी राहे ॥ लाज सांडोनि एक एकी पाहे ॥ धृ० ॥ फुगडी गे अवघें मोडीगे तरीच गोडीगे संसार तोडी गे ॥ १ ॥ मागें जें शिकली होतीस पोटीं ॥ तेंचि विचारूनियां आतां उच्चारीं ओंठीं ॥२॥ त्रिगुणांची वेणी तुझे उडते पाठीं ॥ सांवरूनि धरीं घालीं मूळबंदीं गांठी ॥ ३ ॥ आगळें पाऊल जिंके एका एक ॥ पावसी मान हे मानवती तिन्ही लोक ॥ ४ ॥ तुका ह्मणे तुजमजमध्यें एक भाव ॥ सम तुकें वार घेऊं पावों उंच ठाव ॥५॥

## फुगडी २ री.

फुगडी फू सवती माझे तूं ॥ हागुनि भरलें धू तुझ्या ढुंगा तोंडावरि थूं ॥ धृ० ॥ फुगडी घेतां आली हारी ॥ऊठ जावों जगनोवरी ॥ १ ॥ हात पाय बेंबळ जाती ॥ ढुंगण घोळितां लागे माती ॥२॥ सात पांच आणिल्या हरी ॥ वांचूनि काय तगसी पोरी ॥ ३ ॥ सरला दम पांगले पाय ॥ अझुनि वरी घोळसी काय ॥ ४ ॥ तुका ह्मणे अझुनि तरी ॥ सांगितलें तें गधडी करीं ॥ ५ ॥

## लखोटा १ ला.

लये लये लखोटा ॥ मूळवंदि कासोटा॥भावा केलें साहे॥ आतां माझें पाहें ॥ १ ॥ हातोहातीं गुंतली ॥ जीवपणा मुकली ॥ धीर माझा निका ॥ सांडी बोल फिका ॥२ ॥अंगीकारी हरी ॥ नको पडों फेरी ॥ लाज धरीं भांडे ॥ जग झोडी रांडे ॥ ३ ॥ बैस भावा पाठीं ॥ ऐक माझ्या गोष्टी केला सांडी गोहो ॥ येथें धरीं मोहो ॥४॥पाठमोरा डोल ॥ आवरीतें बोल ॥ पांगलीस बाळा ॥ पुढें अवकळा ॥ ५ ॥ आतां उभी ठायीं ॥ उभा उभीं पाहीं ॥ नको होऊं डुकरी॥ पुढें गाढव कुतरी ॥ ६ ॥ नाम केलें खरें॥आपुलें म्यां वरें॥ तुका ह्मणे येरी ॥ पांगविल्या पोरी ॥ ७ ॥

## हुंबरी १ ली.

तुह्मीं कोण घाली हुंबरी ॥ साहि पांगल्या अठरा चारी ॥ ॥ धृ० ॥ सहस्रमुखावरी हरी ॥ शेष शिणविलें ॥ १ ॥ चेंडुवासवें घातली उडी ॥ नाथिला काळिया देऊनि बुडी ॥ २ ॥ अशुद्ध पितां करुणा नाहीं ॥ तुवां माउशी ही मारियेली ॥ ॥ ३ ॥ रावणाचें घर बुडविलें सारें ॥ त्याचीं रांडापोरें मारियेलीं ॥ ४ ॥ जाणों तो ठावा आहेसी आह्मां ॥ तुवां

आपुला मामा मारियेला ॥ ५ ॥ याशीं खेळतां नाश थोरू॥ ॥ तुकयास्वामी शारंगधरू ॥ ६ ॥

## हमामा १ ला.

मशीं पोरा घेरे बार ॥ तुझें बुजीन खालील द्वार ॥ पोरा हमामा रे हमामा रे ॥ धृ० ॥ मशीं हमामा तूं घालीं ॥ पोरा वरी सांभाळी खालीं ॥ १ ॥ तरीच मशीं बोल ॥ पोरा जिव्हाळ्याची ओल ॥ २ ॥ मशीं घेतां भास ॥ जीवा मीतूंपणा नास ॥ ३ ॥ मज सर्वे खरा ॥ पण जाऊं नेदी घरा ॥ ४ ॥ आमुचिये रंगीं ॥ तुझें तगेना ये संगीं॥५॥ तुक्यासवें भास ॥ हरी जीवा करी नास ॥ ६ ॥

## हमामा २ रा.

हमामा रे पोरा हमामा रे॥हमामा घालीतां ठकलें पोर ॥ करी येरझार चौऱ्यांशींची ॥ ध० ॥ पहिले प्रहरा रंगासि आलें ॥ सोहं सोहं सें बार घेतलें॥देखोनी गडी तें विसरलें॥ डाई पडिलें आपणची ॥ १ ॥ दुसऱ्या प्रहरा महा आनंदें ॥ हमामा घाली छंदछंदें ॥ दिस वाढे तो गोड वाटे ॥ परी पुढें नेणें पोर काय होतें तें ॥ २ ॥ तिसऱ्या प्रहरा घेतला बार ॥ अहंपणें पाय न राहे स्थिर ॥ सोस सोस करितां डाई पडसी ॥ सत्य जाणें हा निर्धार ॥ ३ ॥ चौथ्या प्रहरा

हमामा ॥ घालिसी कांपविसी हातपाय ॥ सुर्यांपाटिलाचा पोर यम ॥ त्याचे पडसील डाईं ॥ ४ ॥ हमामा घालितां ञ्याला तुका ॥ त्यानें सांडिली गड्याची सोई ॥ यादवांचा मूळ एक विठोबा ॥ त्यासवें घारितो गाईं ॥ ५ ॥

## गाई १ ली.

आह्मां घरीं एक गाय दुभताहे ॥ पान्हा न समाये त्रिभुवनीं ॥ धृ० ॥ वान ते सांवळी नांव तें श्रीधरा घरे ॥ वसुंधरा चौदा भुवनें ॥ १ ॥ वत्स नाहीं माय भलत्या सवें जाय ॥ कुर्वाळी तो लाहे भावभरणा ॥ २ ॥ चहूं धारीं क्षीर वोळली अमुप ॥ धाले सनकादिक सिद्ध मुनी ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझी भूक तेथें काय॥जोगाविते माय॥तिन्ही लोकां॥४॥

## कांडण १ लें.

सिद्ध करूनियां ठेविलें कांडण ॥ मज सांगातीण शुद्ध बुद्धि गे ॥ धृ० ॥ आठवण हा धरी मज जागें करी ॥ मागिले पाहरीं शेवटिंचा गे ॥ १ ॥ समतुकें घाव घाली वो साजणी ॥ मी तुज मिळणी जंव मिळे ॥ २ ॥ एक कशी पाखडी दुसरी निवडी ॥ निःशेष तिसरी ओज करी ॥ ३ ॥ सरलें कांडण पाकसिद्धि करी मिळवणे क्षीरीसाखरेचें ॥ ४ ॥ उद्धव अक्रूर बंधु दोघेजण ॥ बाप नारायण जेवणारा ॥५॥

तुका ह्मणे मज माहेरीं आवडी॥ह्मणोनि तांतडी मूळ केलें॥६॥

## कांडण २ रें.

सांवडी कांडण ओंवी नारायण ॥ निवडे आपण भूससार ॥ ध्रृ० ॥ मुसळ आधारीं ॥ आवरूनि धरी ॥ सांवरोनि धरीं घाव घालीं ॥ १ ॥ वाजतो कांकणें अनुहत गजरें॥ छंद माहियेरे गाऊं गीती ॥ २ ॥ कांडितां कांडण नव्हे भाग शीण ॥ तुजमजपण निवडे तो ॥ ३ ॥ तुका ह्मणे रूप उमटे आरिसा ॥ पाक त्या सरिसा शुद्ध झाला ॥ ४ ॥

## जोहार १ ला.

अरे महारा मद्मस्ता ॥ कांहो भलतेंच बामणबुवा बोलता ॥ तुझ्या बापाचें काय भय आहे ॥ तुझा आमचा मायबाप एकच आहे ॥ एक असें कशावरून ह्मणतोस ॥ निर्गुणापासून अवघे झालों ॥ निर्गुण तुजला काय ठावें ॥ तरी संतांलागीं शरण जावें ॥ शरण गेल्यानें काय होईल ॥ चुकेल चौंऱ्याशींचा फेरा ॥ ही खूण तुला कशानीं कळली ॥ निवृत्तिप्रसादें ॥ ज्ञानदेव ह्मणे फळासी आलें ॥ १ ॥

## जोहार २ रा.

मायबाप जोहार ॥ तुमच्या महाराचा मी माहार ॥ १ ।

मी भोक भूक्यालों ॥ तुमच्या उष्ट्यासाठीं आलों ॥२॥ थोर करूनियां आस ॥ तुमच्या दासाचा मी दास ॥ ३ ॥ तुका ह्मणे पांटी ॥ आणिली तुमच्या उष्ट्यासाठीं ॥ ४ ॥

## जोहार ३ रा.

आजी मायबापा करितों मी जोहार ॥ आलों येसकर सांगावया ॥ १ ॥ फाकूं नका कोणी रूजु झालीया वांचुनी ॥ सांगा कीजे कोणी घरधन्या ॥ २ ॥ आजी मायबापा बाकी तुह्मी झाडा ॥ नाहीं तरी खोडा टाकूं ह्मणती ॥३॥तुका ह्मणे तुह्मी नका करूं बोली॥आखेरचे सालीं झाडा घेती॥४॥

## जोहार ४ था.

अंवदां आली यमाची पाळी ॥ कांहो तोंडें करितां काळीं ॥ चाउडी चलावें येवेळीं ॥ शिव्यागाळी वेऊं नका कीं जी मायबाप ॥ १ ॥ शेत अवघें पांच कोस ॥ तेंही तुह्मीं केलें वोस ॥ पुढें रात्रीं कित्येक दिवस ॥ तुमचें तुह्मांस ॥ न राहे कींजी मायबाप ॥ २ ॥ आली बाकी बेभाग झाडा ॥ नाहीं तरी पाईं पडेल खोडा ॥ मग कोणाच्या न चालतील भिडा ॥ सावध राहा कींजी मायबाप ॥ ३ ॥ ही मायिती न चाले कांहीं ॥ दुरुस्त वर्तावें भाई ॥ नाहीं तरी

खालती डोई वरती पाई ॥ नव महिने उणे पुरे ॥ होतील कींजी मायबाप ॥ ४ ॥ उगदेच कां करितां गुरें ॥ गांवचीं कां बुजवितां द्वारें ॥ झाडा फेडा बळज्वारें ॥ सुटाना कींजी मायबाप ॥ ५ ॥ कुळकर्ण स्वाधीन करा ॥ आल्या खर्चांचा ताळा धरा ॥ गयाळ मयाळ जरी बंद करा ॥ पुढें येईल मजुरा ॥ निजपदवी कींजे मायबापां॥ ६ ॥ असेकद्‌ारी वरी करा ॥ केल्या कमाईस नेऊं नका घरा ॥ साधावी रसाळ ऐन जिन्नसा ॥ धन्याचाच कीजे मायबापें ॥ ७ ॥ मी तो विठोजी पाटलाचा महार ॥ चोख्यामेळ्याचा जोहार ॥ सकळ संतांचा कारभार ॥ मज नफराचे शिरीं कीजी मायबाप ॥ ८ ॥

## जोहार ५ वा.

जोहारजी मायपाव जोहार ॥ मी तो सूर्यवंशीं रामजी पाटलाचा माहार ॥ त्याचे घरचा झाडी फेडीचा कारभार ॥ तो मज नफराचे शिरीं कीजे मायबाप ॥ १ ॥ काय सांगू अयोध्यापट्टण ॥ महा स्थळ मनोहर जन ॥ तेथें नांदती कोण कोण ॥ ते सकळिक जन ऐका कीजे मायबाप ॥ २ ॥ त्या विदेशीं दिलपत राजा ॥ त्याचे पोटीं दशरथराव वोजा॥ त्याच्या सुत्रावरी कउजा ॥ चालिल्या कीजे मायबाप

॥ ३ ॥ त्याचे पोटीं राम जगजेठी ॥ कांबीट मोडिलें प-
नाचे साठीं ॥ विन्मुख करोनि राज्याकोटी ॥ तो मुक्काई प्र-
णिलीच कीजे मायबाप ॥ ४ ॥ ती मुक्का आवा मोठी क-
ठीण बाळा ॥ तुकडा देती पाका शिळा ॥ काम सांगती
वेळोवेळां ॥ परी हरीक येतो कीजे मायबाप ॥ ५ ॥ परी
मी जातीचा महार ॥ धन्याच्या चाकरीस कार्थ साधाल ॥
सालोबाद् धन्याच्या घरचा कारभार ॥ मीच आलों करीत
कीजे मायबाप ॥ ६ ॥ गाडा विष्णुबा कुळकर्णी ॥ साऱ्या
कारभाऱ्यांचा धनी ॥ चौऱ्याशीं लक्षांची पाठवनी ॥
त्यानेंच केली कीजे मायबाप ॥ ७ ॥ चौऱ्याशीं लक्ष बाण
भरी ॥ विष्णुबा कुळकर्ण्यांची खिल्लारी ॥ पोशीत पाळीत
संरक्षीत ते ॥ जाहाले कीजे मायबाप ॥ ८ ॥ मग हो मृत्यु-
लोकींच्या भोंविल्या पेठा ॥ पुरविल्या निवृत्ती दाविल्या
वाटा ॥ त्या सांडुनी हाव्याटा ॥ जाऊं नका कीजे माय-
बाप ॥ ९ ॥ मग मृत्युलोकीं केलें पेनें ॥ गोवण पाडिलें
मागील रीनें ॥ फिटल्यावांचूनि समाधान ॥ होत नाहीं कीजे
मायबाप ॥ १० ॥ शेत अवघें पांच कोस ॥ पाडुनी के-
लेंत न गवतास ॥ पडिवाचा पैका देता बोभाटास ॥ मूळ
होईल कीजे मायबाप ॥ ११ ॥ सालोबाद मारितां हाका ॥

वसूल करा दिवानाचा टका ॥ तोंवरी येणें जाणें धोका ॥ नावरे कीजे मायबाप ॥ १२ ॥ मग आरोळी देऊन घातली उडी ॥ एक काढली लौंड सौडी ॥ एक ते उताने उफाडी॥ घाहावली कीजे मायबाप ॥ १३ ॥ एक व्हावटी एक खलास झाली ॥ वरती पाय खालती शिखरें ॥ त्यांचे थोर थोर हाल ॥ देखिले कीजे मायबाप ॥ १४ ॥ मग जाऊनि जनार्दन दरवारीं ॥ वैसोनियां एकनाथाचे पाहाडोवरी ॥ माप केलें खरें पुरी ॥ बरी उवरी चुकविल्या कीजे मायबाप ॥ १५ ॥

## जोहार ६ वा.

जोहारजी मायबाप जोहार ॥ मी तो सूर्यवंशीं रामजी बाजीचा माहार ॥ माझें नांव आत्मनाक माहार॥सारा कारभार धन्याचे रजेनें करितों कीजे मायबाप ॥ १ ॥ खोपटा माजी काय राहावें ॥ हाडाच्या खोडयांत पडतील पाय ॥ तोंड चुकल्या इजत जाय ॥ मग वांचून करावें काय ॥ कीजे मायबाप ॥ २ ॥ मुद्दल वाढला फार ॥ लक्ष चौऱ्याशीं वरातदार ॥ यमाजी वाजी हुजुरचा माहालदार ॥ त्याचा मार परोपरी कीजे मायबाप ॥ ३ ॥ मुद्दत जवळ आली ॥ फिफिर पाहिजे केली ॥ कितीक मारीत झोडीत नेलीं ॥ माजी

साच बोली आहे कीजे मायबाप ॥ ४ ॥ टाकून द्या हा गांव ॥ डोय बोडून पालटा नांव ॥ घर सोडून देऊळीं राहावें ॥ हातीं काठी असूं द्यावी कीजे मायबाप ॥ ५ ॥ एका जनार्दनीं माहार ॥ संतसभेसी केला जोहार ॥ तेणेंच जन्म मरणाची येरझार ॥ चुकेल कीजे मायबाप ॥ ६ ॥

## जोहार ७ वा.

जोहारजी मायबाप जोहार ॥ मी तो अविद्या नगरीची माहारीण साचार ॥ माझ्यानें हें नगर आकारास ॥ आलें कीजे मायबाप ॥ १ ॥ नगर तों रचिलें ब्रम्ह्यानीं ॥ आंत घर दिधलें बांधोनी ॥ काम सांगितलें तेणें ॥ तेंच करितें कीजे मायबाप ॥ २ ॥ माझे साहा चाकर ठेविलेत ॥ ते माझेच बळें वर्ततात ॥ त्यांत पांचजण गांजितात ॥ अन्याय नसतां कीजे मायबाप ॥ ३ ॥ तुह्मी एकत्व झालां ॥ माझें घर मोडायाचा मनसुबा केला ॥ माझी आगत असेल धन्याला ॥ तरीच ठेवतील कीजे मायबाप ॥ ४ ॥ आतां या कलीयुगाचे ठायीं ॥ मी माजी नसे सर्वांचे हृदयीं ॥ माझे काम क्रोधाचे ठाईं ॥ माझी मजपाशींच कीजे मायबाप ॥ ५ ॥ एकाजनार्दन ह्मणे देवा ॥ त्या अविद्येचा संग नसावा ॥ जन्म

मरणाचा ठेवा ॥ तोडून टाकावा कीजे मायबाप ॥ ६ ॥

## पद.

तारक तो जगदीश्वर जाणुनी ॥ अनन्य शरण रिघा ॥ ॥ धृ० ॥ ठेवुनियां कर दोन्ही कटावर ॥ भक्तांचे भेटी उभा ॥ तारक० ॥ १ ॥ कांस धरावी बळकट भावें॥देणार नाहीं दगा ॥ तारक० ॥ २ ॥ त्र्यंबक होउनी साधन हें करी ॥ एकाजनार्दनीं गा ॥ तारक० ॥ ३ ॥

## पद.

प्राण्या गुणिवंता । त्यजुनि अहंता । शरण जाईं संतांरे॥ ॥ धृ० ॥ सग्दुरु तो भवसागरिं तारी ॥ नासुनी सर्वही चिंतारे ॥ प्रा० ॥ १ ॥ आपण तरुनि जनासि तारिती ॥ भेटविती भगवंतारे ॥ प्रा० ॥ २ ॥ त्र्यंबक कविसुत वदत तदाश्रयें ॥ न भिऊं काळकृतांता रे ॥ प्रा० ॥ ३ ॥

## पद.

देव कांहो विटेवरी उभा उभा ॥ देव कां० ॥ धृ० ॥ नका पुसूं बाई ॥ वेदांसी कांहीं ॥ कळलें नाहीं ॥ तोंड ॥ शेषशिणला ॥ झाल्या दोन जिभा जिभा ॥ देव० ॥ १ ॥ सखी

पुसे सखयासी ॥ युगें आठावीस झालीं कीं ॥ चाल ॥ कटावरीकर कर ॥ भीमातीर ॥ तोड ॥ वाळवंटीं संत सभा सभा ॥ देव० ॥ २ ॥ तेथें गोपाळ लुटती काला ॥ हरिनामें तयांचा गलबला ॥ चाल ॥ गण नाहीं गोत ॥ मिळाले संत ॥ तोड ॥ आला तयांचिया लोभा लोभा ॥देव० ॥ ३ ॥ हरि वैकुंठ सांडुनी ॥ आला पुंडलिकालागुनी ॥ चाल ॥ युगानुयुगीं ॥ भक्तालागीं ॥तोड॥ वाळवंटीं संत शोभा शोभा ॥ देव कांहो विटेवरी उभा उभा ॥ देव० ॥ ४ ॥

## अर्जदास्त १.

अर्जदास्त । अर्जदार । बंदेनमाज अलेकंसलाम । साहेबाचे शेवेशीं । बंदे शरीराकार । शिवाजी शेखदार बुधाजी कारकून । परगणे शरीराबाद । किल्ले कायापुरी । सरकार साहेबांची आज्ञा घेऊन स्वार झालों । तो परगणें मजकुरीं येऊन सरकार काम सुरू करायास लागलों तों परगणे मजकुरचे जमेदार । दंभाजी शेटे व कामाजी महाजन व मनीराम देशमुख व ममताई देशपांडीण व क्रोधाजी गाईकवाड ऐसे हरामजादे फार आहेत । सरकार कामाचा कयासा चालूं देत नाहींत । दंभाजी शेटया कचेरीस येऊन जोम धरून

बसतो । मनीराम देशमुख आपलें परभारें काम करून घेतो । ममताई देशपांडीण इणें तमाम परगणा जरदस्त केला । क्रोधाजी नाइकवाडी यानें तमाम तफरका केला । तों साहेबापासून जरासंध चोपदार आला त्यानें खबर केली कीं । मागून यमाजीपंताची तलब होणार । त्यास त्या धास्तीनें तमाम परगणा वोस झाला । वितपशील कलम । डोळसवाडीस मात्र कांहीं रुईझुई वस्ती राहिली । कानगांव तो बंद झाले । दोन्ही वेशींचीं कवाडें लागलीं । नाकापुरास वाहव सुटले । तोंडापुर तों तफरका झालें । दंताळवाडो वोस पडली । ॥ दिवेलागणी देखील राहिली नाहीं । केंसगांवची पांढर झाली । शिरापुरचे लोक दरोबस्त थरथरा कांपतात । हातगांव कसाल्यानें जर्जर झाले । त्यांच्यानें आतां कांहीं लावणी होत नाहीं । पायगांवची मेटें बसलीं । ढोंपरपूरची शक्ति राहिली । चरणगांवची चाली सरली । गांडापूर वाहूं लागलें । लिंगस्थान भ्रष्ट झालें । उठूं पळूं लागलें । धीर धरवेना । ऐसी परगण्यांत कीर्ति बुडाली । यावर सरकार काम सुरू करीत होतों । तों यमाजीपंताची परवानगी आली कीं । हुजुर येणें । आपणास साहेबाचा आशय आहे । एका जनार्दनका बंदा बंदगी रोशन होय हे अर्जदास्त ॥ १ ॥

## अभयदान.

चिरंजीव जीवाजीपंत ठाणेदार यांशीं; आत्मारामपंत कमावासदार कसबे ब्रह्मपुरी. आशीर्वाद उपरी, तुह्मांसी देहगांवचें ठाणें दिलें, तर ठाण्यांत सावधपणें वर्तणूक करणें, तेथें ममताई पाटलीण, तिणें लटकेंच दंभ केलें आहे, कामक्रोधादि षड्वैरी चाकर ठेवून लोभमोहांचे फांसे सिद्ध करून ठविले आहेत ह्मणून तुह्मांस सूचना मात्र लिहिली आहे, विषयाचा लोभ न धरणें, निजहितासी अंतर न करणें, सत्यमिथ्या जाणून विचाराची वाट धरणें, अविचारपणा सोडून देणें, विवेक सद्भावांशीं मित्रत्व विशेष असों देणें, त्यांचे बुद्धीनें गांवची लावणी करणें, उत्तम चारी वर्णांशीं कऊल देऊन धैर्याचा नांगर धरून, शेतांतील मुंदे खुटे काढून वासनेच्या पालव्या तोडून संशयाचा गाशा गोळा करून भूमिका शुद्ध करून मग भक्तिज्ञान वैराग्य तिफणी करून सद्गुरुमुखें निजबीज पेरणें । तेथें शुद्ध सत्वाचा मेघ वर्षला, तेथें सत्याचा माळा घालून कुतर्क पांखरूं उडवून देणें, जागोजागीं विश्वास रक्षण ठेवून, शेतांतील माल अवघाची गोळा करून, षड्गुणऐश्वर्य वेल जुंपून, अवघाच माल खळ्यांत आणून, कस मळ काढून स्वानंदाची रास करणें, तेथें सिद्ध साधक

मागते येतील त्यांला भक्तीचे पायलींत अवघाचि माल मोजून देऊन , सह हुजूर ब्रह्मपुरीस येणें. सांगितल्या गोष्टींत बाकी ठेवाल तर चौऱ्याशीं लक्ष योनी फिरणें लागेल, मग पुनरपि तुह्मांवर दहस्त लागेल, खरें चालावें. जन्ममरणाची वाट खंडेल । जनार्दन सग्दुरुकृपेचा सागर । तेणें एका जनार्दनीं आनंदमय समाधान झाला । द्वैताचा लेश उरला नाहीं । सच्चिदानंदरूप प्रत्ययास येऊन समाधान पावेल॥ १ ॥

## फकीराचे सव्वाल.

आपआपकूं बुज नहीं ॥ तनमनकु खोया नहीं ॥ मन मैलकुं धोया नहीं ॥ स्नान किया तो क्या हुवा ॥ हरहर॥१॥ करनी करे बदनामकी ॥ नजर रखे हरामकी ॥ हृदय शुद्ध नहीं रामकी ॥ संध्या किया तो क्या हुवा ॥ २ ॥ कुत्ता हुवा मालका ॥ कठीण कठोर दिल दमका ॥ हृदय चहाड भये लोका ॥ काशी गया तो क्या हुवा ॥ ३ ॥ गुरुकुं शरण नहीं गया ॥ मावापसें जुदा रह्या ॥ औरतकुं प्यारा भया ॥ गया गया तो क्या हुवा ॥ ४ ॥ माया मांगीन त्यागी नहीं ॥ क्रिया जोत जागी नहीं ॥ उन्मनि समाधी लागी नहीं ॥ जोगी हुवा तो क्या हुवा ॥ ५ ॥ दया

धरम जाना नहीं ॥ सब घट सांहीं समज्या नहीं ॥ आपआपकुं बुज नहीं ॥ संन्यास लिया तो क्या हुवा ॥ ६ ॥ जिन की तो सुदबुद नहीं ॥ अंतकालकी सुद नहीं ॥ जबलग गुरुमुख भया नहीं ॥ तबलग किया तो क्या हुवा ॥ ७ ॥ हंकार जिनका उडा नहीं ॥ शांतिमों मन गढा नहीं ॥ ब्रह्मरूपसें जडा नहीं ॥ पोथी पढा तो क्या हुवा ॥ ८ ॥ लालुच बुरी उठी नहीं ॥ हृदय दया पोटीं नहीं ॥ भेद भ्रांती तुटी नहीं ॥ पंडित हुवा तो क्या हुवा ॥ ९ ॥ जिते पितरकुं सुख नहीं ॥ उनकी तो आसेक नहीं ॥ जिस चंडालकुं सुख नहीं ॥ तर्पन किया तो क्या हुवा ॥ १० ॥ संसारका जोजार है ॥ बदफैलका बजार है ॥ कामिनी गलेका हार है ॥ कथा किया तो क्या हुवा ॥ ११ ॥ दिलमें बारी खुब रखी ॥ कबु लेकर जिकीरकी ॥ गठडी बांधे फकीरकी ॥ फेर फकीर हुवा तो क्या हुवा ॥ १२ ॥ इस बाबत कबिरा कहै ॥ जिसमें रामका सहवास है ॥ आसपास राम धरा है ॥ जोग न हुवा तो क्या हुवा ॥ १३ ॥

## गारुडभारुड प्रकरण समाप्त.

# उत्तर भजन.

## आरती ज्ञानदेवाची.

आरती ज्ञानराजा ॥ महाकैवल्य तेजा ॥ सेवितो साधु संत ॥ मनु वेधला माझा ॥ धृ० ॥ लोपलें ज्ञान जगीं ॥ हित नेणती कोणी ॥ अवतार पांडुरंग ॥ नाम ठेविलें ज्ञानी ॥आ०॥ १ ॥कनकाचें ताट करीं॥उभ्या गोपिका नारी॥नारद तुंबरु हो ॥ साम गायन करी ॥आ०॥२॥प्रगट गुह्य बोले ॥ विश्व ब्रह्मची ठेलें ॥ एका जनार्दनीं ॥ पायीं लीन मी झालें ॥आ०॥ ३ ॥

## आरती कृष्णाची.

चला सत्वर मंदिरिं गोपी हरी ह्मणती ॥ राधा ती ह्मणती ॥ गोपी मानसरंजना प्रमें ओंवाळिती ॥ ध्रु० ॥ एकीकडे राई रखुमाबाई ओंवाळितां प्रेमें हरी दो ठायीं होती ॥ १ ॥ अष्टाधिक सोळा सहस्त्र असती नारी ॥ ज्यांनीं केली प्रार्थना गेले तयांचे घरीं ॥ २ ॥ एका जनार्दनीं तूं होसी लाघवी हरी ॥ इतक्या सर्व भोगुनी ह्मणविसि ब्रह्मचारी ॥ ॥ ३ ॥ किती नेणूं तुझे गुण मी भगवंता ॥ देई तूंचि आसरा पदीं मज आतां ॥ ४ ॥

## आरती एकनाथाची.

आरती एकनाथा ॥ महाराजा समर्था ॥ त्रिभुवनीं तूंचि थोर ॥ जगद्गुरु जगन्नाथा ॥ ध्रु० ॥ एकनाथ नाम सार ॥ वेदशास्त्रांचें गुज ॥ संसारदुःख नासे ॥ महा मंत्राचें बीज ॥ आरती० ॥ १॥ एकनाथ नाम घेतां ॥ सुख वाटलें चित्ता॥ अनंत गोपाळ दास ॥ धणी न पुरे गातां ॥ आ० ॥ २ ॥

## आरती तुकारामाची.

आरती तुकारामा ॥ स्वामी सद्गुरु धामा ॥ सच्चिदानंद मूर्ति ॥ पाय दाखवीं आह्मां ॥ आरती०॥१ ॥ धृ० ॥ राघवें सागरांत ॥ उदकीं पाषाण तारीले ॥ कवतुक तुकोबाचें अभंग रचिले ॥ आरती० ॥ २ ॥ सच्चिता तूळणेसीं ॥ प्रेम सुखाशीं आलें ॥ ह्मणुनि रामेश्वरीं ॥ चरणीं मस्तक ठेविलें॥ आरती० ॥ ३ ॥

## शेज आरती.

पावला प्रसाद आतां उठोनि जावें ॥ आपला तो श्रम कळों येतसे जीवें ॥ १ ॥ धृ० ॥ आतां स्वामी सुखें निद्रा करा गोपाळा ॥ पुरले मनोरथ जातों आपुलिया स्थळा ॥ तुह्मांसीं जागवूं आह्मी आपुलिया चाडा ॥ शुभाशुभ कर्मे

दोष यारावया पीडा ॥ २ ॥ तुका ह्मणे दिलें उच्छिष्टाचें भोजन ॥ आह्मां आपुलिया नाहीं निवडिलें भिन्न ॥ ३ ॥

## विडा.

विडा घ्याहो नारायणा ॥ कृष्णा जगत्रजीवना ॥ विनविते रखुमाई ॥ दासी होईन मी कान्हा ॥ धृ० ॥ वासना फोडुनीयां ॥ चूर्ण केली सुपारी ॥ भावार्थ कापुरानें ॥ घोळियेली निर्धारी॥ वि०॥१॥शांति हे नागवेली॥पान घेऊनियां करीं ॥ मीपण जाळूनियां ॥ चुना लावियेला वरी ॥ वि० ॥ २ ॥ विवेक हा कात रंग ॥ रंगीं रंगला सुरंग ॥ वैराग्य जायफळ॥मेळविलें सकळ॥वि०॥ ३॥दया हे जायपत्री ॥ क्षमा लवंगा आणील्या॥सुबुद्धि वेलदोडे॥शिवरामीं अर्पिले॥वि०४॥

## शेवटचे विनंतीचे अभंग.

विठ्ठल आमचें जीवन ॥ आगम निगमाचें स्थान ॥ विठ्ठल सिद्धीचें साधन ॥ विठ्ठल ध्यान विसावा ॥ १ ॥ धृ० ॥ विठ्ठल कुळीचें दैवत ॥ विठ्ठल वित्त गोत चित्त ॥ विठ्ठल पुण्यपुरुषार्थ ॥ आवडे मात विठ्ठलाची ॥ २ ॥ विठ्ठल विस्तारला जनीं ॥ सप्तही पाताळें भरूनी ॥ विठ्ठल व्यापक त्रिभुवनीं ॥ विठ्ठल मनीं मानसीं ॥ ३ ॥ विठ्ठल जिवाचा जिव्हा-

ळा ॥ विठ्ठल कृपेचा कोंवळा ॥ विठ्ठल प्रेमाचा पुतळा ॥ लावियेला चाळा विश्व-विठ्ठलें ॥ ४ ॥ विठ्ठल बाप माय चुलता ॥ विठ्ठल भगिनी आणि भ्राता ॥ विठ्ठलें विण चाड नाहीं गोता ॥ तुका ह्मणे आतां नाहीं दुसरें ॥ ५ ॥

## अभंग

मी तव अनाथ अपराधी ॥ कर्महीन मंदबुद्धी ॥ तुज म्यां आठविलें नाहीं कधीं ॥ वाचे कृपानिधी मायबाप ॥१॥धृ॥ नाहीं ऐकिलें गाइलें गीत ॥ धरिली लाज सांडिलें हित ॥ नावडे पुराण बैसले संत ॥ केली बहुत परनिंदा ॥ २ ॥ केला करविला नाहीं उपकार ॥ नाहीं दया आली पीडितां पर ॥ करूं नये तो केला व्यापार ॥ वाहिला भार कुटुंबाचा ॥३॥ नाहीं केलें तीर्थांचें भ्रमण ॥ पाळिला पिंड करचरण ॥ नाहीं संतसेवा घडलें ज्ञान ॥ पूजावलोकन मूर्तीचें ॥ ४ ॥ असंगसंग घडले अन्याय ॥ बहुत धर्म उपाय ॥ नकळे हित करावें तें काय ॥ नये बोलूं आठवूं तें ॥५॥ आप आपुलिया घातकरू ॥ शत्रु झालों मी दावेदारु ॥ तूं तव कृपेचा सागरु ॥ उतरीं पार तुका ह्मणे ॥ ६ ॥

## अभंग

अगा ए सावळ्या सगुणा ॥ गुणनिधिनाम नारायणा ॥

आमची परिसा विज्ञापना ॥ सांभाळीं दीना आपुलिया॥१॥ धृ० ॥ बहु या उदराचें कष्ट ॥ आह्मांसीं केलें कर्मभ्रष्ट ॥ तुमची चुकविली वाट ॥ करीं वटवट या निमित्यें ॥२॥ झालों पांगिला जनासी ॥ संसाराची आंदणी दासी ॥ नकळे कधीं सोडविशी ॥ दृढपाशीं बहु बांधलों ॥ ३ ॥ येथें तो नये आठव कांहीं ॥ विसावा तो क्षणएक नाहीं ॥ पडिलों आणिके प्रवाहीं ॥ हित तो कांहीं दिसेचिना ॥ ४ ॥ जीवित्व वेंचिलें वियोगें॥ हिंडतां प्रवास वाउगे ॥ कांहीं व्याधी पीडा रोगें ॥ केलिया भोगें ताडातोडी ॥ ५ ॥ माझा मीच झालों शत्रु॥कैंचा पुत्र दारा कैंचा मित्रु ॥ कासया घातला पसारु ॥ अहो जगद्गुरु तुका ह्मणे ॥ ६ ॥

REFBK-0000332

॥ इति ॥

# भजनी संतमेळा

## समाप्त.

## स्वदेशी हुन्नरकलेचा अपूर्व मासला.

# अद्भुत कृष्णलीला.

श्रीकृष्ण प्रसंगानुसार बाल. तरुण, मोहनी वगैरे अनेकरूपें धारण करीत असे. या पौराणिक कथानुरोधानें हा जाड पुठ्याचा सुमारें १। फूट उंचीचा पुतळा अगदीं नवीन कल्पनेनें तयार केला असून, जादु, चावी, संचा, कब या शिवाय यावर पडदा किंवा झांकण न घालतां हातांतल्या हातांत सर्वांसमक्ष पुढें लिहिल्याप्रमाणें याचीं रूपांतरें होतात. प्रेक्षकासमोर हा पुतळा उभा करून दाखवावा. तर तो प्रथम मुरलीधर श्रीकृष्ण दिसतो,लगेच पुनः दाखवावा तर त्याची सुंदर राधागौळण होते! !लगेच पुनः दाखवावा तर उलट सुलट भागाचा कृष्ण होतो !! लगेच पुनः दाखवावा तर उलट सुलट भागाची राधा होते!तसेंच श्रीकृष्णाच्या शरीराचे आपोआप तुकडे पडत जाऊन त्याची सुंदर राधा बनते. तसेच राधेचेही आपोआप तुकडे पडत जाउन तिचा सुंदर मुरलीधर कृष्ण बनतो, अशा रीतीनें हा एकच पुतळा ५।६ प्रकारें देखतां देखत तात्काळ बदलतो. व हे चमत्कार पाहून प्रेक्षकांस फारच आश्चर्य वाटतें ! वरील रूपांतरें होण्याचा गुण यांत कायमचा राहून. पाहिजे त्यावेळीं सदर चमत्कार या सोबत मिळण्याऱ्या माहितीच्या पुस्तकावरून ताबडतोब दाखवितां येतात. अशा या अद्भुत करामती पुतळ्याची किंमत तूर्त १२ आणे र. व्ही. पी. खर्च २ आणे. पुढें किंमत दुप्पट.

डा. **नानासाहेब देशमुख** बी. ए. एम. डी; कृ. **ना. आठल्ये**, केरळ कोकिळचे एडीटर, आर्यमहोपाध्याय **शंकर दाजी शास्त्री पदे**; दामोदर सांवळाराम. श्रीसयाजी विजयकर्ते. व **केसरी** तारीख २४।१०।३ इत्यादि नामांकित विद्वान गृहस्थांनीं हा पुतळा प्रत्यक्ष पाहून त्यांच्या कल्पकतेची तारीफ केली आहे सबब **स्व-**

देशी कारागिरीच्या नमुन्यादाखल हा पुतळा प्रत्येकानें आवश्य घ्यावा. प्रोफेसर. जी. एम्. कार्लेकर.

पत्ता. नळावर पंचमुखी मारुतीची कापडगल्ली, गिरगांव पोष्ट.मुंबई.

# रसिकरंजन कथामाला.

(जनानखान्यांतील रहस्य)

या मालेंतील मनुष्य स्वभावाच्या विविध रंगरस दर्शक पुढील १० गोष्टी फारच सुरस व मनोवेधक आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | विलास मंजरीचें चरित्र व सौंदर्य लहरीच्या सुखाचे प्रयत्न कि. | ८५ |
| २ | सकुमार सुंदरीचें अंतःपुर व विचित्र पालाची विचित्र जादू. | ८५ |
| ३ | कामाक्षीचें अजब चातुर्य | ८५ |
| ४ | कुसुममंजरीच्या प्रीतीचें गुह्य किंवा भावी मुंबईकरणीचा थाट. | ८४ |
| ५ | जादूचा दीप किंवा दोन घटकत जगाचें ज्ञान | ८३ |
| ६ | स्त्रीवशिकरणाची कला. | ८२ |
| ७ | वेताळ नगरींतील राजकन्येची गोष्ट. | ८२ |
| ८ | तळघरांतील द्रव्याचा ठेवा. | ८२ |
| ९ | मध्यानरात्रीची गुप्त गोष्ट. | ८२ |
| १० | कुमारपालाची गोष्ट. | ८२ |

वरील किंमती खेरीज पोष्टेज प्रत्येकीं ८॥ जास्त. किंमती बद्दल पोष्ट तिकिटें पाठवा. दहाही गोष्टी एकदम घेतल्यास ट. व्ही. पी. सह फक्त १। रुपया पडेल ह्या गोष्टी आह्मांकडे विक्रीस तयार आहेत. नारायण गोविंद,

पत्ताः-कुंभारवाडा, भंडारगल्ली, गिरगांव पोष्ट, मुंबई.

## [illegible]गीत नाटकें व गायनाचीं [illegible]

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| [illegible] मृच्छकटी. | १२ | ० | संगीत [illegible] | | ० |
| [illegible] ना. [illegible] | | | ,, [illegible] | ४ [illegible] | ० |
| ,, [illegible] ना. [illegible] | २ | ० | ,, संभाजी नाटक | [illegible] | |
| [illegible] नाटक. | ४ | ० | ,, सावळा [illegible] | ४ | [illegible] |
| ,, [illegible] नाटक. | ४ | ० | ,, सीता [illegible] नाटक. | ४ | ० |
| ,, [illegible] ना. [illegible] | ४ | ० | ,, सावित्री [illegible] | ६ | ० |
| [illegible] | ४ | ० | ,, आनं[illegible] [illegible] | ८ | ० |
| [illegible] | ५ | ० | ,, सु[illegible] | [illegible] | ० |
| [illegible] | [illegible] | ० | ,, वत्सला. | २ | ६ |
| ,, [illegible]क्षण ना[illegible]. | ८ | ० | ,, द्रौ[illegible]दीवस्त्रहरण. | १ | ६ |
| ,, सौभाग्य [illegible] ना. | ७ | ० | ,, मदनम[illegible]. | [illegible] | [illegible] |
| ,, [illegible] नाट[illegible] | [illegible] | ० | ,, सुदा[illegible] | | [illegible] |
| ,, [illegible]जय. | १२ | ७ | ,, [illegible] | | [illegible] |
| ,, [illegible] | १२ | ० | ,, [illegible] | | ० |
| ,, [illegible] | १० | ० | ,, [illegible] | २ | [illegible] |
| ,, विक्र[illegible] | २ | ० | ,, [illegible] | १ | |
| ,, [illegible] | २ | [illegible] | ,, [illegible] | | [illegible] |
| ,, शाकुं[illegible] | | | श्रीशिव[illegible] | | |

[illegible] पाट[illegible]